
# माणूस

१ मे १९६५

२५ पैसे



**एक दगड**
**पक्षी मात्र दोन**

श्रेष्ठ साहित्याचा संग्रह
आणि
किफायतशीर गुंतवणुक



# रा जा शि व छ त्र प ती

हे ब. मो. पुरंदरे यांचे अपूर्व सुंदर शिवचरित्र प्रत्येक मराठी कुटुंबात असावे यासाठी 'राजहंस प्रकाशन संस्था' सर्व तऱ्हेचे प्रयत्न करीत आहे.

अनेक थोरामोठयांनी व लहानसहान व्यक्तींनीही या चरित्र प्रसाराच्या कार्याला आजवर मनःपूर्वक हातभार लावलेला आहे.

## दि. ३ मे १९६५



या दिवशी
मा. संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण
यांच्या अध्यक्षतेखाली
या शिवचरित्राची तिसरी सचित्र आवृत्ती
प्रसिद्ध होत आहे.

- **मोठ्या रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे (दोन भाग)**
- **उत्कृष्ट कागद, टिकाऊ बांधणी**
- **दलालांची आकर्षक रेखाचित्रे व मुखपृष्ठ सजावट**
- **ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे, नकाशे**

□ किंमत ३६ रुपये

१०० रुपयांची ठेव

५ वर्षांसाठी

'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा लोकमान्य व राजमान्य ग्रंथ तावडतोब विनामूल्य आपल्याला घरपोच मिळेल.

राजहंस प्रकाशन संस्थेकडे आपली शंभर रुपयांची ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.

□ ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

□ चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.

**राजहंस प्रकाशन**
४१९ नारायण, पुणे २




वर्ष चौथे : अंक अठरावा : १ मे १९६५ : पंचवीस पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. दूरध्वनी : ५७३५९

हा अंक प्रसिद्ध होण्याच्या सुमारासच महाराष्ट्रात शिवजयंतीचा उत्सव महाराष्ट्र शासनातर्फे मोठ्या प्रमाणात साजरा होत आहे. 'माणूस' ज्या संस्थेतर्फे प्रकाशित होत असतो, त्याच संस्थेचे 'राजा शिवछत्रपती' हे श्री. ब. मो. पुरंदरे यांचे प्रख्यात शिवचरित्रही ३ मे या दिवशी मुंबई येथे मोठ्या थाटामाटात प्रसिद्ध होत आहे. शिवाय 'शिवाजी' या विषयाला चालू राजकीय परिस्थितीमुळे पुन्हा एकदा जोराची चालना मिळालेली आहे. हा सर्व योग जमून येत असल्यामुळे या अंकात 'शिवाजी...एक अभ्यास' हा शिवचरित्राचे मर्म विशद करणारा एक प्रदीर्घ लेख मुद्दाम प्रसिद्ध केला आहे. १९५९ साली स्व. पंडित नेहरू प्रतापगडावर आले असताना त्यांना या लेखाची हिंदी आवृत्ती ना. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते अर्पण करण्यात आली होती व या हिंदी आवृत्तीच्या सुमारे एक हजार प्रती लोकसभेचे व राज्यसभेचे सदस्य, विविध राज्यांचे राज्यपाल व मुख्यमंत्री, देशातील प्रमुख नेते व विचारवंत इत्यादींना केवळ 'उपयुक्त प्रचारकार्य' म्हणून 'राजहंस प्रकाशना'तर्फे विनामूल्य पाठविण्यात आल्या होत्या.

या प्रदीर्घ लेखामुळे नेहमी येणाऱ्या १–२ सदरांना जागा राहिली नाही (जगाच्या पाठीवर, क्रीडा) व १-२ सदरांची लांबी थोडी कमी करावी लागली (लेखन-वाचन, रंगभूमी), याची कृपया नोंद घ्यावी. —संपादक

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.



दिल्ली दरबार

## □ केंद्रीय मंत्र्यांचे दिवटे कारटे !!

'दिल्ली दरबार' चा मजकूर.गेल्या अंकासाठी धाडला व तो मध्येच गडप झाला, असे संपादकांकडून कळले ! यामुळे दिल्लीमधील वाढत्या गुन्हेगारीचे स्मरण झाले. [अर्थात मागील अंकाचा मजकूर पुण्यात गडप झाला का दिल्लीत गडप झाला याची शहानिशा करण्यात काहीच अर्थ व उपयोग आता नाही.] दिल्लीतील दारूबंदी-विषयी कळविल्यानंतर गुन्हेगारीतील वाढ कळविणेही ओघानेच येते. सुमारे तीन लिटर विदेशी दारू दिल्लीत अधिक खपू लागल्याची माहिती अधिकृतरीत्या प्राप्त झालेली आहे. १९६३–६४ मधील गुन्हेगारीची अधिकृत माहिती देताना सांगण्यात असेच आले की ही वाढ विशेष नाही (म्हणजे सरकारी भाषेत फक्त 'मार्जिनल' आहे) ! ही वाढ विशेष नसली तरी काही विशिष्ट पद्धतीच्या गुन्ह्यांमध्ये चांगलीच वाढ दिसून येत आहे. टोळक्यांची (टवाळांची) गुंडगिरी हे प्रकार गेल्या तीन वर्षांत अनुक्रमे ६६; ८० व ९१ वेळा या क्रमाने वाढले आहेत ! समाजशास्त्रदृष्टचा या गुंडगिरीच्या अनिष्ट प्रकारांची छाननी होईल तर निश्चितच असे उघडकीस येईल की निष्फळ दारूबंदी धोरणाशीच या प्रकारांचा संबंध आहे ! अधिकृतरीत्या असेही सांगण्यात आले की एकूण वाढ विशेष नसली तरी खून; खूनाचे प्रयत्न; घरफोडीच्या चोऱ्या आदि प्रकारांतही वाढ आहेच. मोटार व स्कूटर चोरीचे प्रकारही वाढीस लागले असल्याने दिल्ली पोलिसांत त्यांचा ( या प्रकरणांचा ) शोध घेण्यासाठी स्वतंत्र विभाग (युनिट) आहे.

**इतका सर्व बंदोबस्त करूनही विरोधी खासदार संसदेत वारंवार प्रश्न विचारीतच आहेत की गेल्या वर्षी दि. १६ मे रोजी मध्यरात्रीनंतर प्रतिष्ठित घराण्यातील चार किशोरांनी मोटार चोरली. दमदाटी करून सुमारे २० लिटर पेट्रोल पैसे न देता घेतले आणि शेवटी मोटार सायकलशी धडक देऊन अपघात केला. तरी या गुन्ह्याचा शोध अद्याप का लागत नाही ? 'काही शोध लागत नाही ' म्हणून या**

**प्रकरणीचे कागदपत्र दप्तरी का दाखल करण्यात येत आहेत ? या गुन्ह्यात विदेश मंत्रालयाचे एका उच्च अधिकाऱ्यांचे चिरंजीव आणि एका केंद्रीय मंत्र्यांचे दिवटे कारटे गोवलेले आहे का, आदि अवघड प्रश्न सदाचारी गृहमंत्री श्री. नंदा यांना विचारले जातच आहेत ! सद्यःस्थितीत दिल्ली दरबारात न्याय मिळणे वा दाद लागणे दिनप्रतिदिन कसे व किती कठीण होत चालले आहे, याचा हा एक मासलेवाईक नमुना म्हणून सादर केला आहे.**

## □ संसदेतील गोंधळ

संसदेत गेल्या सुमारे तीन सप्ताहांपासून कच्छ–सिंध सीमेवर पाकिस्तानी सेनेद्वारा जो आंतरराष्ट्रीय गुन्हा (आक्रमण) करणे चालू आहे त्याची विशेष चर्चा आहे. विरोधपत्रे धाडण्यापेक्षा अधिक काही कारवाई सरकार करील का, असे खोचक प्रश्न विरोधी खासदारांतर्फे सरकारला वारंवार विचारले जाऊ लागले आहेत. दिल्लीस्थित पाकिस्तानी राजदूताने भारताचे एक विरोधपत्र (निषेध खलिता) परराष्ट्र मंत्रालयात परत आणून दिल्यामुळे तर अनेक खासदार दि. २१ एप्रिल रोजी लोकसभेत खवळून उठलेले होते. ही जी खळबळ उडाली, त्यातच प्रसोपाचे पट्टीचे खासदार श्री. हेम बारुआ प्रक्षुब्ध झाले. त्यांचा संताप अक्षरशः अनावर होऊन ते सदनाबाहेर चालते झाले. ते बाहेर जात असतानाच सभापतींनी त्यांना बाहेर जाण्याचा आदेश दिल्याने ते अधिकच भडकून उठले. एकच गोंधळ माजला ! अशा वेळी श्री. हेम बारुआ काय ओरडत सदनाबाहेर गेले ते अनेकांना ऐकूसुद्धा गेले नाही. परंतु त्यांनी सभापतींचा अवमान केला, असे ठरवून काँग्रेस पक्षाने त्यांना एक सप्ताह सदनाबाहेर राहण्याची शिक्षा केली ! [श्री. मधू लिमये यांना अन्य-कारण-परत्वे अशीच दोन सप्ताहांची शिक्षा झालेली होती. आज ती शिक्षा भोगून संपवून, सदनात ते उपस्थित होते. काल एकाला शिक्षा झाली व कालच एकाची शिक्षा संपली, असा हा योग पाहून आज अनेकांना आश्चर्य वाटले.] या दोन्ही संसदीय शिक्षांचा उल्लेख एवढ्यासाठी केला आहे की त्यामुळे संसदीय कार्यप्रणालीविषयी सध्या काही मंडळी जो संदेह प्रकट करू लागलेली आहेत, तो ध्यानी घेण्यास सुकर जाईल. डॉ. राम मनोहर लोहियांसारखा खंदा वीर लोकसभेत वेळी अवेळी उभे राहून घोषणा करू लागले आहेत की 'काँग्रेस पक्ष देशाचा सत्यानाश करीत आहे.' या घोषणेच्या पाठोपाठ ते मागणी करू लागले आहेत, की संसदीय कामकाजाच्या विभागावरही लोकसभेत चर्चा होऊ द्या म्हणजे कळेल की संसदेचा किती उपयोग देशाला होतो आहे ? अल्पसंख्य व विविध विरोधी पक्ष बहुमताच्या काँग्रेस

पक्षापुढे (स्टीम रोलरपुढे) निष्प्रभ व कुचकामी ठरत आहेत, असा अभिप्राय अनेक जाणकारांकडून व्यक्त होऊ लागला आहे. उलटपक्षी सत्तारूढ काँग्रेस पक्षाला, पक्षातील अनेकांना, असे वाटू लागले आहे, की विरोधी खासदार अधिकाधिक बेजबाबदार होऊ लागलेले आहेत ! गेल्या सुमारे दोन वर्षातील संसदीय कार्यवाहीचे अहवाल (शब्दशः प्रतिवृत्त) वाचण्याचा कोणी प्रयत्न करील, तर त्याच्या चटकन ध्यानी येईल की काही अपवादात्मक दिवस वगळल्यास बहुधा रोज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या कालखंडानंतर सुमारे अर्धा ते एक तास नुसता गोंधळ वा नसते विवाद वा गडबड यातच अधिक जातो ! " पॉईंट ऑफ ऑर्डर " च्या नावाखाली कित्येकजण उभे राहून जे मनाला येईल ते बोलून घेतात......आदि अनेक प्रकार घडून येत असतात. त्यामुळे रोजच्या दुपारच्या बारा वाजेनंतर चालू होणाऱ्या या कार्यक्रमाला ' झीरो अवर प्रोग्रॅम ' असेच नाव चेष्टेने पडू पाहत आहे. हे सर्व प्रकार आटोक्यात आणून संसदीय कार्यवाहीला योग्य वळण लावण्याचे दायित्व कोणाकडे आहे, याची गंभीर चर्चा काही जेष्ठ खासदार आजकाल करू लागलेलें आहेत. दि. १० मे नंतर संसदेची बैठक संपवून बहुतेक सर्व खासदार स्वस्थानी परत येतील सामान्य नागरिकांना दिल्ली दरबारातील या माहितीच्या आधारे संसदीय कार्यप्रणालीच्या यशस्वितेविषयी त्यांचेशी विचारविमर्श करण्यास सोपे जाईल अशी अशा वाटते.

## □ छागला आणि पुणे विश्वविद्यालय

सीमा संरक्षण या प्रश्नाविषयी विविध प्रकारे चिंता व्यक्त होत असली तरी त्याचा शास्त्रशुद्ध अभ्यास व विचार करणारे विरळच सापडतात, असा अनुभव आहे. फार काय केंद्र सरकारलाही लाल चीनने भारतावर केलेल्या आक्रमणानंतर, सुमारे एक वर्षभर या विषयाच्या विशेष अध्ययनाची जाणीव नव्हती, असे आता उघडकीस आलेले आहे. १९६३ मध्ये बिहारच्या शैक्षणिक आयोगाने (एज्युकेशन कमिशनने) केंद्र सरकारचे " सैनिक शास्त्र " (मिलिटरी सायन्स) शिक्षण या विषयाकडे प्रथम लक्ष वेधले; अशी स्पष्ट कबुली नवे शिक्षणमंत्री श्री. म. क. छागला यांनी सुमारे चार सप्ताहांपूर्वी प्रश्नोत्तरप्रसंगी लोकसभेत प्रांजळपणे दिली. (१९६३ साली ते शिक्षणमंत्री नव्हते.) त्यानंतर युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशनतर्फे विश्वविद्यालय अनुदान आयोगातर्फे एक समिती (कमिटी) नियुक्त करण्यात आल्याचेही श्री. छागलांनी लोकसभेला सांगितले. विश्वविद्यालयीन शिक्षणात " सैनिक शास्त्र " या विषयाचा कसा अंतर्भाव करता येईल याचा विचार ही समिती करणार आहे. (या समितीचा विचार–पाहणी पूर्ण झाली की अहवाल आणि शिफारशी संसदेसमोर येतील. त्यानंतर, त्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा

[पृष्ठ ८० वर पहा]

# विचार धारे

## " लोकांबरोबर राज्य "

दिल्ली हे परिसंवादांचे माहेरघर. कुठल्या ना कुठल्या विषयावर सखोल विचारांचे आदान–प्रदान करण्यासाठी देशोदेशीची तज्ज्ञ मंडळी एकत्र जमलेली नाहीत असे दिवस थोडेच. काही दिवसांपूर्वी असा एक परिसंवाद " जाणकार समाजाची घडण " ( बिल्डिंग पब्लिक अंडरस्टॅन्डिंग ' ) या विषयावर झाला. त्यावेळी विशेष महत्त्वाचे विचार ऐकायला मिळाले ते अमेरिकेचे भारतातील राजदूत श्री. चेस्टर बौल्स यांचेकडून.

जाणकार जनमत हा लोकशाहीचा गाभा आहे, येथून प्रारंभ करून बौल्स म्हणाले, " हिंदुस्थानातल्या लोकांत हा समज आणण्यासाठी निरनिराळ्या समस्यांवर देशभर चर्चा व्हायला पाहिजे. पण होते काय?–प्रवचन ! एकदा निर्णय घेऊन टाकणे, तो योग्य आहे असे घेणाऱ्यांनीच ठरविणे व मग तो लोकांना पटविण्याचा खटाटोप करणे ही येथली रीत आहे. हा मार्ग ' लोकांसाठी ' काम करण्याचा आहे, पण ' लोकांबरोबर ' काम करण्याचा नाही. " उदाहरण म्हणून संतति–नियमन व जमीनविषयक कायद्यातील सुधारणा हे विषय घेता येईल. हे दोन्ही विषय हिंदुस्थानातील सर्वसाधारण नागरिकांच्या दृष्टीने इतके महत्त्वाचे आहेत, की ते आमजनतेला नीट समजले पाहिजेत. त्यासाठी त्यांचा देशभर ऊहापोह झाला पाहिजे. अशा ऊहापोहातूनच राष्ट्रीय विकास–कार्यांत आपला वाटा आहे, अशी भावना जन–मानसात निर्माण होते; अशी आत्मीयतेची भावना जनतेत जोपासली गेली नाहीतर प्रगतिपथाची वाटचाल नुकतेच करू लागलेले देश लोकशाहीचा मार्ग सोडून हुकूमशाहीच्या आहारी जाणे सहज शक्य असते. अर्थात काही अंशी नियमन हे ' वरून ' असणे अपरिहार्य आहे, पण त्याचबरोबर प्रतिसाद हा ' खालून ' म्हणजे सर्वसाधारण जनतेतूनच मिळाला पाहिजे. सध्याच्या युगात लोकशाहीचे कर्तव्य ' लोकांसाठी ' राज्य करणे एवढ्यापुरते मर्यादित राहिले नसून, ' लोकांबरोबर ' राज्य करणे हेही झाले आहे. त्यातून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवायची म्हणजे प्रगतीचा वेग वाढला की राजकीय असंतोष कमी होतो, ही सर्वसाधारण कल्पना चुकीची आहे. खरे म्हणजे परिस्थिती याच्या उलट असते.

लोकांना एखाद्या विषयाचा परिचय करून देण्याचे माध्यम काय, तंत्र कोणते ? बौल्स यांच्या मते राष्ट्रीय व्यापाच्या, त्याचप्रमाणे मर्यादित प्रमाणावरील सामाजिक

प्रश्नांचा ऊहापोह करण्याचे सर्वांत उत्कृष्ट साधन म्हणजे टेलिव्हिजन. पण सध्या भारताला ते पैसा व तंत्रज्ञान या दोन्ही दृष्टींनी महाग आहे. वर्तमानपत्रे हे दुसरे साधन, पण ते तोकडे पडते. तेव्हा सध्याच्या परिस्थितीत उपयुक्त साधन म्हणजे स्थानिक ( ' लोकलाइज्ड ' ) रेडिओ–केन्द्रे. खेडेगावच्या गटागटांना स्वत:चे रेडिओ–स्टेशन असावे आणि त्यावरून वाद–विवाद चालावा. खेड्यातच नव्हे तर शहरांतूनही विद्यार्थी, कामगार–संघ वगैरे मंडळींना वादविवादाची ही सोय उपलब्ध असावी. हल्ली स्वस्त ट्रॅन्झिस्टर मिळू लागले असल्याने अशा प्रकारचे रेडिओ-जाळे विणणे कठीण राहिले नाही. हिंदुस्थानातल्या सध्याच्या आकाशवाणीचा दोष म्हणजे ती " वाजवीपेक्षा जास्त राष्ट्रीय " आहे.

## योगः कर्मसु कौशलम्

विकास–कार्यांना लोकांचा पाठिंबा तर हवाच, पण ती नीट पार पाडण्यासाठी तज्ज्ञ, प्रशिक्षित व्यवस्थापकही हवेत. हिंदुस्थानातील उद्योग-धंद्यांच्या विकासासाठी येत्या ५ वर्षांत सुमारे ३०,००० व्यवस्थापक निरनिराळ्या पातळीवर काम करण्यासाठी लागतील असा अंदाज आहे. पण ते तयार करण्यासाठी काही भारतीय विश्वविद्यालयात ' बिझिनेस मॅनेजमेंट ' या विषयाचा जो पोस्ट-ग्रॅज्युएट कोर्स आहे, तो अगदीच " जुना पुराणा " असून त्यात खूपच सुधारणा व आधुनिकीकरण घडवून आणले पाहिजे, असे प्रांजळ मत परवा अमेरिकेतील मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीच्या ग्रॅज्युएट स्कूल ऑफ बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशनचे प्राचार्य डॉ. आल्फ्रेड सीलये यांनी दिल्लीच्या भेटीत प्रकट केले. आश्चर्याची व खेदाची गोष्ट म्हणज यातली काही विश्वविद्यालये आपल्या कोर्समध्ये इष्ट तो फरक करण्यास नाखूष आहेत. व्यवस्थापन–तंत्राचे शिक्षण देण्यासाठी भारत सरकारने दोन संस्था काढल्या असल्या तरी या विषयांचे मूलभूत शिक्षण देण्याच्या कामी विश्वविद्यालयांनीच पुढाकार घेणे आवश्यक आहे.

पण व्यवस्थापन-शास्त्राचे शिक्षण घेतले की काही तरी चमत्कार घडून येईल, अशी अपेक्षा ठेवली, तर ती फोल ठरेल. व्यवसाय चालविण्याचे शिक्षण जन्मभर चालूच असते, त्यात डिग्री मिळविणे ही केवळ सुरवात आहे. म्हणून प्रशिक्षित मंडळी निरनिराळ्या व्यवसायांत गेल्यानंतरही तेथल्या चालकांनी त्यांचे शिक्षण चालू ठेवले पाहिज आणि अखेर शिक्षण कितीही असले तरी कौशल्य आत्मसात करण्याची महत्त्वाकांक्षा हीच चांगला व्यवस्थापक निर्माण करू शकते. या महत्त्वाकांक्षेची पद्धतशीर जोपासना करण्याकडे व्यवसाय–चालकांनी लक्ष पुरविले पाहिजे. ●

# शिवाजी

## एक अभ्यास


### प्रारंभ

छत्तीस गावांची जहागिरी. पुण्याच्या आसपासची छत्तीस गावे हा शिवाजीच्या उद्योगाचा प्रारंभ होता. हळूहळू याला लागून असलेला विजापूरच्या आदिलशहाचा मुलूख शिवाजीने हस्तगत करण्यास सुरवात केली. सन १६४६ मध्ये—वयाच्या सोळाव्या वर्षी—तोरणा किल्ला घेतला. स्वराज्याच्या तात्पुरत्या कारभारासाठी तोरण्याशेजारच्या राजगडावर बळकट नवीन किल्ला बांधण्याचे काम लगेच सुरू झाले. पुढे कोंडाणा हस्तगत केला. चाकणचा किल्ला घेतला. पुरंदर, रोहिडा, जावळी हे उत्तम किल्ले स्वराज्यात दाखल झाले. शिरवळ ते कल्याण हा मुलूख व निम्मे कोकण यांवर शिवाजीचा अंमल बसला.

हा विस्तार चालू असता विजापूरचा दरबार काही स्वस्थ बसला नव्हता. लहान-मोठे सरदार स्वराज्यावर चालून येतच होते. प्रत्यक्ष शिवाजीचे वडील शहाजीराजे यांनाही आदिलशहाने एकदा कैद करून ठेवले होते. परंतु या सर्व संकटांवर शिवाजीने कधी लढाईने तर कधी केवळ बुद्धिबळाने विजय मिळविले होते.

### तीन वर्षांनंतर

असे होता होता सन १६५९ साल उजाडले. शिवाजीच्या स्वराज्यात यावेळी चाळीस लहानमोठे किल्ले व अंदाजे दीड हजार चौरस मैल मुलूख नांदत होता. मावळातले अनेक देशमुख आता आपपल्या लहानलहान फौजांसह शिवाजीच्या सैन्यात



श्री. ग. माजगावकर

दाखल झाले होते. त्याचे सैन्यबळ असेल या सुमारास दहा हजारांचे आसपास !

हे स्वराज्याचे रोपटे मुळासकट उपटून काढण्यासाठी विजापूर दरबारने एक प्रचंड मोहीम १६५९ मध्ये शिवाजीवर पाठविली. या मोहिमेचा सेनापती होता विजापूर दरबारातला सर्वश्रेष्ठ सरदार—अफझलखान. मोहीम प्रचंड होती. बारा हजार घोडदळ, दहा हजार पायदळ, शंभर हत्ती, अनेक तोफा, तीन वर्षे पुरेल इतका खजिना व इतर युद्धसाहित्य. कसलीही कसूर नव्हती.

निघतानाच या अफझलखानाने भर दरबारात प्रतिज्ञा केली होती, की शिवाजीला जिवंत वा मेलेला विजापुरात घेऊन येईन.

खान तुळजापूर—पंढरपूरमार्गे मजला मारीत शेवटी महाबळेश्वराच्या पायथ्याशी असलेल्या वाईत येऊन दाखल झाला. खानाची अफाट छावणी वाईत पसरली.

## उघड्यावरून गुहेत

शिवाजी यावेळी राजगडाजवळ असलेल्या शिवापट्टण येथे होता. खान विजापूरहून निघाला हे कळल्यावर जवळजवळ दोन महिने शिवाजीने कोणतीही हालचाल





केली नाही. खानाच्या बळाचा तो सारखा अंदाज घेत होता. आपली ताकद किती हे अजमावीत होता. आपल्या सहकाऱ्यांशी सतत विचारविनिमय करीत होता आणि शेवटी मनाशी एक योजना निश्चित करून तो राजगडावरून निघाला व महाबळेश्वराच्या पश्चिमेस असलेल्या प्रतापगडावर त्याने आपले ठाण मांडले.

शिवाजी महाबळेश्वराच्या पश्चिमेस प्रतापगडावर व खान पायथ्याशी वाईत असे तळ पडले. मनसुबे सुरू झाले. खानाचा वकील प्रथम शिवाजीकडे आला. शिवाजीनेही आपला वकील खानाकडे पाठविला. उभयतांच्या भेटीगाठीत पुढील करार ठरला. शिवाजीची व खानाचीही या कराराला मान्यता मिळाली.

## करार

"खानसाहेबांनी आपले सैन्य आहे तसेच छावणीत ठेवावे. एकटया खानसाहेबांनी सशस्त्र निघावे व पालखीत बसून भेटीच्या जागी यावे. त्यांनी आपल्याबरोबर दोन तीनच सेवक घ्यावेत. खानसाहेबांनी भेटीच्या शामियान्यात येऊन थांबावे. खानसाहेबांनी आपल्याबरोबर दहा शूर, नेकजात व सुसज्ज हशम आपल्या रक्षणासाठी आणावेत. परंतु ते एका बाणाच्या टप्प्यावर ठेवावेत. शिवाजीराजांनी गडावरून सशस्त्र यावे व खानसाहेबांची भेट घेऊन त्यांचा आदरसत्कार करावा व दोघांनीही तेथेच बोलणी करावी. शिवाजीराजांनीही आपल्याबरोबर दहा शूर नेकजात व सुसज्ज हशम आणावेत व एका बाणाच्या टप्प्यावर मागे ठेवावेत."

कराराप्रमाणे खानाने आपला फौजफाटा घेऊन महाबळेश्वराचा अजस्र पहाड ओलांडला व कोयनेच्या खोऱ्यात आपली छावणी ठेवून तो शिवाजीला भेटण्यासाठी प्रतापगडावर पालखीत बसून निघाला. निम्म्या प्रतापगडावर भेटीसाठी भव्य शामियाना उभारला होता. खान शामियान्यात येऊन दाखल झाला. करारात ठरले नसतानादेखील खानाने सय्यद बंडा हा अत्यंत शूर व धिप्पाड असा शरीरसंरक्षक आपल्या अगदी जवळ उभा केला होता. गडावर खान आल्याची वर्दी देण्यास गेलेल्या माणसाकडून ही गोष्ट शिवाजीस समजली व त्याने शामियान्यात असलेल्या आपल्या वकिलास गडावर तातडीने बोलावून घेऊन खानास कराराची नेमकी आठवण देण्यास त्यास सांगितले. वकिलाने शिवाजीची विनंती खानाच्या कानावर घातली व खानाने त्याप्रमाणे सय्यद बंडा यास दूर जाण्यास फर्माविले.

शिवाजी शामियान्यात दाखल झाला. खान आपल्या उंच आसनावरून एकदम उठला व आपल्या कमरेची तलवार त्याने आपला वकील कृष्णाजी भास्कर याचेपाशी देऊन तो शिवाजीला सामोरा आला. शामियान्याची भव्य सजावट करून आपला बादशाही आदरसत्कार केल्याबद्दल आपले मत व्यक्त करीत खान शिवाजीजवळ आला व त्याने शिवाजीला आलिंगन देण्यासाठी आपले हात पसरले.

## करारभंग

खानाने शिवाजीला मिठी मारली. धिप्पाड खानापुढे शिवाजी अगदीच खुजा होता. त्याचे डोके खानाच्या छातीला लागले आणि खानाने एकदम शिवाजीची मान आपल्या डाव्या काखेत पकडली! दाबली! क्षणातच आपल्या कमरेची कटयार काढली आणि खस्सकन शिवाजीच्या कुशीत खुपसली. शिवाजीचा अंगरखा फाटला. कटयार खरखरली. कारण अंगरख्याच्या आत चिलखत होते. खानाने केलेला दगा शिवाजीच्या ध्यानात आला व अत्यंत चपळाईने बिचव्याचे तीक्ष्ण पाते खसकन् खानाच्या पोटात त्याने खुपसले. एकदम प्राणांतिक आरोळी खानाने मारली व बाहेर पडणारी आतडी आपल्या हाताने सावरीत सावरीत तो शामियान्याच्या बाहेर पडला व आपल्या पालखीत त्याने अंग टाकले. खानाचा वकील कृष्णाजी भास्कर याने शिवाजीवर आपल्याजवळील तलवारीने वार काढला. परंतु शिवाजीने त्यास ठार केले. शामियान्याबाहेर उभा असलेला सय्यद बंडा खानाची किंकाळी ऐकून आत धावला. परंतु त्याला शिवाजीचा शरीरसंरक्षक जिवा महाल्या याने ठार केले. बाहेर खानाची पालखी भोई उचलीत होते, हे संभाजी कावजी या शिवाजीच्या दुसऱ्या संरक्षकाने पाहिले व भोयांचे पाय छाटून त्याने खानाचे मुंडकेच धडापासून वेगळे केले. इतर झटापटी चालूच होत्या.

## खानाच्या हेतूचा सुगावा

ही घटना घडली १० नोव्हेंबर, १६५९–दुपारी दोन वाजता!

खान जर करारात ठरल्याप्रमाणे सरळ वागता तर शिवाजीनेही आपला शब्द खरा करून खानाची व्यवस्थित भेट घेतली असती. परंतु खान सरळ वागणार नाही याची शिवाजीला पूर्ण खात्री होती. तसेच भेटीला बोलावून या खानाने सन १६३९ मध्ये कर्नाटकातील शिरेपट्टण येथील राजा कस्तुरीरंग याला दगलबाजीने ठार मारले होते. खान मनात शिवाजीला ठार करण्याचेच डाव रचीत होता, यासंबंधी आज अनेक अस्सल लेखी पुरावे उपलब्ध आहेत. शिवाजीने वाईत खानाच्या छावणीत आपले गुप्तहेर पाठवून खानाच्या गुप्त हेतूची आधीच माहिती काढली होती. शिवाय शिवाजीचे वकील पंताजी गोपीनाथ खानाच्या छावणीत वाटाघाटीसाठी गेले तेव्हा त्यांनाही खानाच्या दगाबाजीचा सुगावा लागला होता. म्हणून गडावरील मुत्सद्दी-मंडळाने प्रतिकाराची गुप्त तयारी करूनच खानाच्या भेटीस जाण्याचा सल्ला शिवाजीला दिला होता. ही गुप्त तयारी होती म्हणूनच खानाचा डाव उधळला व शिवाजी विजयी झाला.

आणि यदाकदाचित विपरीत होऊन शिवाजीच खानाच्या तावडीत सापडून ठार झाला असता, तरीही खानाचा पराभव अटळच होता.

कारण काय! या कारणातच शिवाजीचे पहिले क्रांतिकारक कार्य सामावलेले आहे.

## विहंगावलोकन

पाहा; शिवाजीपूर्वी जवळजवळ सात–आठशे वर्षे काय प्रकार चालू होते :–

१ : गझनीच्या महंमदाला पहिल्या तीन स्वाऱ्यांत यश मिळाले तेव्हा त्याला प्रतिकार करण्यासाठी पंजाबच्या अनंगपाळ राजाने कनोज, कलिंजर, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणच्या राजांचे सहाय्य मिळवून लढाईची जंगी तयारी केली. हा सुमार होता इ. स. १००८ ते १००९ चा. डॉ. गो. स. सरदेसाई लिहितात, "धर्माचा पाडाव व देवालयांचा विध्वंस ह्यांचे योगाने रजपुतांस मुसलमानांविषयी विशेष त्वेष चढला होता. इतके अपार सैन्य समरांगणी पूर्वी कधीही आले नव्हते." महंमदास ही बातमी समजताच तो दबत दबतच पुढे आला. उभय फौजांचा तळ अटकनजीक सिंधूच्या पूर्वेस कच्छचे मैदानात पडला. "आरंभी हिंदूंची सरशी होती. पुढे एके दिवशी लढाईचे तोंड लागून अनंगपाळ निकराने लढत असता त्याचा हत्ती तीर व नक्तेलाचे गोळे लागून घाबरून रणभूमीवरून पळत सुटला. त्याबरोबर आपला अधि. पती पळाला असे वाटून हिंदी फौज युद्ध सोडून पळत सुटली. अनंगपाळाचे ठिकाण लागले नाही. महंमुदास विजय प्राप्त झाला."

## दिल्ली गेली

२ : या पराभवामुळे सरहद्दीचा तट कोसळला आणि आक्रमणांचा वेग वाढला. गझनीच्या महंमदाच्या अकरा स्वाऱ्या झाल्या. नंतर आला शहाबुद्दीन ऊर्फ महंमद घोरी. याची पाचवी स्वारी सन ११९३ मध्ये झाली. स्थानेश्वर येथे पृथ्वीराज चव्हाणाच्या नेतृत्वाखाली अफाट सेना प्रतिकारासाठी सज्ज झाली. दीडशे रजपूत राजांनी गंगोदक हातात घेऊन शपथा घेतल्या होत्या, की शत्रूस जिंकू किंवा मरण पत्करू. स्थानेश्वर येथे उभय सैन्यांचा तळ पडला. "या युद्धात हिंदूंची संख्या अफाट असून त्याजवर एकदम चालून जाण्याची शहाबुद्दीनची छाती नव्हती. लढाई सुरू झाल्यावर शहाबुद्दीनचा मोड होऊन हिंदू फौज त्याच्या पाठीस लागली. इतक्यात ते निर्धास्तपणे फाकले आहेत, असे पाहून एकदम शहाबुद्दीन त्याजवर परत फिरला. त्याबरोबर रजपूत सेनेची वाताहत झाली. पृथ्वीराज शत्रूच्या हाती सापडला. त्यास त्यांनी ठार मारले. मुसलमानास मागे हटविण्याचा रजपुतांनी केलेला शेवटचा जोराचा प्रयत्न हाच होय.

३ : यानंतर दिल्लीत परकीयांची राजवट स्थिर झाली. घोरी संपले. गुलाम वंश संपला. खिलजी गादीवर आले. नर्मदा ओलांडून दक्षिणेतील स्वराज्ये धुळीस मिळविणारा अल्लाउद्दीन याच खिलजी घराण्यातला. हा दक्षिणेत घुसला फक्त आठ हजार स्वारांची तुकडी घेऊन. महाराष्ट्रातील देवगिरीवर यादव वंशातला रामदेवराव राज्य करीत होता. फौज थोडी व मुलूख परका म्हणून अल्लाउद्दीनान आधीच थाप ठोकून दिली, की दिल्लीहून पाठोपाठ बरीच मोठी फौज येत आहे. ही थाप ऐकूनच रामदेवराव किल्ल्यात लपून बसला. अल्लाउद्दीनाने देवगिरी शहर

मनसोक्त लुटून काढले. इतक्यात रामदेवरावाचा मुलगा शंकरदेव बाहेरून मोठी फौज घेऊन चालून आला. अल्लाउद्दीनचा पराभव होण्याची वेळ आली. परंतु ऐन वेळी किल्ल्याच्या वेढ्यासाठी ठेवलेले अल्लाउद्दिनाचे स्वार त्याच्या मदतीला धावून येत असता शंकरदेवाच्या विजयी फौजेस वाटले, दिल्लीची मोठी फौज आली. "आता आपला निभाव नाही, या खोटया भीतीने भेदरल्यामुळ ते (शंकरदेवाचे लोक) रणांगण सोडून सैरावैरा पळू लागले. त्याबरोबर मुसलमानांस जय मिळाला."

## विजयनगर गेले

४ : तालीकोट. सन १५६५. विजयनगरचे साम्राज्य उद्ध्वस्त करण्यासाठी दक्षिणेतील सर्व पातशाह्यांचे सैन्य तालीकोट येथे जमले. विजयनगरचा रामराया आपल्या यशाविषयी पूर्ण खात्री बाळगून होता. तोही मली मोठी फौज घेऊन निघाला. या फौजेत एकंदर सहा लाख पायदळ व एक लाख स्वार होते, असे या वेळी प्रत्यक्ष हजर असलेला कूटो हा युरोपियन प्रवासी लिहितो. हत्तींची संख्या दोन हजार होती, असे प्रसिद्ध इतिहासकार फेरिस्त्याने लिहिले आहे. प्रतिपक्षाची फौज सुमारे याच्या निम्मी होती. मंगळवार, तारीख २३ जानेवारी रोजी लढाईला तोंड लागले. रामराया या वेळी नव्वद वर्षांचा वृद्ध असूनही एखाद्या जवानाप्रमाणे शूर व धाडसी होता. तो पालखीत बसून लढाईची व्यवस्था पाहात होता. पालखीत न बसण्याबद्दल त्याच्या लष्करी अधिकाऱ्यांनी त्याला पुष्कळ विनवणी केली. परंतु तो कोणाचेही ऐकेना. काही काळ तर लोकांना अधिक प्रोत्साहन मिळावे म्हणून तो एका बहुमोल व उच्च सिंहासनावरून द्रव्याची व सुवर्णाची इनामे वाटीत होता. प्रतिपक्षाच्या तोफखान्यामुळे रामरायाच्या सैन्याच्या मध्य भागात थोडा गोंधळ झाला व पांगापांगीचा लाभ घेऊन पाच हजार शत्रुस्वार रामरायाच्या रोखाने निघाले. इतक्यात हुसेन निजामशहाचा एक हत्ती बेफाम होऊन पालखीकडेच जोराने धावत आला. भोयांनी जिवाच्या भयाने पालखी टाकून पळ काढला. रामराया पकडला गेला. निजामशहाने त्याचे डोके तत्काळ कापून एका उंच भाल्यावर लावले. रामरायाची फौज उधळली. "लढाई व नंतरचा पाठलाग यांमध्ये एकंदर एक लाख काफर लोक नर्कात रवाना झाले असे चांगल्या वाकबगार लोकांनी म्हटले आहे."

## अवघा हिंदुस्थान बुडाला

उत्तरेतील आणि दक्षिणेतील शिवाजीपूर्वीच्या या चार निर्णायक लढाया. हिंदुस्थानचा सारा नकाशाच वरील चार लढायांनी पालटून टाकला.

या पार्श्वभूमीवर शिवाजीचे प्रतापगडावरील युद्ध पाहा. चतुरंगदलसंभारसहित उघड्या मैदानावर शत्रूंशी झुंज देण्याची जुनी, अवजड, बोजड व आत्मघातकी युद्धपद्धती रद्द करून त्याने अत्यंत सुटसुटीत, अत्यंत कार्यक्षम, अत्यंत कमी खर्चाची,

आपला कमीत कमी व शत्रूचा जास्तीत जास्त नाश करणारी नवीन क्रांतिकारक पद्धती शोधून काढली. शिवाजीने युद्धाचे तंत्रच आमूलाग्र पालटून टाकले. ही क्रांती समजल्याशिवाय प्रतापगडचे युद्धही समजणार नाही.

**क्रांतिकारक तंत्र**

१ : शक्यतो उघडे मैदान टाळून किल्ले, खिंडी, जंगले यांच्या आश्रयाने लढाई देणे हा महाराजांच्या नवीन युद्धतंत्रातील पहिला भाग. यामुळे महाराजांच्या शंभर माणसांना शत्रूच्या हजार दोन हजार माणसांचे सहज बळ चढे. अफझलखान प्रचंड फौजफाटा घेऊन वाईत आला आहे हे समजल्यावर महाराज राजगडावरून प्रतापगडावर येऊन राहिले, ते याच कारणास्तव. अगदी प्रथमपासूनच महाराजांनी खानाला डोंगराळ भागात खेचून आणण्याचे मनाशी नक्की केले होते. खानानेही महाराज उघड्यावर यावेत म्हणून सुरवातीपासूनच आटोकाट प्रयत्न केले. महाराजांच्या श्रद्धास्थानी असलेली तुळजापूर–पंढरपूरसारखी देवस्थाने त्याने उद्ध्वस्त केली ती याचसाठी. फलटणचे बजाजी नाईक-निंबाळकर हे महाराजांचे मेहुणे-सईबाई-राणीसाहेबांचे भाऊ काहीही अपराध नसता यांच्या गळचात साखळदंड बांधून खानाने त्यांचा छळ चालविला होता तोही याच हेतूने. परंतु महाराज अढळ होते. सह्याद्रीच्या दाट जंगलात, अवघड डोंगरकपाऱ्यात, खानाची फौज प्रथम आली पाहिजे हाच त्यांचा आग्रह व त्याप्रमाणे त्यांनी वकिलामार्फत बोलणी करून खानाला त्याच्या साऱ्या फौजफाटचासह महाबळेश्वराचा अजस्र डोंगर चढायला लावून जावळीच्या दाट झाडीत यायला भाग पाडले. खानाला अडचण समजत होती. परंतु त्याला प्रत्यक्ष शिवाजी हवा होता आणि तो तर काही केल्या डोंगरातून बाहेर यायला तयार नाही ! खानाचा निरुपाय झाला म्हणूनच त्याने जावळीत पाऊल ठेवले. पाश्चात्यांच्या आधुनिक इतिहासाकडे पाहिले तर असे दिसते, की आपल्याला हवा त्या ठिकाणी शत्रू खेचून आणणे हे अलौकिक युद्धकौशल्य नेपोलियनचे वैशिष्ट्य म्हणून सांगितले जाते. महाराजांनी हे कौशल्य अनेकदा व्यक्त केले आहे. प्रतापगडाचा प्रसंग हा त्यातलाच एक सर्वोत्कृष्ट भाग !

२ : शत्रूच्या गाफीलपणाचा पुरेपूर फायदा घेणे हे महाराजांच्या नवीन तंत्राचे दुसरे वैशिष्टच. खानाची फौज प्रथम गाफील नव्हती. परंतु 'शिवाजी खानाला फारच घाबरला आहे. बाहेर वाईत येऊन खानाला भेटण्याची त्याला छातीच नाही,' अशा वावडचा खानाच्या फौजेत हेतुपुरस्सर पसरवून महाराजांनी ती गाफील राहावी अशी व्यवस्थाच केली होती. आधी जावळीचे दाट जंगल आणि त्यात गाफीलपणा यामुळे अफझलखानाच्या फौजेचा निकाल लागणार, हे ठरूनच गेले होते.

**योजना**

३ : योजना हा या तंत्रातील फार महत्त्वाचा भाग. एक माणूस इकडचा तिकडे होण्याने घोटाळे होतात. म्हणून कुणी कुठे दबा धरून राहायचे, किती माणसे कुठे

ठेवायची, केव्हा हल्ले करायचे याचा तपशील महाराज अत्यंत बारकाईने ठरवत असत. खानाची फौज जावळीच्या खोऱ्यात आवळली गेल्यावर भेटीच्या आधी आठ दहा तास महाराजांची माणसे आपापल्या ठिकाणी दबा धरून बसायला गेली. त्यांना महाराजांनी कसकसे हुकूम दिले पाहा—

" बांदल नाईक ! तुम्ही तुमच्या जमावानिशी जावळीच्या व पाराच्या झाडीत दडून राहा. कान्होजी नाईक ! तुम्ही आणि बाजी सर्जेराव यांनी पाराच्या वाटा रोखणे ! खानाचे लष्कर पारात आहे. ते कदाचित डोंगर चढून वर येईल, तर त्याला डोंगर न चढू देणे ! अवघे लष्कर बुडविणे ! हैबतराव व बाळाजी नाईक शिळमकर ह्यांना आम्ही बोचेघोळीचे घाटात ठेवलेले आहेत ! ते खानाच्या लष्करास घाट चढू देणार नाहीतच. नेताजी ! इशारतीचे आवाज गडावर होताच तुम्ही घाट माथ्यावरोन खाली खानाच्या लष्करात उतरोन चालोन येऊन मारामारी करणे. " प्रत्येकापुढे निश्चित कामगिरी ठेवणे व त्या त्या कामगिरीला तो तो योग्य मनुष्य किंवा माणसे निवडणे यात योजनेच्या यशाचे बीज असते.

हे युद्धतंत्र महाराजांनी वापरले म्हणून त्यांना त्यांच्यापेक्षा हजारपट बलाढ्य असणाऱ्या शत्रूवर नेहमी विजयच मिळत गेले. मलिकंबर, शहाजीराजे यांनी या युद्धतंत्राचा वापर महाराजांपूर्वी केला होता. परंतु महाराजांनी त्याचे व्यवस्थित शास्त्र तयार केले. सन ७११ (महंमद बिन कासिम) पासून या देशात उठलेली पराजयाची प्रचंड लाट या नवीन सशास्त्र युद्धतंत्राने महाराजांनी पार उलटवून टाकली.

### स्वराज्याची महत्प्रेरणा

परंतु दुसरी तितकीच महत्त्वाची गोष्ट येथे ध्यानात घेणे अवश्य आहे, की केवळ या युद्धतंत्राचाच अवलंब शिवाजीने केला असता तर त्याची योग्यता फारतर एखाद्या महत्त्वाकांक्षी शेरखान वा हैदरअल्ली यांच्यापेक्षा इतिहासात अधिक गणली गेली नसती. युद्धतंत्र हे व्यावहारिक यशाचे कारण झाले. परंतु त्यामागील प्रेरणा हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. इतिहासाने हे अगदी आता स्पष्टपणे सिद्ध केले आहे, की महाराज अगदी प्रथमपासून 'स्वराज्याची प्रेरणा' च मावळ्यांमध्ये निर्माण करीत होते. ही महत्प्रेरणा त्यांनी मावळातील लहान लहान देशमुखांना दिली, म्हणून हे लोक आपापसांतील मारामाऱ्या थांबवून आपापल्या शिबंदीनिशी स्वराज्य विस्ताराच्या कामाला हिरीरीने लागले. स्वराज्यांतील क्षुद्रातल्या क्षुद्र माणसालाही खात्री होती, की महाराज स्वतःसाठी हा राज्यविस्तार करीत नसून सर्वांसाठी त्यांचा हा प्रयत्न आहे. हा विश्वास, ही निष्ठा, ही महत्प्रेरणा महाराजांपूर्वी उभ्या हिंदुस्थानात एकाही राजाला निर्माण करता आली नाही. "आदिकुलदेव स्वयंभू. त्यांणी आम्हास यश दिले व पुढे तो मनोरथ 'हिंदवी स्वराज्य' करून पुरविणारा आहे. हे राज्य व्हावे हे श्रींच्या मनात फार

आहे, " हे पत्र सोळा वर्षांचा शिवाजी एका सहकाऱ्याला पाठवितो यातच त्याच्या जीवताचे सार काय ते स्पष्ट होत आहे. अफझलखानाच्या भेटीला महाराज निघाले तेव्हा विपरीत होईल व आपणच मारले जाऊ ही शक्यता ध्यानात घेऊन स्वराज्याची पुढील व्यवस्था त्यांनी चोख करून ठेवली होती. "एखादे समयी युद्धी प्राणनाश जहाला तरी संभाजी राजे आहेत. त्यांस राज्यावर बसवून त्यांचे आज्ञेत तुम्ही वागावे, " हे महाराजांचे उद्गार आहेत ! नेताजी पालकराकडे पुढील मुख्य सूत्रे त्यांनी सोपवून ठेवली होती. प्रतापगडावर महाराज प्राणाशी खेळ मांडून बसले होते तरी, स्वराज्यातला प्रत्येक किल्लेदार आपल्या किल्ल्यावर जागरूक होता. कुठेही गडबड नाही. गोंधळ नाही. बहुसंख्य मराठ्यांमध्ये महाराज ही व्यक्ती निरक्षेप 'स्वराज्यनिष्ठा' निर्माण करू शकले याचा पुरावा म्हणजे ते निवर्तल्यावर प्रत्यक्ष दिल्लीपती औरंगजेब पाच लाख फौजेनिशी स्वराज्याची पाळेमुळे खणून काढण्यासाठी महाराष्ट्रात आला असता येथील संताजी-धनाजीसारख्या पोरासोरांनी औरंजेबालाच त्याच्या फौजफाटयानिशी कबरस्तानात गाडून टाकले, हा होय. स्वराज्याच्या या महत्प्रेरणेमुळेच 'महाराजानंतर काय ?' हा प्रश्न तेव्हा निर्माण झाला नाही.

ही स्वराज्याची महत्प्रेरणा व नवीन युद्धतंत्र यांमुळे प्रतापगडचे युद्ध हे इतिहासात अजराअमर होऊन राहिले आहे. म्हणूनच सुरवातीला वर म्हटले, की महाराज जरी खानाच्या दगलबाजीला बळी पडले असते तरी खानाचा सर्वनाश ही काळ्या दगडावरची रेघ होती. त्याची सारी फौज मराठ्यांच्या ताब्यात होती आणि प्रत्यक्ष खानही कुठे पळून जाऊ शकत नव्हता. सुदैवाने महाराज जिंकले आणि खानाची प्रचंड मोहीमही बरबाद झाली.

## दक्षिण साफ झाली

या पराभवाच्या भयंकर फटकाऱ्याने आदिलशाही जवळजवळ हतप्रभ झाली. महाराजांना दक्षिणेत मोठा शत्रू उरला नाही. त्यांची नजर यापुढे उत्तरेत दिल्लीला जाऊन भिडली, हेही या युद्धाचे आणखी एक वैशिष्टय होय.

या वेळी महाराजांचे वय होते अवघे एकोणतीस वर्षांचे !

★ ★ ★

## सुराज्याची उभारणी

महाराजांचे ५० वर्षांचे अल्पायुष्य मुख्यत्वे लढाया आणि मोहिमा यांच्या भाऊगर्दीत खर्च झाले आणि त्यामुळे स्वराज्याचे सुराज्य करण्यास त्यांना फारशी सवड सापडली नाही हे खरे आहे, परंतु महाराजांची सुराज्यनिर्मितीची दृष्टी काय होती, ते स्वराज्य कशाला म्हणत, याची कल्पना त्यांच्या प्रत्यक्ष कारभारावरून सहज येते. केवळ मोहिमा, केवळ लढाया, केवळ प्रतिकार, केवळ विरोध हा महाराजांच्या स्वराज्याचा अर्थच नव्हता. स्वराज्यातून सुराज्य निर्माण झाले नाही, तर लोक

यापेक्षा तो मोगल बरे असे म्हणू लागतील याची महाराजांना जाणीव होती. म्हणूनच जेवढा भाग हाती येईल, तेथपर्यंत स्वराज्याच्या सीमा विस्तारतील, तेथपर्यंत महाराज सुराज्याचे निर्दोष यंत्रही उभे करण्याची फार दक्षता बाळगीत.

### संरक्षण

पहिला भर अर्थातच संरक्षणावर असे. जसे स्वराज्य वाढले तसे महाराजांचे सैन्यबळही वाढले. सुरवातीला काय हजार-बाराशे मावळे असतील तेवढेच महाराजांचे सैन्य. परंतु पुढे पुढे हा आकडा एक लाखाच्या आसपास गेला होता. तीच गोष्ट किल्ल्यांबाबत. जुने दुरुस्त करून आणि नवे बांधून किल्ल्यांची एकूण संख्या अडीचशेपर्यंत गेली होती. सैन्य अद्ययावत शस्त्रास्त्रांनी परिपूर्ण करण्याची तर त्यांची सारखी धडपड असे. इंग्रज वखारवाल्यांकडून ते दारूगोळा खरेदी करीत असत व फ्रेंचांपासून १६७४ मध्ये त्यांनी अठ्ठ्याऐंशी तोफा व तीन हजार मण शिसे घेतल्याचा उल्लेख सापडतो.

### आरमार

परंतु या संरक्षणाबाबत याहीपेक्षा महत्त्वाची स्वतंत्र अशी महाराजांची कामगिरी म्हणजे आरमार ही होय. दिल्लीला एकामागून एक सल्तनती आल्या. दक्षिणेतही पाच पातशाह्या होत्या. परंतु कुणाचेही लक्ष समुद्राकडे गेले नाही. महाराजांना समुद्रकिनाऱ्याच्या संरक्षणाचे महत्त्व अगदी प्रथमपासूनच समजले असल्याने प्रतापगडाच्या युद्धाच्याही आधी–सन १६५९ पूर्वी–त्यांनी लढाऊ गलबते बांधण्यास सुरवात केली होती. इ. स. १६६६ मध्ये महाराजांचे आरमार इतके मोठे झाले होते, की त्याचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य इंग्रज, पोर्तुगीज, डच, सिद्दी यांपैकी कोणातही नव्हते. मालवणचा सिंधुदुर्ग हे त्यांचे मुख्य आरमारी ठाणे असून दर्यासारंग, दौलतखान, इब्राहिमखान, सिद्दी, मिस्त्री, मायनाईक भंडारी यांचेकडे या आरमाराचे आधिपत्य होते. आरमार हे एक स्वतंत्र राज्यांग आहे, याची ओळख मध्ययुगीन भारतात फक्त एकाच राज्यकर्त्याला झाली-राजे शिवाजी.

### शत्रुमित्रांची पारख


संरक्षणव्यवस्थेतील तिसरा दुवा म्हणजे शत्रुमित्रांची अचूक पारख. कोकणात स्वराज्याला लागूनच असलेली शिद्यांची सत्ता महाराजांना कधीही सहन झाली

स्वा दि ष्ट मि ठा ई सा ठी आ म ज न ते ची नि व ड

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे
स्वा दि ष्ट मि ठा ई सा ठी आ म ज न ते ची नि व ड



नाही. परंतु उत्तरेकडे दूरवर असलेले रजपूत मात्र त्यांनी मायेने जवळ केले. जो शिवाजी अफझलखानाला भेटायला प्रतापगडावरून वाईत यायला तयार नव्हता तोच शिवाजी सुमारे एक लाख मोगली फौजेनिशी आपल्यावर चालून आलेल्या जयसिंगाला भेटण्यासाठी त्याच्या छावणीत निर्धास्तपणे जातो; तेथे मुक्काम करतो; जयसिंगावर विसंबून आग्र्याला प्रत्यक्ष औरंगजेबाच्या मगरमिठीत आपणहून सापडण्याचा धोका पत्करतो; या घटना लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. काही झाले तरी आपले ते आपलेच. आग्र्याहून महाराज निसटले यात जयसिंगांचे पुत्र रामसिंग यांचा फार मोठा वाटा होता आणि यासाठी रामसिंगांना फार जबर किंमतही द्यावी लागली. औरंगजेबाची त्यांचेवर कायमची इतराजी झाली व दूर आसामात उपेक्षित अवस्थेत त्यांना शेवटचे दिवस काढावे लागले. औरंगजेबाच्या दरबारात सामान्य हजार दोन हजारी सरदार असणाऱ्या बुंदेलखंडाच्या छत्रसालाला महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याची कीर्ती समजली आणि १६७६ साली तो दक्षिणेत आला असता एका रात्री महाराजांना अचानक चारदोन स्वारांनिशी भेटायला आला. महाराजांनीही निःशंक मनाने त्याची भेट घेतली. त्याला उठावणीची प्रेरणा दिली आणि अवघ्या सहा वर्षांत छत्रसालाने बुंदेलखंड स्वतंत्र केला. एकदा तर औरंगजेबाची राजधानी असलेले आग्रा शहरच त्याने लुटून आणले. १६७६ साली महाराज गोवळकोंड्याच्या कुतुबशहाशी मैत्रीचा तह करतात-कारण मादण्णा व आक्कण्णा या कुतुबशहाच्याच तेलंगी मंत्र्यांनी विश्वासाचा शब्द दिला होता. महाराजांच्या दक्षिण दिग्विजयात या मंत्रिद्वयाचा फार मोठा वाटा होता हे विसरून चालणार नाही. रामचंद्रपंत अमात्य महाराजांच्या अष्टप्रधान

मंडळींपैकी एक होते. त्यांचा ' राजनीती ' हा ग्रंथ म्हणजे महाराजांच्या ध्येयधोरणाचे प्रतिबिंबच होय. इंग्रजांना महाराजांनी कसे अचूक ओळखले होते, हे राजनीतीतील पुढील अवतरणावरून ध्यानात येईल. "टोपीकरास या प्रांती प्रवेश करावा, राज्य वाढवावे, स्वमते (धर्म) प्रतिष्ठावी हा पूर्णाभिमान. तदनुरूप स्थलोस्थळी कृत्यकार्येही झाले आहेत. त्यात ही हट्टी जात. हातास आले स्थळ मेल्याने सोडावयाचे नव्हेत. यास्तव त्यास नेहमी जागा (वखारीसाठी इ.) कधीही देऊ नये." इंग्रजांशी महाराजांनी केलेले करार पाहिले म्हणजे त्यांच्या सावध दूरदर्शीपणाची पूर्ण खात्री पटते.

## हेरखाते

हेरखाते हेही संरक्षणाचे एक प्रधान अंग आहे. महाराजांचे हेरखाते अत्यंत कार्यक्षम, दक्ष व हरहुन्नरी होते. महाराजांनी चंद्रराव मोऱ्यांचा पराभव करून जावळी कबजात आणली. सन १६५६ मध्ये चंद्रराव पळून रायगडास गेला. महाराजांनी रायगडही जिंकला व चंद्रराव महाराजांच्या ताब्यात आला. महाराजांनी चंद्ररावास सन्मानाने वागविले. परंतु अंतस्थपणे चंद्रराव विजापूरकर आदिलशहाशी संधाने बांधून महाराजांविरुद्ध कारस्थाने रचीत होता. चंद्ररावाचा पत्रव्यवहारच महाराजांच्या हेरांनी पकडला. महाराज संतापले आणि त्यांनी चंद्ररावाची गर्दन तत्काळ उडवली. १६५७ मध्ये शहाजहान बादशहा दिल्लीला आजारी पडला. मोगल बादशहाच्या आजारपणाच्या बातम्या अत्यंत गुप्त ठेवण्यात येत; कारण बादशहा आजारी आहे हे समजताच राजपुत्र सत्तेसाठी मारामाऱ्या सुरू करीत. शहाजहान आजारी पडला तेव्हा औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार होता. त्याच्या दिल्लीतील हस्तकांनी शहाजहानच्या आजारपणाची खबर अत्यंत गुप्तपणे औरंगजेबाला कळवली व त्याप्रमाणे औरंगजेब दक्षिणेकडील मोहिमांची व कारभाराची कामे अर्धवट सोडून तडक दिल्लीकडे निघाला. परंतु आश्चर्य असे की ज्यावेळी ही गुप्त खबर औरंगजेबाला समजली त्याचवेळी ती महाराजांनाही समजली व त्याप्रमाणे त्यांनी मोर्चे फिरविले. दिल्लीत सत्तेसाठी यापुढे गोंधळ माजणार, हे ओळखून त्यांनी मोगल ठाण्यांवर प्रथमच छापे घालण्यास सुरवात केली. जुन्नरचे ठाणे लुटून महाराजांनी उत्तरेकडील मोगली सत्तेला पहिला धक्का दिला. पुढे सन १६६६ च्या मे महिन्यात महाराज आग्र्याला औरंगजेबाच्या अटकेत पडले. तरबेज हेरखाते महाराजांच्या हाताशी होते म्हणूनच त्यांची सुटका होऊ शकली. औरंगजेबाची अत्यंत गुप्त कारस्थानेही महाराजांना समजत असत. ज्या दिवशी महाराज निसटले, त्याच्या दुसऱ्याच दिवशी औरंगजेब त्यांना सरदार फिदाई हुसेनच्या वाड्यात हलविणार होता. ही उचलबांगडी म्हणजे महाराजांना कायम अटकेत ठेवण्याचा डावच. उद्या आपल्याला या वाड्यात हलविले जाणार, ही गुप्त बातमी महाराजांना समजली आणि निसटून जाण्याचा आपला बेत त्यांनी तडकाफडकी अम-

लात आणला. एक दिवस उलटता तर महाराजांचे शवच फारतर आग्र्याच्या वेशी-बाहेर पुढेमागे पडू शकले असते. आग्र्यात महाराजांचे हेरखाते केवढे खोलवर पसरले होते याचा आणखी एक पुरावा पाहा. महाराज निसटल्यावर ग्वाल्हेरजवळील नरवरच्या ठाणेदाराने औरंगजेबाला एक पत्र पाठविले. शिवाजीची तीनशे माणसे ग्वाल्हेरवरून बादशहाचा अस्सल शिक्कामोर्तब असलेले परवानापत्र (Pass Port) दाखवून राजरोस निघून गेली, असा मजकूर या पत्रात आहे. ठाणेदाराचे हे पत्र जयपूरच्या दफ्तरखान्यात आज पाहायला सापडते. मगराच्या दाढेतील मणी एक वेळ हाती लागेल; परंतु औरंगजेबाचा शिक्कामोर्तब असलेले पत्र शिवाजीच्या माणसांनी मिळविणे त्याहूनही कठीण ! परंतु महाराजांच्या हेरखात्याने ही कामगिरी केली खरी !

परकीयांच्या दरबारातील महाराजांचे वकील फार हुशार. स्वराज्याची अहोरात्र काळजी वाहणारे होते. सरहद्दीवरील ठाणी अत्यंत जागरूक असत. महाराजांच्या ताब्यातील समुद्रावरून एकही चोरटे गलबत गस्तीतून निसटत नसे.

असा होता महाराजांच्या स्वराज्याचा कडेकोट बंदोबस्त. स्वराज्याची पहिली निकड म्हणजे मिळवलेले राखणे, हाती आलेले सांभाळणे हीच होय. निदान महाराज तसे मानीत. संरक्षणाचे वरील सर्व अंगोपांगांनी पूर्ण सिद्धता केल्यावरच महाराज इतर अंतर्गत गोष्टींकडे वळत.

## वतनदारांचे नियंत्रण

अंतर्गत सुराज्य-निर्मितीतील पहिले पाऊल म्हणजे गुंड, मग्रूर व बेजबाबदार वतनदारांच्या कचाट्यातून गरीब रयतेची सुटका करून राजसत्तेचा वचक व तिच्याबद्दल योग्य तो आदर थेट तळापर्यंत पोहोचविणे हे होय. हा वचक व आदर कसा प्रस्थापित करायचा याचे प्रत्यक्ष शिक्षण महाराजांना दादोजी कोंडदेवांकडून लहानपणीच मिळाले होते. युद्धतंत्र जसे महाराजांनी आपले वडील शहाजीराजे यांचेकडून उचलले, तसे रयतेवर अंमल कसा बसवावा याचे कसब त्यांनी दादोजींकडून आत्मसात केले होते. स्वराज्याच्या प्रारंभीची गोष्ट. मावळातले वतनदार-देशमुख शिवाजीला हळूहळू मानू लागले होते. काही मात्र साफ जुमानीत नसत. दादोजी दयामाया न दाखविता अशा कित्येक शिरजोरांना कडक शिक्षा करून वठणीवर आणीत होते. खेडबाऱ्यातला रामाजी चोरघे याला दादोजींनी साफ ठार मारला. गुंजण मावळातला फुलजी नाईक शिळमकरला बांधून झोडपून काढले. भोर परगण्यात कृष्णाजी नाईक बांदल फार दांडगाई करीत असे. जबरदस्तीने रयतेकडून स्वतःच कर वसूल करी. रगेल तर इतका की एकदा प्रत्यक्ष दादोजींच्या घोड्यांच्या शेपट्याच त्याने तोडून टाकल्या. दादोजींनी त्याला खूप समजावले. शेवटी ऐकेना, तेव्हा एकदम हातपाय कलम करून टाकले. हे सारे शिवबा लहानपणापासून पाहात होता. वयात आल्यापासून स्वतः अमलात आणीत होता. सभासद या

संबंधात लिहितो– " अदिलशाही, निजामशाही, मोगलाई देश (शिवाजीने) काबीज केला. त्या देशातील रयत पाटील, कुळकर्णी व देशमुख यांचे हाती. यांनी कमावीस करावी व सरकारात मोघम टक्का द्यावा. या मिरासदारांनी हजार दोन हजार रुपये गावातील रयतेपासून वसूल करावे व त्यापैकी दोन-तीनशे रुपये दिवाणात (सरकार) खंडमक्ता म्हणून भरावे. त्यामुळे मिरासदार पैकेकरी होऊन गावात हुडे, वाडे, कोट बांधून, प्यादे व बंदुकी ठेवून बळावले. दिवाणास (सरकारी अधिकाऱ्यास) भेटणे नाही. दिवाणाने त्यास दोष दिल्यास हे मिरासदार त्याच्याशी भांडावयास उभ राहत. या प्रकारे मिरासदार पुंड होऊन बळावले. म्हणून राजाने देश काबीज करून हुडे, वाडे-कोट पाडिले. एखादा कोट नामांकित असला तर त्यात सरकारी ठाणे ठेवले. मिरासदारांच्या हातातील सत्ता काढून घेतली. देशमुख देशपांडे, पाटील, कुळकर्णी यास सरकारी करांच्या वसुलीबद्दल द्यावयाचा हक्क बांधून दिला. जमीनदारांनी वाडा बुरुजांचा बांधू नये, घर बांधून राहावे, ऐसा मुलुखाचा बंदोबस्त केला. "

### सोन्याचा नांगर

पुढील पावले कशी टाकावीत हेही महाराजांना दादोजीपंतांनी शिकविले होते. दहा-बारा वर्षांच्या शिवबाला हाताशी धरून दादोजींनी शहाजीराजांच्या पुण्यातील जहागिरीचा कायापालट घडवून आणला होता. त्यांनी व्यवस्था पाहायला सुरवात केली तेव्हा पुणे प्रांत उजाड होता. शहाजीराजांनी शिवाजी जन्माच्या सुमारासच पुणे प्रांतांत विजापूरकरांविरुद्ध एक छोटेसे बंड पुकारले होते. परंतु ते तत्काळ मोडण्यात आले आणि सारी जहागिरी आणि पुणे प्रांत बादशाही सरदारांनी उध्वस्त करून टाकला. दादोजी आले आणि–"पंतांच्या मनानं हट्ट घेतला, की पुणे प्रांताची काया पालटून टाकायची. हे दळिद्र, हे ओसाडपण अन् हा उदासपणा मी घालवीन. बादशाही सरदारांनी पुणे प्रांतावरून गाढवाचा नांगर फिरविला. मी सोन्याचा फिरवीन. "

आणि पंतांनी अक्षरश: सोन्याच्या नांगराने भुई नांगरली. लाकडाच्या नांगराला सोन्याची फाळी लावली. लोकांचा उत्साह दुणावला. जमिनीची पंतांनी मोजणी करून प्रतवारी लावली. लोकांना तगाई देऊन उत्पन्न वाढविली. गावोगाव रामोशांना जागते ठेवून व हत्यारबंद स्वारांची तुकडी सदैव तयार ठेवून चोऱ्या, वाटमाऱ्या, दरवडे वगैरे प्रकार बंद केले. जंगली जनावरे बक्षिसे लावून ठार केली व शेतकऱ्यांचे अनेक किरकोळ उपद्रव मिटविण्याची खूप काळजी घेतली.

महाराज मोठेपणी याबाबत काय करीत असत व पुढील त्यांच्याच एका पत्रावरून सहज ध्यानात यईल. एका सरकारी अधिकाऱ्याला ते लिहितात–

" सुभ्यातील गावातून फिरावे. ज्या गावी जाशील त्या गावच्या कुणब्यांना गोळा करावे. ज्याला ते शेत करावयास दिले ते करण्यास त्याजपाशी माणूस, बैल

व दाणे असल्यास बरे, पण ज्याच्यापाशी बैल, नांगर नाही व पोटास दाणे नाहीत त्याला रोख पैसा देऊन बल घेववावे व पोटास खंडी दोन खंडी दाणे द्यावे. त्याच्याने जेवढे शेत करवेल तेवढे त्याने करावे. पेस्तर साली त्याजपासून वाढी दिढी न करता मुद्दलच हळूहळू त्याला शक्य होईल तितके वसूल करावे. या कामी दोन लाख लारी (एक लारी = साडेदहा आणे) पावेतो खर्च आला तरी चालेल. कुणब्याकडे पड जमीन लावून दस्त जास्ती करून घ्यावा. ज्या रकमा कुळाला देणे शक्य होणार नाही त्या माफ कराव्या व तसे पुढच्या वर्षी साहेबास समजवावे. म्हणजे साहेब माफीची सनद देतील. येणेप्रमाणे कारभार करीत जाणे म्हणजे तुझा कामगारपणाचा मजरा होईल व साहेबाची तुजवर मेहेरबानी होईल."

## भाजीच्या देठालाही हात लावू नका

सुभेदार (सरकारी अधिकारी) आपल्या कामात चुकारपणा करीत; कुळाकडून लाच वगैरे घेण्याचीही त्यांची तयारी असे. प्रभावळीच्या सुभेदारास यासंबंधात महाराजांनी पाठवलेले एक पत्रच आज उपलब्ध आहे.

राजेश्री रामजी अनंत सुभेदार मामले प्रभावळी प्रती राजेश्री शिवाजी राजे दंडवत–" तुला पूर्वी फर्माविले आहे. येसियासी चोरी न करावी. इनामे इतबारे साहेब काम करावे. अशी तू क्रियाच केली आहेस. तेणे प्रमाणे एक भाजीच्या देठा-सही मन न दाखविता रास्त व दुरुस्त वर्तन ठेवणे. लावणी संचणी ज्यावेळी कराव-याची त्यावेळी करणे. मुलखात बटाईचा (ऐनजिनसी शेतसारा) तह चालत आहे. त्याप्रमाणे रयतेचा वाटा रयतेस पावे व राजभाग आपणास येई ते करणे. रयतेवर काडीचा जाच वगैरे केलिया साहेब तुजवर राजी नाही ऐसे बरे समजणे."

शेतीला कायम पाण्याची सोय केल्याशिवाय उत्पन्नाची खात्री नाही, याची महाराजांना जाणीव होती. कोंढवे येथे धरण बांधून बागायतीची व पाणीपुर-वठ्याची महाराजांनी सोय केली. विहिरी घातल्या. ठराविक दरानेच शेतकऱ्यांनी नारळ व सुपारी इ. जिन्नस विकावेत, असा हुकूम असलेले महाराजांचे एक पत्र आज उपलब्ध आहे. कोकणात सैन्याकडून रस्ते केल्याचेही उल्लेख आहेत. थोड-क्यात म्हणजे उसंत मिळेल तेव्हा शेतीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महाराज रयतेला सर्व प्रकारचे उत्तेजन देत असत.

## नि:पक्ष न्यायदान

दादोजींचा आणखी एक वारसा महाराजांना मिळाला. नि:पक्ष न्यायदान ! न्याय दादोजींच्या नसानसांतून भिनला होता. आसवली गावची गोष्ट. दमाजी ढमाळ म्हणून तेथे पाटील होता. त्याची पाटीलकी मिळविण्यासाठी दत्ताजी ढमाळ नावाच्या त्याच्याच भाऊबंदाने त्याचा खून पाडला. दमाजीची विधवा बायको रूपाऊ आपल्या जानोजी व सूर्याजी या लहानग्या मुलांना उराशी लपवून पळून गेली. काही वर्षांनी मुले मोठी झाली. सूर्याजी एक दिवस अचानक शहाजीराजांकडे बंगळुरास गेला व

त्याने फिर्याद राजासमोर मांडली. राजांनी त्याला दादोजीकडे धाडले. कारण आसवली गाव राजांच्या पुण्याकडील जहागिरीत होते, व त्यावर पंतांचा अमल होता. दादोजींनी आसवलीला हशम पाठविले व दत्ताजी ढमाळ व त्याचा पोरगा संभाजी याला बेड्या ठोकून हुजूर दाखल केले. गोतपंचायतीसमोर पंतांनी चौकशी केली. रुपाऊच्या हक्काची पाटीलकी तिच्या पदरात पंतांनी इतकी वर्षे उलटल्यावरही टाकली. पंतांनी असे कितीतरी निवाडे केले. निवाडे करताना गावातील तेथील प्रमुख जबाबदार गावकऱ्यांची गोतसभा भरवून त्या त्या गोतसभेत तंटयाची सर्व बाजूंनी चौकशी करून मग गोतसभेच्या विचारानेच ते निर्णय देत. ग्रामपंचायत हे न्यायदानाचे सर्वांत खालचे केंद्र ; ग्रामपंचायतीहून वरिष्ठ न्यायसंस्था म्हणजे देशक. देशकात परगण्याचा हवलदार, कारकून, सरनौबत, सबनीस, हेजीब, चिटणीस, कारखानीस नाईकवाडी, शेटे, महाजन व बलुते इतक्यांचा समावेश होत असे. गोत व देशक यांनी दिलेला निकालही मान्य नसणाऱ्यासाठी न्यायाधीश ही वरिष्ठ संस्था होती व त्याहीवरची न्यायसंस्था म्हणजे खुद्द राजा. महाराजांनी या श्रेणीत विनाकारण कधीही ढवळाढवळ केल्याचे एकही उदाहरण सापडत नाही, हाच दादोजींच्या त्यांचेवरील प्रभावाचा उत्कृष्ट पुरावा.

न्यायदानाप्रमाणेच महाराज अंमलबजावणीतही अत्यंत कठोर होते. कायदा मोडला की महाराजांच्या राज्यात शासन हे ठरलेलेच. आरंभीचे शिवबाचे स्वराज्य तर केवढे ! छत्तीस गावची जहागिरी ! परंतु राजे या पुण्यापासून नऊ कोसांवर असलेल्या गावचा पाटील—बाबाजी बिन भिकाजी गुजर पाटील—याने कोणा एका परस्त्रीवर बलात्कार केला. शिवाजी त्याचे कोपरापासून दोन हात व गुडघ्यापासून दोन पाय तोडून टाकतो. त्याची पिढीजात पाटीलकी जप्त करतो. हा प्रसंग १६४६ च्या जानेवारी महिन्यातील आहे. शिवाजीचे वय यावेळी केवळ सोळा वर्षांचे होते.

जे सुरवातीला तेच थेट शेवटपर्यंत. आपण महाराजांना गोब्राह्मणप्रतिपालक समजतो. परंतु ब्राह्मण जर हुकूम पाळीत नसेल तर महाराज त्याचा यत्किंचितही मुलाहिजा ठेवीत नसत. महाराजांच्या सैन्याने दंडाराजपुरीस वेढा घातला होता. वेढयाचे काम रेंगाळत राहून मोहिमेचा निकाल लागेना. यास्तव महाराजांनी निर्वाणीचा उपाय म्हणून खासा मोरोपंत पेशवा यांची त्या कामावर नेमणूक केली व त्यास द्रव्यादि सहाय्य करण्यास जिवाजी विनायक सुभेदार व कारकून सुबे मामले प्रभावळी यास सांगितले. पण त्यांनी कसूर केली. महाराज त्यांना लिहितात, " न कळे की, हबशी यांनी काही देऊन आपले चाकर तुम्हाला केले असतील ! त्याकरिता ऐसी बुद्धी केली असेल ! तरी ऐशा चाकरास ठीक ठीक केले पाहिजेत. ब्राह्मण म्हणून कोण मुलाजा करू पाहतो !—या उपरी बोभाटा आलिया उपरी तुमचा मुलाहिजा करणार नाही. "

हुकमाची तामिली बरोबर झाली नाही म्हणून महाराजांनी मोठमोठे अधि-

कारीही बडतर्फ केलेले आहेत. स्वराज्याचा पहिला पंतप्रधान शामराजपंत रांझेकर, आरमारी दलाचा मुख्य सेनानी दर्यासारंग, सरनोबत नेताजी पालकर, प्रतापराव गुजर–केवढ्या तोलामोलाची माणसे ही! पण जेवढी व्यक्ती मोठी तेवढी त्याची लहानशी चूकही अधिक दंडार्ह, हा महाराजांचा कायदा. कारण लोक अनुकरण यांचे करीत असतात. शामराजपंत रांझेकरांना कोकणच्या हबशाविरुद्धच्या मोहिमेत अपयश आले. त्याचे अधिकार काढून घेतले गेले. अर्थात रांझेकरांची स्वराज्यनिष्ठा त्यामुळे कमी झाली नाही. सरनौबत नेताजी पालकरला सांगितलेल्या ठिकाणी हजर राहायला एक दिवस उशीर झाला. शिवाय आपल्या अपराधी चुलत्याची रदबदली करण्याचे धाडसही त्याने महाराजांपाशी करून पाहिले! दोन्हीचा परिणाम असा झाला, की त्याचे सरसेनापतित्व गेले. प्रतापराव गुजर याने विजापूरकराचा सरदार बहलोलखान हाती सापडला असता महाराजांना न विचारता त्याला परस्पर सोडून दिले. महाराजांचे कडक पत्र गेले. प्रतापरावाला ते इतके झोंबले की त्याने 'वेडांत मराठे वीर दौडले सात' हा प्रकार करून आपले मरण ओढावून घेतले.

**राज्याभिषेक**

असा होता आपला राजा शिवाजी! रामरायासारखा दक्ष व कठोर! श्रीकृष्णासारखा कुशल व धूर्त! धर्मराजासारखा उदार व सहिष्णु! लहानपणापासून त्याच्या आईने त्याला वेड लावले रामायणाचे–महाभारताचे. त्याचे दोन आवडते ग्रंथ. त्याला वाटे आपण राम व्हावे, श्रीकृष्ण व्हावे. धर्मराजासारखे राज्य करावे. हजार वर्षे उलटली. या देशास रावण मारील, असा राम जन्माला आला नाही. श्रीकृष्णाची कुशल राजनीती कुणाला समजत नाही. धर्मराजाचे उदार सिंहासन येथे निर्माण झाले नाही. मग मीच असे सिंहासन का निर्माण करू नये! मी ही श्रेष्ठ प्राचीन परंपरा का पुन्हा जागवू नये! हीच महाराजांच्या मनाची ठेवण होती. स्वत्वाने रसरसलेले, स्वाभिमानाने उत्तेजित झालेले, वैयक्तिक महत्त्वाकांक्षेच्या विटाळापासून अलिप्त असलेले, उदार व सहिष्णु, परंतु जागरूक व सावध असे राजसिंहासन या देशात निर्माण करीनच करीन, या दृढ निश्चयाने महाराज आपल्या चार सवंगड्यानिशी सुरवातीला ठामपणे उभे राहिले आणि अलोट परिश्रमाने, अखंड सावधतेने त्यांनी हे ध्येय अखेरीस प्राप्त करून घेतले. १६७४ साली त्यांनी आपल्याला राज्याभिषेक करून घेतला तोही प्राचीन परंपरेच्या पुनर्जागरणासाठीच. त्यांनी स्थापन केलेल्या स्वराज्याला एका स्वतंत्र, सार्वभौम राज्याची प्रतिष्ठा (Sanction) प्राप्त व्हावी यासाठी ही राज्याभिषेकाची योजना होती. हे शेवटचे महत्कृत्य त्यांनी पार पाडले आणि या जगाचा निरोप घेतला.

आणि रायगडावर १६८० मध्ये, शनिवार तारीख तीन एप्रिल रोजी, सूर्य ऐन मध्यावर असताना 'आदर्श-हिंदवी स्वराज्याच्या' प्रयोगावर काळाने जो पडदा ओढला तो अजूनही दूर सरकलेला नाही. ● ● ●



## तू अक्षय तेजोराशी

मधुभावांची महन्मंगले
तू तर फुलती ज्वाला
तेजोमय निष्पाप प्रीतिची
सुखविकसित सुममाला
रुक्ष जीवनी खळाळणारी
तू तर पावनगंगा
अपूर्णतेतुन पूर्णत्वाच्या
उधळतेस रसरंगा !
आत्मविनाशक शापसंभ्रमी
वरदानच तू सुंदर ग
क्षणिक जीवनी भावमनोहर
स्वप्न युगांचे नवथर ग !
तू मृत्युंजय जिंकुन मरणा
भासतेस चिरयौवन ग
सुधाकलश जे देइ करुनिया
क्षीरोदधिचे मंथन ग !
अनंत निर्दय बंधनातली
मुक्तपंख तू हंसी
पार्थिवतेच्या तिमिरामधली
अक्षय तेजोराशी !

*सूर्यकान्त खाण्डेकर*

## संसार

'आटपाट नगरात
छोटयाश्या घरकुलात
कापडाचे राजाराणी
मातीचाच हंडा
त्यात काठोकाठ पाणी
एकदा –
कशासाठी कोण जाणे –
राजा भांडला राणीशी
राणीपण रुसली
गट्टी फू केली
तिनं राजाशी
राजा खूप चिडला
राणी खूप रडली
हंडयामध्ये
जीव द्यायला
दोघंजणं चालली
काठापाशी
एकाएकी
राणीचा तोलच गेला
राजा चटकन् धावला –
राणीला सावरायला !
तेवढयात
त्याच्या तलवारीचा
धक्का लागला हंडयाला
हंडा गेला फुटून –
बाई बाई ! पाणी फुकट गेलं वाहून
आता कशात जीव द्यायचा
पाणी गेलं संपून
राजाराणी परत आली
हातात हात घालून

*सौ. शकुन्तला फडणीस*



विसू

"विसूभाऊ; एस्. ए. एस्. पास होणं हे आपलं काम नाही. त्याचा मक्ता बंगाली–मद्रासी–पंजाबी ह्यांच्याकडेच दिला आहे अन् तुला पैशाची एवढी कोणती नड येऊन पडली आहे ? तरी बरं, वहिनी मिळवत्या आहेत !"

भुमराळकराची दंताडी म्हणजे 'मुफळ बोल रे नाऱ्या'चीच आवृती होती. हलकटपणा– कुत्सितपणा– वाह्यातपणा तर पाचवीसच जणू पुजलेला.

इतक्या फाटक्या तोंडाची ही वल्ली का कुणास ठाऊक मला बरीच वचकून होती. माझ्याशी वचवच बोलण्यासाठी त्याची जीभ अडखळायची. आज एस्. ए. एस्. च्या परीक्षेचा निकाल नोटीस–बोर्डवर लागल्यावर भुमराळकर माझ्या सान्निध्यास आला होता.

फटकळपणाच्या तोटीतून भुमराळकराच्या तोंडची वाफ एरवी अशीच वाया जात होती, तरी पण ह्या त्याच्या बोलण्यात 'तथ्य' नव्हतं असं नाही. स्वतःच्या अनुभवाच्या कसोटीवर त्याचं विधान चौदा कॅरेटचं तरी होतंच; पण म्हणतात ना, अपयशासारखा मूर्खपणा नाही या जगात. भुमराळकरचं ठीक होतं– वाटेस येईल ते बोलत होता– बोलू शकत होता. कुणी त्याची तशी दखलदेखील घेत नसे; पण मला मनात तसं काहीसं येऊनदेखील बोलता येत नव्हतं. अपयशाच्या समर्थनासाठी मी अशा पळवाटा काढीत नाही. तो माझा स्वभाव नाही. माझ्यातली जिद्द भयंकर चिवट होती. सहजासहजी पराभव मानणाऱ्यांच्या वर्गात मी बसत नव्हतो. निकाल कळून वाईट वाटलं होतं हे मात्र खरं, पण आजच्या दिवसाचा नारळच कुजका निघाला होता. घरी परतलो तोपर्यंतसुद्धा मनःस्थिती पूर्वपदावर आली

# आनंद रामचंद्र फुले

बाबांच्या एककल्ली जीवनाचा तोल आईनंच
सांभाळला होता..... पण आई गेली न् त्यांचा
तोल ढळला—तो कायमचा.

नव्हती. मी नेहमीच्या मनःस्थितीत नव्हतो. घरी आलो तेव्हा शांता बहुधा चुलीपाशी असावी. बबन्या भारताचा उद्याचा "पतौडी" व्हायची स्वप्नं जगत मैदानावर हुंदडायला गेला असावा. नमी तेवढी घरात दिसत होती. कविता पाठ करीत होती– 'देव देतो सद्‌गुणी बालकांना; काय म्हणुनी आम्हास करंटयांना.'

ऑफिसचे कपडे काढायचंदेखील त्राण माझ्यात उरलं नव्हतं. खाटेवर डोळे मिटून स्वस्थ निपचित पडून राहण्याचा मोह विलक्षण प्रभावी ठरला होता. आता एवढंच वाटत होतं की कुणी आपल्याला आहे या स्थितीतून डिवचून बाहेर ओढू नये. शांताच्या हातचा चहाचा कप मला नको होता. तिची चर्पटपंजिरीका नको होती. कुणी कुणीदेखील माझ्या अस्तित्वाची दखल घेऊ नये, असंच वाटत होतं. बस्स, एवढंच.

नमीचं कविता पाठ करणं तसंच चालू होतं– 'देव देतो सद्‌गुणी बालकांना; काय म्हणुनी आम्हास करंटयांना......' एका बापाची व्यथा तिच्या शब्दांत साकार होत होती. बिचारीला त्याची कल्पनाही नव्हती. सरांनी कविता पाठ करायला सांगितली. मोठयानं म्हटल्याशिवाय पाठ होत नाही, म्हणून मोठ्या आवाजात ती शब्दांना आपलेसे करण्याच्या प्रयत्नात होती. शब्दांच्या अर्थाचा तिला सोस नव्हता. तिच्या सरांनी माझ्यावर सूड उगवायचा मनसुबा तर केला नव्हता ना? नमी कविता पाठ करीत होती की माझ्या व्यथेला शब्दांचं रूप देत होती? खरंच, उद्या समज आल्यावर या पोरांना आपल्याविषयी काय वाटेल? आपल्याला ते आरोपीच्या पिंजऱ्यात तर ठेवणार नाहीत ना? बबन्या 'कंकय्या' व्हायच्या गोष्टी करतो. उद्या मॅट्रिक झाल्यावर टेक्निकल लाईनमध्ये मी त्याला घालणार आहे–

त्याच्या क्रिकेटपटू होण्याच्या महत्त्वाकांक्षेला मूठमाती देऊन ! तरच आपल्या दृष्टीनं त्याच्याविषयीचं कर्तव्य पुरं होणार ! त्याला बॅट हवी आहे, घेता येत नाही, अशातलाही प्रश्न नाही. तरी पण आजची उद्यावर चालढकल होत आहे. का ? कारण तो क्रिकेटपटू होऊ नये, असंच आपल्याला वाटतं म्हणून ? होय ! त्यानं एखादी चांगली टेक्निकल डिग्री घेतली, यातच आपणाला सारं मिळेल ? क्रिकेटच्या वेडापायी त्यानं आयुष्याचं मातेरं करू नये, असंच आपल्याला वाटतं !

क्रिकेट खेळण्यासाठी आपण त्याला उत्तेजन देऊ शकत नाही अन् एवढा सारा आटापिटा करूनदेखील उद्या तो आपल्या दुर्दैवानं क्रिकेटपटू झालाच तर...... ? दिलेल्या मुलाखतींमध्ये तो आपल्या यशाचं श्रेय वडिलांच्या प्रोत्साहनाला देईल. आपल्याला फासावरच टांगलं जाईल ? मोठेपणानं भारावून जाऊन तो आपल्याला सारं श्रेय देईल आणि त्या दिवशी ती दयाच असेल... त्याच्या न्यायासनाविष्ठित नजरेतील आरोपीच्या पिंजऱ्यातील आपणाला दाखविलेली ! अन् उद्या तो टेक्निकल ग्रॅज्युएट झाला तरी त्याचा पायाभरणीत वळी राहील– त्याच्या महत्त्वाकांक्षेला– ! जिला माझ्या घरात मी थारा दिला नव्हता.... त्याच्या आयुष्यात साकारू पाहणारे महत्त्वाकांक्षेचे अंकुर आपण खुडून काढलेत म्हणून ? जणू फसगत झालेल्या मुलीची सुटका करावी तशा भूमिकेतनंच आपण त्याच्या महत्त्वाकांक्षेला खुडून काढले म्हणून ? नमी... दहा वर्षांत ती लग्नाच्या बाजारातली घोडनवरी होईल. हुंडा द्यावा लागेल तिच्या लग्नासाठी. आमच्या ' डी. ए. जी. पी. टी. ' ऑफिसातले ' एल्. डी. सी. ' कारकून आपला लग्नाचा रेट तीन हजार रुपये तरी सांगतात. नमीसाठी कारकून नवरा पाहायचा म्हटलं तरी निदान तीन हजार रुपये तरी लागणार अन् जो नवरा जन्मभर फक्त कारकून राहील, पण मला नमीसाठी कारकून नवरा नको आहे ! एखादा डॉक्टर...इंजिनीयर... पण त्यासाठी लागणारे पाच–दहा हजार रुपये... केवळ माझ्याजवळ पैसा नाही म्हणून तिचं लग्न याच्याशी न होता एखाद्या लाईफलाँग कारकुनाशी ?... नमीच्या नजरेतदेखील मी आरोपी... नाही... नाही......

' ए मेले; गळा फाडून सारा गाव गोळा करायचा आहे का ? मेले सारे नुसते माझा सूड घेण्यासाठी टपून बसले आहेत...'

आवाज शांताचा न् ' मेले ' हा शब्दही ! माझी मनःस्थिती अशी विस्कटलेली. आता हिला काय झालं असं घर डोक्यावर घ्यायला ? ' मेले ' ह्या शब्दाविषयी तर शांताला विलक्षण चीड होती. मग ? ' म्हटलं चहा निवतोय् ! '

फार तर क्षण दोन क्षण असेच गेले असतील...

' अहो, उठा. मघाचा चहा निवतोय् '.

शांताच्या आवाजात अन् चीड. इकडे आवीच माझी नस तडकू पाहत होती. मोठ्या निर्धारानं मन आवरत होतो.



'माझ्यातील जिद्द
भयंकर चिवट होती.'

डोळे उघडून शांताकडं पाहिलं. बाईसाहेब जरा घुश्श्यातच दिसल्या. पण का? माझं ठीक होतं. साऱ्या दिवसाचंच खवट खोबरं झालं होतं. 'अहो, असे स्वस्थ काय बसता? मामंजी माझ्याशी भांडून रागारागानं डोक्यात राख घालून दुपारीच घराबाहेर निघून गेले आहेत?'

'मग मी काय करू?' माझ्या आवाजात त्रासिकता होता? मलाच जाणवत होती. 'अहो, असे काय करता?' तिच्या आवाजात आता काकुळता होती.

आमच्या वडिलांना खाण्याची लहर आली होती, म्हणून त्यांना एक दोन रुपये हवे होते. शान्तानी ते दिले नाही, म्हणून आजचं भांडण झालं होतं. एशी वर्षाच्या आयुष्याचा पावसाळा मिळूनदेखील केवढी लालसा चटोर खाण्याची; पण हा विचार क्षणभरच माझ्या मनात टिकला. 'एखादा रुपया दिला असतास तर...' 'पैसे झाडाला लागतात उठवस मिळायला...'

'पैशाचा माज आला का?...'

शांताच्या उत्तरात मला माझा उपमर्द दिसला. तिच्या कमाईची गुर्मी दिसली. त्या क्षणी मलाही जाणवत होतं की वडिलांचे जिभेचे चोचले दिवसात पाच-सहा-देखील होत असत. सटीसहामाशी गोष्ट असती तर मला कारण होतं...तरी पण

शब्दांनी आपली कामगिरी बजावली होती माझ्या न् तिच्यादेखील. मलाही तसं म्हणायचं नव्हतं. तरी पण शब्दांची चकमक झडली होती.

रात्री अंथरुणं टाकून आडवे झालो, तरी शब्दांच्या चपराकीचं दुःख दोघांनाही विसरता येत नव्हतं. माझ्याकडे–आमच्या उभ्या दिवसाकडेच–पाठ करून शांता माझ्याशेजारी आडवी झाली होती. तरी पण माझ्यापासून किती दूर होती.

'अजूनपर्यंत मामंजी आले नाहीत ?' तिनं कड बदलली होती.

'येतील ग–अजून डोकं शांत व्हायचं असेल ?' माझ्या आवाजाला अजूनही धार होती. भूतकाळात जमा होणाऱ्या त्या बोहाऱ्या दिवसांची.

'अन् नाही आले तर...' तिच्या शब्दांत भीती होती. बाबा काही बरं वाईट तर करून घेणार नाहीत, ही शंका तिला सलत होती.

'उद्या सकाळी येतील...' उत्तर देऊन मी तिला गप्प केलं. मला झोप हवी होती. आजचा सारा दिवस विसरायचा होता. सारं सारं विसरायचं होतं. एस्. ए. एस्.चा निकाल...मुमराळकरचा अहेर...घरचं भांडण...बाबा अजून घरी आले नव्हते...या साऱ्यांचा मला विसर पडायला हवा होता.

मॅट्रिकच्या परीक्षेत दोन प्रावीण्यांसह मिळालेल्या प्रथमश्रेणीबद्दल मला कधी कधी विलक्षण दुःख होते. हा यशाचा खडा माझ्या जीवनाच्या जलाशयात पडून नसते तरंग निर्माण झालेत असंच वाटतं. नसत्या अपेक्षा–आकांक्षा ढवळून निघाल्यात, असंच वाटतं. एरवी कारकुनीच्या घाण्याला जुंपलो असतो. ना खंत ना खेद, त्या लिंगोदरवादी जीवनाचा ! आपण राहतो ते डबकं आहे, ही जाणीवच मुळात निर्माण झाली नसती. मग जीवन असह्य व्हायचा–सह्य करण्याचा प्रश्नच निर्माण झाला नसता.

कधी वाटतं की त्याच यशाच्या भावबळावरच तर आपण आजवर झुंज देत आलो आहोत. माथी लादलेल्या कारकुनी माणूसघाण्या जीवनाशी, जिद्द आहे प्रयत्नांची शर्थ करून निकराची, परिसीमा गठण्याची. गुणवत्तेत आपण चार सामान्यांहून खचितच वेगळे आहोत, ही जाणीवच आपल्या जिद्दीचा कणा आहे अन् ती साकारली–मॅट्रिक परीक्षेच्या निकालानंतरच.

गणित विषय घेऊन इंटर सायन्स होण्याचे विचार मनात खदखदत होते न् वास्तवात डी. ए. जी. पी. टी.ची कारकुनी रूपबद्ध झाली; बाबांनी दिलेली जणू कौतुकाची पावतीच. बी. एस्सी. किंवा एम्. एस्. सी. होऊन का नोकऱ्या तावड-तोब मिळतात ? बेकारी ही अशी वाढती. उद्याच्या तुपानं माखलेल्या पोळीपेक्षा आज मिळणारी ज्वारीची भाकरी बरी, या काहीशा दिशाभूल करणाऱ्या पण सोयीस्कर वाटणाऱ्या बाबांच्या जाणीवेचा तडाखा होता तो. कारकुनी नशिबात होती ती आली–येणारच होती म्हणून आली. पण प्रकृती डबक्यात समाधान मानणारी नव्हती. पहिलं वर्ष कसंबसं उलटलं, पण काही तरी राखून गेलं. नियतीचा

कारकुनी कौल मानण्यापत मन पोरसवदा राहिलं नाही. स्वतःच्या पायावर उभं असल्याची जाणीव स्वतःच्या कक्षा निश्चित करीत होती. नियतीनं आवाहन केलं नव्हतं, तर आव्हानच दिलं होतं. ते मी शिरसावंद्य मानलं.

सकाळच्या कॉलेजात मी नाव दाखल केलं. बाबांना माझी धडपड पसंत नव्हती; पण त्यांच्या कक्षेत त्यावरचा उपाय नव्हता. कारकुनीच्या सव्वाशे टिकल्यात माझं व्यक्तिमत्त्व आकारत होतं—प्रत्यक्ष जन्मदात्या आईबाबांच्या विरोधात उभं राहणारं.

आमचे बाबा म्हणजे एक विलक्षण. आमचा वाडा मह्शूर होता. सात-आठ भाडेकरू होते. महिन्याकाठी तीनशे रुपयांचा किराया येत होता. बाबा पैसा पै पै करून राखीत होते. दैन्य दाखवायचा त्यांना विलक्षण सोस. सदान्कदा पैशाच्या बाबतीत त्यांची रडकथा चालू असायची. एक रुपयाच्या मोहासाठी पाहता पाहता बदलून जात. शब्दाला जागत नसत. पैसा गाठचा काढायचा म्हणजे कोण संकट वाटायचं त्यांना. मॅट्रिकच्या आधी ते होतं त्या स्वरूपात, समज लहान म्हणून विशेष जाणवलं नव्हतं. जे जाणवलं ते मनास विशेष लागलं नव्हतं, पण बाबांच्या भाषेतले 'पंख फुटताच' मग मला त्यांचा तऱ्हेवाईक चिक्कूपणा पदोपदी नडत होता. त्या पार्श्वभूमीवर आपकमाईची स्थिती खरोखरीच मोठी दिलासा देणारी होती. माझं शिक्षण—त्यापेक्षा त्या निमित्ताने लागणारा पैसा—त्यांना खटकत होता. पण कुरबुर करण्यापलीकडे ते काहीच करू शकत नव्हते.

नोकरी लागल्यानंतरचे पहिले चार-पाच महिने पूर्ण पगारातले पाच रुपये वजा जाता उरलेली सारी रक्कम त्यांना हवी होती. ती मी देत गेलो, पण त्या काळात कुणाला कपभर चहा द्यायचा म्हटलं तर प्रश्न निर्माण व्हायचा. ही कोंडी कधीना कधी फुटणारच होती. सहाव्या महिन्यांत शंभरच रुपये मी दिले. खूप शाब्दिक संभावना झाली, पण मी ते जाणवण्याच्या पलीकडे गेलो होतो. घराबाहेर काढून देण्याची भाषा निघण्याचीच देर की मी स्वतःच एका पायावर तयार होतो, पण मी पडलो एकुलता एक मुलगा. त्यांना पराभव मानावा लागला. एरवी मला घराबाहेर त्यांनी काढलं असतं तर त्यासारखी दुसरी चांगली गोष्ट झाली नसती ! ह्या कोरडा ससेमिरा सुटला असता.

बाबांना तोंड भुमराळकरांचंच होतं—नुसता पायखाना. त्यांच्या जिभेला हाड नव्हतंच. वाटेल ते अर्वाच्य ते बोलत असत. कुणालाही. कुणाच्याही देखत. आईला-देखील. त्यांच्या ह्या विशेषाची जाणीव ते करून देत असत. नेहमीच. कारण त्यांचं तोंड नेहमीच वाजत असे.

आमची आईही कमी नव्हती. नगास नग होता. माझी आई होती म्हणूनच तिला बाई म्हणायचं. एरवी ती पुरुषी राकट होती—शरीरानं अन् स्वभावानंदेखील. बाबा तिच्यासमोर नांगी टाकत. साऱ्या मोहल्ल्यात तिचा वचक होता. तिच्याशी सारे फटकून असत. आमनासामना झाला तर होशी हो हो व्हायचं. 'नमस्कार, येते हं'

झालं की सुटकेचा निश्वास सुटायचा. मोहल्ल्यात एखादं प्रकरण सुरू व्हायचाच अवकाश की त्याची खदखद आमच्या घरीच व्हायची. पुन: मालकीणबाई म्हणून तोरा. भाडेकरू पुरुष आणि स्त्रिया तिच्या शब्दाला प्रतिशब्द म्हणून देत नव्हते. सावधगिरीच्या चार हात अंतरावर ते राहात. वाड्यातली मुलं ' काकू ' च्या वाटेला फिरकत नसत. आईपेक्षा ' काकू ' च्या नावाचा नुसता दरारा. काकूबाई लहान मुलांच्या ' बारा डोळ्या ' झाल्या होत्या. तशी बायकांची संगत आईला आवडत नसे. किमानपक्षी त्यांच्या नवऱ्यांत आईची वर्दळ जास्त अन् त्यात साऱ्या गावच्या चांभारचौकशा वेठीस धरलेल्या.

बावांशी मात्र तिचं दिवसाकाठी दोनचारदा खटकत असे. बाबांची बाजू जेव्हा सबळ राहायची तेव्हा ते तिच्यावर तोंडसुख घेत. एरवी आईचा होराच असायचा. बाबांच्या मर्मावर ती चपलख बोट ठेवायची. फडताळातल्या चिल्लर नाण्यांवर त्यांचं आकडेशास्त्रातलं संशोधन चालत होतं, याची जाणीव आईनं कधी दिली नाही, असं कधीच झालं नाही. मग बाबांचा ठराविक अस्त्राचा उपयोग. आईच्या माहेराच्या लोकांचा–दारिद्र्याचा उल्लेख–'तुझ्या बापाचे होते का ? ' ने सुरू होणारा. ठरलेली हुंड्याची रक्कम पुरी दिली नाही, इथपर्यंत मजल गाठणारा. मग आईचं ठेवणीतलं उत्तर–' तुम्हाला कोणते हिरेमाणिक जडलेले होते. नशीब माझं फुटकं म्हणूनच तर तुमच्यासारखं ध्यान माझ्या आयुष्यात होतं......' आईबाबांची भांडकुदळ म्हणून मोहल्ल्यात चर्चा होत असे.

बाबांचा दुसरा विशेष–आईच्या कामी भांडवलासारखा असणारा–म्हणजे त्यांचा खाण्याचा सोस. त्यांची शोधक नजर घरात खाण्याच्या पदार्थांवर किंवा पैशाच्या फिराकीत नुसती भिरभिरत असे. कुठे आठ–बारा आणे–रुपयाचा डल्ला मारायला मिळाला की एकटेच हॉटेलात जाऊन ते जिव्हालौल्य शमवून घेत असत. पाठोपाठ आईची बोलणी खात. त्यांना केव्हा काय खावंसं वाटेल ह्याचा नेम नव्हता. आई नेहमी म्हणायची—' तुमच्या तोंडाचा न् लहान मुलाच्या गांडीचा काही काही म्हणून भरंवसा नाही. ' एकदा त्यांना आइस्क्रीम खाण्याची इच्छा झाली होती. तेव्हा त्यांनी नागपूरच्या ११८ अंशी भर उन्हात मला सहा मैल खेदाडलं होतं सायकलवर ! चार आण्यांचा आइस्क्रीम एका वाटीत घेऊन आणण्यासाठी आणि मीदेखील दोन पैशांच्या लालचीनं तंगडलो होतो. त्या आइस्क्रीमचं झालेलं ' पाणी ' घशाखाली ओतल्यावर कुठे त्यांना हायसं वाटलं होतं. शनिवारी दुपारच्या एकचा इंग्रजी–हिंदी स्टंट चित्रपट बाबा दोन आण्यांची तिकिटं काढून अगदी पहिल्या बाकावर अट्टाहासानं बसून पाहात–धोतराच्या सोग्यात एक पायली मुरमुऱ्यांचा तोबरा घेऊन.

आईचं खरोखरीच माझ्यावर प्रेम होतं. बाबांना पैसा प्यारा होता. किरायातल्या दिडकीला हात लावू देत नसत ते कुणाला ! घर चालविण्यासाठी लागणारी मीठ-

मोहरी आणण्यासाठी त्यांना पैसा मागितला की त्यांच्या जिवाला केवढा घोर लागायचा. कमरेची गाठ सहसा सुटत नसे. मग आईचं तापट तोंड वाजायचं. मग दोन्ही कुळांच्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार. शेजाऱ्यांना नसती कटकट; पण भाडेकरू घरमालकाच्या बाबतीत बोलेल कोण ? आश्चर्य म्हणजे बाबांचं आकडे-शास्त्राचं प्रेम फडताळातल्या चिल्लर नाण्यांपुरतंच त्यांच्या माथ्याचा अंगार करायचं. त्यांची धाव तेथवरच होती. कमरेचं नाणं ते प्रेम लुब्राडू शकत नव्हतं. थोड्याफार फरकानं त्यांची खाण्याची लालसा अशीच होती. क्वचितच त्यांनी कमरेची चिल्लर गल्ल्यावर ठेवली असावी. दोन रुपये जमले रे जमले की त्यांची धाव पोस्टाकडे. त्यांचा खाण्याचा सोस व आकड्यांचा नाद घरखर्चासाठी दिलेल्या पैशांतून बचत करण्यासाठी जणू जन्माला आले होते.

रामटेक–कोराडी–कन्हानच्या ट्रीपसाठी लागणाऱ्या रुपयाची तर गोष्टच सोडा, पण तेलंखेडी–अम्बाझरीच्या ट्रीपसाठी लागणाऱ्या चार–आठ आण्यांसाठी आईजवळ कोण धरणं धरावं लागत असे ! आईचा पारा खवळायचाच देर की मग अर्ध्या तासाच्या कटकटीनंतर बाबांच्या कमरेचा बंदा रुपया सुटायचा. बाबा एक वस्ताद तर आई महावस्ताद. चार आणे लागले की आठ आणे मागायची. भांडून पैसा घ्यायची. घरसंसार तीच चालवीत होती. बाबा केव्हाही मधल्या घरात किंवा स्वयंपाकघरात जायचीच देर की स्वतः जाऊन हजर, नाही तर मला पाठवायची. " ते काय करतात आहे ते पाहून ये !" मग बाबांची अस्सल शिव्यांची बरसात. आईची माझ्याबतीनं होणारी अस्सल मराठमोळ्या भाषेतली परतफेड. घरात आईचाच वरचष्मा होता. आईला एखादी गोष्ट मान्य झाली की ती होणारच म्हणून मानावं, पण बाबांना पटून नुसता काही उपयोग नव्हता. आईची त्याला संमती लागायची.

तशी आई समजूतदार होती. नोकरी लागून फार तर दीड वर्ष मी पंचाहत्तर रुपयांपर्यंत घरात देत होतो. नंतर मात्र मी खाण्या–राहाण्याचे पन्नास रुपये देत होतो. बाकी माझा सर्व खर्च मी पाहात होतो. इंटर होईपर्यंत आई बाबांच्याच मताची होती. माझ्या शिक्षणाच्या बाबतीत. पण इन्टर झाल्यावर ती माझ्या बाजूची झाली होती. तीन वर्षांची नोकरी होताच मी अप्पर डिव्हिजनल क्लार्क झालो. पंचेचाळीस रुपये पगार वाढला. नाईटस्कूलमधील पन्नास रुपयांची नवी मास्तरकी मी चालू केली होती. दीडशे रुपयांची रक्कम मी दरमहा जमवत होतो. आईला वर्षाकाठी तीन चांगली पातळं व बबीसाठी चांगली साडी दिवाळीला घेत होतो. आई खूष होती. बबी माझी सर्वांत मोठी बहीण. त्यानंतरची पाच भांवडं गेली अन् मी शेवटचं शेंडेफळ.

तसा मी खमक्या होतो. घराच्या टॅक्सची रकम माझ्या माथी मारण्याचा बाबांचा प्रयत्न मी धुडकावून लावला होता. आई माझ्या बाजूची होती. घराचा

किराया बाबा घेत होते. त्यांनी टॅक्स भरावा. बाबा पड खाताना शेवटचा म्हणून आधार घेत आईला पोसण्याचा ! –त्यासरशी आई खवळायची–' बायको पोसता येत नाही तर बायको करायचा सोस कशाला पाहिजे होता ? राहायचं होतं तसंच या घनावर ठिय्या देऊन. सुनेच्या हाताखाली राबण्यासाठी मी राहाणार नाही. चांगली अहेवपणी भरल्या कपाळानं जाईन मी..'

पण आईच्या नशिबात नुसता सूनमुख पाहण्याचाच योग नव्हता तर नातवंडाला खेळविण्याचासुद्धा योग होता. बबन्या दीड वर्षाचा होईपावेतो आजीच्याच अंगाखांद्यावर होता. का कुणास ठाऊक, पण आई माझ्या लग्नानंतर विलक्षण निवळली होती. शांताच्या वाट्याला तिचं सासूपण जे आलं ते तिच्या स्वभावानं माझ्या मनात जागविलेल्या कल्पनेच्या एकशतांशदेखील नव्हतं ! ! बबन्याच्या जन्मानंतर तर ती खूपच बदलली होती. सारा दिवसदेखील तिला अपुरा पडू लागला होता. बबीच्या सासरचे लोक लग्नात झालेला अपमान अजूनदेखील विसरू शकले नव्हते. अपमानाचं सारं श्रेय बाबांनाच जात होतं. त्यांच्या कद्रूपणाला आणि फाल्गुनी वक्तृत्वाला. मी दहावीत असताना आई खूपच आजारी पडली होती, तेव्हा बबीला सात वर्षांनंतर फक्त चार दिवसांसाठी त्यांनी पाठविली होती. बबी एकटीच आली होती, पण पाचव्या दिवशी मात्र लहान दीर तिला न्यायला आला होता. सहाव्या दिवशी बबीला जावंच लागलं होतं. त्या दिवशी आईनं बाबांना नाही नाही ते बोलून घेतलं होतं. उभ्या आयुष्यात त्या एकाच दिवशी बाबांनी तोंडावाटे एक अक्षरदेखील काढलं नव्हतं. निमूटपणं आईचा एकूण एक शब्द त्यांनी गिळून घेतला होता.

त्यानंतर बबी आली ती माझ्या लग्नात–दोन दिवसांसाठी आणि नंतर आईच्या मृत्यूनंतर...पंधरा दिवसांसाठी. ...

आईच्या मृत्यूनंतर बाबांना फारच एकटं एकटं वाटू लागलं. आईच्या मागं त्यांना शब्दानंही हटकणारं कुणी राहिलं नाही. बाबांना सवय जडली होती स्वतःच्या प्रत्येक गोष्टीमध्ये आईचा विरोध विकत घेण्याची. करायचं मनात असेल ते करीतच होते ते, पण आईची प्रतिक्रिया–तिच्या विरोधाची सोबत–त्यांना हवी होती. त्यावरच ते जगत होते. खरोखरीच जगत होते. त्यांच्या एककल्ली जीवनाचा तोल आईनंच सांभाळला होता. त्यांच्या एककल्ली हेकेखोर स्वभावाचा कल थेट झुकत होता वेडेपणाच्या बाजूला. हो, वेडेपणाच्या बाजूकडेच ! आईच्या विरोधानं त्यांचा स्वभावाचा तोल विलक्षण सांभाळला गेला होता, पण आई गेली न् त्यांचा तोल ढळला–तो कायमचा. आई चंदनाच्या सरणावर गेली अन् आश्चर्य, बाबांनी त्याचा खर्च केला. इच्छा त्यांचीच होती. ' आता नका करू खर्च ! माझ्या सरणावर कराल ! जिवंत माणसासाठी तुमच्याजवळ दमडी नाही, पण तो मेल्यावर मागं तुम्ही त्याला चंदनाचा भडाग्नि द्याल ! ' आईचे शब्द खरे ठरले होते.

आईच्या मागं वाड्याच्या किरायातली एक पैदेखील मागणारं कुणी राहिलं नाही. मी आणि शांता कमावीत होतो. तीनशे रुपये घरात येत होते. घर मी चालवू लागलो होतो. वाड्याच्या किरायात मला काहीच वाटा नको होता. टॅक्स-देखील मी भरत होतो. मला एक पैसादेखील लागत नव्हता.

आईच्या जाण्यानं त्यांच्या पाठीचा कणाच जणू तुटला होता. देवपूजेत किंवा कोणत्या तरी निरुपद्रवी व एकलकोंड्या कामात ते मन गुंतवीत होते. बबन्याला घेऊन तासन्तास बसत होते. त्यांच्या आयुष्याची ही दशा पाहून मी खरोखरीच कष्टी झालो होतो. त्यांच्या स्वभावातून झाक मारणारी अगतिकता मला नको होती. खरोखरीच नको होती. त्यांना शब्दानं बोलणारं कोणी उरलं नव्हतं हेच त्यांचं दुःख होतं. मी एम्. ए. झाल्याचं कळून त्यांना खूप खूप आनंद झाला होता. 'माय बॉय, आय ॲम प्राऊड ऑफ यू ! ' असं म्हणताना ते गहिवरून आले होते. त्यांच्या आवाजातली गदगद जाणवून मी मात्र दुःखी झालो होतो. त्यांच्या भाराव-लेल्या आवाजातनं मला जाणवत होती–त्यांच्या पराभवाची दुःखद भावना. त्यांना ती त्यावेळेस जाणवली नव्हती. अभिप्रेतदेखील नव्हती, पण मला ती जाणवली होती

आई गेली–पण नुसतीच गेली नव्हती. बाबांना स्वतःची पदोपदी जाणीव व्हावी असा संकेत करूनच गेली होती.

नागपूर इम्प्रुव्हमेंट ट्रस्टच्या नव्या शहर विकास योजनेनं आमच्या वाड्या-वरून वरवंटा फिरविला. ऐंशी फुटांचा रस्ता वाड्याच्या मधोमध छेदून जात होता. छेदून गेला. सात हजारांची रक्कम देऊन वाडा जमीनदोस्त झाला. चाळीस हजारांची वास्तू गेली न् ३० × ४० च्या प्लॉटवर एक मजला कसाबसा उभा राहिला–चार खुराडी खोल्यांचा !

या दुसऱ्या आघातासरशी बाबा उन्मळून पडले. त्यांचा तोल कायमचा ढासळला–वेडेपणाच्या गर्तेकडे त्यांच्या स्वभावानं पुनः उसळी मारली – स्प्रिंग तुटून ताबा नष्ट व्हावा तशीच त्यांची गत झाली.

खाण्यावरची आसक्ती कधी नव्हती तेवढी तीव्र झाली. त्यांना खाण्याचे झटके



येऊ लागले. सट्टादेखील या तारेत विसरले. चोवीस तास त्यांचं रिकामं मन नुसत्या खाण्याचाच विचार करीत होतं.

ह्या खाण्याच्या वेडानं मला गारद केलं. फडताळात एक आणा ठेवायची चोरी झाली. स्वयंपाकघरातल्या गूळ–दाणे–साखर असल्या वस्तूंदेखील कपाटात गेल्या. ही पाळी आपल्यावर येऊ नये म्हणून मी आणि शांताने अनेक प्रयोग केले, पण बाबा आम्हांला पुरून उरले होते.

त्यांचं दुःख होतं आई गेल्याचं. वाडा गेल्याचं त्यांना दुःख नव्हतं; किराया गेल्याचं होतं. किराया नाही म्हणजे पैसा नाही. पैसा नाही म्हणजे त्यांच्या दृष्टीनं ह्या जगात काहीच उरलं नाही. फडताळातल्या–स्वयंपाकघरातल्या कडीकोयंडयांना–अडसरांना 'अस्तित्व' मिळत गेलं, तसं आमचं डोकं भणभणू लागलं.

रुपया रोज खर्चासाठी देऊन पाहिला, पण फडताळातल्या चिल्लर नाण्यांची शीग हवीच होती. खर्चासाठी रुपया रोज दिल्यानं त्यांचा खाण्याचा सोस चांगलाच बाळसला. दिवसाकाठी दहादा त्यांना खाण्याचे डोहाळे लागू लागले. सकाळी हक्कानं रुपया उपटायची त्यांना सवय जडली. 'चिल्लर नाही? मी करून आणून देतो,' असं होऊ लागलं–नाहीतर 'पैसे नाही तर मी काय करू? तू कुठूनही आण. वाटेल ते कर, पण मला पैसे दे. मला तवकिराची जिलबी खायची आहे,' असं होऊ लागलं.

बाहेरच्या खाण्याची चटक लागली तशी घरच्या अन्नाची चव गेली. ताटावर बसून अन्नाची नुसती चिवडाचिवड होऊ लागली. महागाईच्या काळातली अन्नाची ती नासधूस पाहवत नव्हती. ताट फेकून देणे, स्वयंपाक करता येत नाही म्हणून नुसत्या शिव्या!

यातून मार्ग काढायचा म्हणून बाबांना खानावळ लावून दिली. तिथं तेच हाल. नुसते खाडे करायचे न् नगद रक्कम उचलायची. कुणीही ओळखीच भेटलं की चार–दोन आणे मागायचे. सून छळते, पोरगा लक्ष देत नाही, नुसता बाईलबुद्धा आहे, असले प्रलाप.

आयुष्यात येणारा प्रत्येक दिवस बाबांविषयी काहीतरी कळून मनःस्थिती नासवीत होता. परक्या माणसालादेखील पोरासुनेविषयी तोंडाला येईल ते सांगून बाबा आणा–दोन आणे मागू लागले होते. पोटचा पोरगा लक्ष देत नाही, सून छळते म्हणूनच म्हाताऱ्याची आबाळ होते, म्हणून परके लोक बाबांना चार–दोन आणे देत असत. लग्नाच्या मोसमात कुणाच्याही घरी बाबा ऐन जेवणाच्या वेळी दत्त म्हणून हजर राहात–ब्राह्मणाला भोजन द्या म्हणून! एव्हाना बाबांवर वेडयाचं शिक्कामोर्तब झालं होतं. पागलखान्यात ठेवण्याच्या सूचना जवळच्या लोकांकडूनदेखील होऊ लागल्या, पण बाबांच्या वेडाचा उगम होता त्यांच्या खाण्याच्या जबर इच्छेपोटी. म्हणून ते बुद्धया वेडेपणाची जाणीव देत. पोरासुनेविषयी नाही नाही ते

अर्वाच्य घाण बोलत. ऐकणाऱ्यांना तेवढंच घाण ऐकायला मिळायचं–विकृत आनंद मिळायचा अन् आण्याच्या चहात किंवा दोन आण्याच्या भज्यांमध्ये करमणूक व्हायची लोकांची.

'करणी करे चाळा; बोल ठेवी कपाळी' अशातली बाबांची गत झाली होती. आण्याच्या कपभर चहासाठी चाहटळ न् टारगट लोकांसमोर बाबा अर्वाच्य न् घाण बोलत होते. त्यांचं मनोरंजन करीत होते. त्यांची विकृत तहान शमवीत होती. मला–शांताला–स्वतःला हास्यास्पद करीत होते; पण त्यांची त्यांना शरम नव्हती. एकं आण्याच्या गुळाच्या पापडीसाठी ते वाटेल ते मोल देत होते. ऐकणाऱ्याला हवी तेवढी घाण उपसून देत होते. सुनेच्या संदर्भाची तर गोष्ट राहूच द्या, पण तिच्याच-संबंधी ते वाटेल ते बोलत होते. अन् शांताला या साऱ्याची कल्पना होती. पण ती माझ्याजवळ आपलं दुःख मोकळं करण्याच्या पलीकडे सासऱ्याची वेडेपणाची झळ मनाला लावून घेत नव्हती. शेजारपाजारांत सासऱ्यांकरवीच झालेलं हसं मुकाट्यानं सहन करीत होती. तिची समजूतदार सोबत होती, म्हणूनच मी बाबांना निभावून नेऊ शकत होतो. एरवी तिच्या नैसर्गिक प्रक्रियेच्या प्रहारानं माझ्या डोक्याची दोन शकलंच झाली असती. सासरा असं चव्हाट्यावर सुनेविषयी नाही नाही ते कपोल-कल्पित खोटंनाटं बोलण्याच्या सवयीचा बंदा गुलाम असल्यावर कोणत्या सुनेनं ते सहन केलं असतं? शांता होती म्हणूनच माझ्या घराचा–संसाराचा हिरोशिमा झाला नव्हता.

## शांता

हरे राम! आता यांना काय म्हणावं? वडील अजून घरी आलेले नाहीत. डोक्यात राख घालून ते निघून गेलेले भर दुपारचे. रात्रीचे साडेअकरा वाजताहेत अन् तरीहि यांना काळजी नाही. माझ्या जिवाला दुपारपासनं हा असा घोर लागलेला. माझा डोळ्याला डोळा लागत नाही अन् हे झोपलेदेखील! चक्क घोरत आहेत! यांना झोप लागते तरी कशी?

साऱ्या दिवसाचा खेळखंडोबा झाला. सकाळी शाळेत ती तशी शब्दाशब्दी. आपलेच पैसे न् आपणच चोर. त्या सावरकरबाईंना चांगले चार महिने आधी घेतलेल्या दहा रुपयांची आठवण द्यायला गेलो काय न् बाईंनी आकांडतांडव केले काय? बावीस तारीख आजची म्हणजे एक तारखेला तब्बल आठ दिवस. बाईंना आठवण द्यावी. त्यांनी दिलेच तर आठ दिवस फारसे जड होणार नाहीत म्हणून मी बाईंना हळूच म्हणून पाहिलं, पण बाईंनी असं काही आकाशपाताळ एक केलं की दुसऱ्यांना वाटावं की जणू मीच बाईंना दहा रुपये देणं लागत होते. जणू मी त्यांना पैसे दिले हा माझा गुन्हाच. खेटर खाल्ल्यागत माझी शोचनीय स्थिती झाली होती, त्यांच्याच हमरीतुमरीवर यण्यामुळं!

दुपारी घरी आले तर मामंजींचा हात समोर–त्यांना चमचमीत खाण्याची इच्छा झाली होती, म्हणून एखादा रुपया हवा होता. बावीस तारखेला एक रुपया अशा खर्चासाठी ? तसे आशाधारण दहा रुपये होते घरात. पण अशा कामासाठी......?

'मामंजी, माझ्याजवळ पैसे नाहीत !'

'तुझ्या नवऱ्याजवळ असतील ?'

'असतील कदाचित ! पण मला ठाऊक नाही नक्की !'

'मग बघना त्याच्या कपाटात.'

मला उत्तराचा प्रश्न पडला.

'माझ्याजवळ किल्ली नाही कपाटाच्या कुलपाची ?'

मी कसाबसा दुबळा आधार घेतला.

'चला. हे वरं झालं !'

माझे डोळे एकदम विस्फारले. आश्चर्यानं. मामंजींची अशी प्रतिक्रिया मला अपेक्षित नव्हती. शब्दांची पखाल रिती होईल असं मला वाटलं, पण ही प्रतिक्रिया काही वेगळीच होती.

'मीच त्याला तसं सांगितलं होतं. सासरच्या पैशानं माहेरचं घर भरलं जावं, ही गोष्ट मला मुळीच आवडत नाही ?'

माझ्यावर उघड उघड आरोप केला जात होता. अगदी सरासर खोटा. 'माझ्या माहेरी तशी परिस्थिती नाही. सासरहून चोरून भरती करण्यासारखी', असं उत्तर माझ्या मनात आलं, पण तोंडापर्यंत येऊ शकलं नव्हतं, शकत नव्हतं, पण ज्या विश्वासानं मामंजींनी माझ्यावर निखालस खोटा आरोप केला होता, त्या विश्वासानंच मला अवाक केलं होतं. अविश्वासाच्या एका शब्दानं माझ्या या घरातल्या इतक्या वर्षांच्या अस्तित्वाचंच मुळी कुंकू पुसलं गेलं होतं.

'एवढा पैसा जातो कुठे ?'

मामंजी अभिनिवेशानं बोलत होते– 'तुझा पगार मला कधी दिसलाच नाही अन् तिकडे नवऱ्याला हातचा करून ठेवला आहे. आता द्या माझा बळी म्हणजे होईल मनासारखं'.

उत्तरासाठी अनेक शब्दांचे बुडबुडे मनाच्या पृष्ठभागावर येत होते न् विरून जात होते, पण मी शब्दानं उत्तर देऊ शकत नव्हते, ते मला शक्य नव्हतं.

'नको देऊस पैसे, सूनबाई ! माहेरी तेवढेच कमी जातील ! मी आता माझं तोंडच काळं करतो. जळो ते जिणे लाजीरवाणे. घर माझं, पोरगा माझा, हक्क सुनेचा, तिच्या माहेरचा......'

मामंजी घाईघाईनं कोटटोपी हाती घेऊन घराबाहेर पडले.

'सूनबाई, सांग आपल्या नवऱ्याला–माझ्या नावानं आंघोळ करून मोकळा हो म्हणावं. तू सुतक पाळलं नाहीतरी चालेल......'



'जीवनाचं पाणी सतत खळखळायला हवं. नाही तर त्याचं डबकं होतं.'


तरातरा चालत गेलेदेखील.

मामंजींचा स्वभाव मला पुरता ठाऊक होता, पण आजचं त्यांचं वागणं काही वेगळंच होतं. अविश्वासाच्या एका शब्दानं त्यांनी माझं या सासरच्या हक्काच्या घरचं अस्तित्वच मुळात नाकारलं होतं. त्यावर निखारा ठेवला होता. मामंजींच्या तऱ्हेवाईक वागणुकीचा हा नवा अवतार मला समजू शकणारा नव्हता. सहन न होणारा होता. अरे देवा, पण असं म्हणून कसं चालणार होतं.

मामंजी–सासूबाई अगदी कल्पनेच्या पलीकडचे विक्षिप्त व त्यांच्या तुलनेत हेदेखील मुलखावेगळे विक्षिप्त, पण अगदी उलटया अर्थानं......

सासूबाई म्हणजे आपल्या आईच्या वयाची–स्वभावाची–वात्सल्याची, सासरची आईच ही माझी कल्पना होती. वयाच्या पंधराव्या वर्षी ह्यापेक्षा कोणती दुसरी सुजाण कल्पना मी घरच्या वातावरणातून उचलू शकत होते? बोहल्यावर उभी राहूनदेखील त्या वेळी माझ्यात स्त्रीत्व अंकुरलं नव्हतं. मी नुसती परकरी नव्हते, तर खऱ्याखुऱ्या अर्थानं परकऱ्या वयातच होते. जानेवारी महिन्यात मामंजी–सासूबाई–हे आणि एक दोन सद्‌गृहस्थ मला पाहायला आले. तेव्हा सासूबाईंच्याजवळ मी आतल्या खोलीत खालच्या मानेनं बसले होते. मी बाहेर चहाचं तबक देऊन


Behind every great ma



Go for GOLD SPOT ICE COLD

GREAT MEN FEEL EVEN GREATER WITH
BEHIND ONE FIRST CHANCE YOU GET.
COLD BOTTLE. HERE IS TO YOU & TH

पार्ले पेयांचे अधिकृत उत्पादक :


n there is a bottle of
GOLD SPOT
GOLD SPOT. IT'S SUPERB TASTE IS THE BEST. GET
SNAP THE CAP AND SIP STRAIGHT FROM THE ICE
E GOOD OLD GOLD SPOT.
You'r looKing great
SS-E-01-A
पूना बॉटलिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड
८५ मंगळवार पेठ, पुणे ११ फोन: २४९०९

आल्यावर त्यांनीच प्रेमभरानं माझ्या पाठीवर हात फिरविला होता, अगदी आईच्या स्पर्शासारखाच स्पर्श देणारा. अवघ्या महिन्यातच मी माझ्या नियत घरात आले होते.

सासूबाईंच्या स्वभावाचा आज मी जेव्हा विचार करते तेव्हा, माझा अंदाज फारसा चुकला नाही, असंच मला जाणवतं. माझी अशी निश्चिती होते. सासूबाईंच्या स्वभावाला–तोंडाला तिखटाची चव होती, पण त्यामागं आंतरिक उमाळाच होता. बबीवन्संच्या पाठची ह्यांची भावंडं गेली असल्यामुळे मी घरात आल्यावर व माझ्या पोरसवदा वयामुळं त्यांचं वात्सल्य माझ्यासाठी उफाळून आलं होतं, पण त्यांच्या शब्दांना तिखट खुमारी होती. विलक्षण झोंबणारी, मनात वणवा पेटवणारी. अशा-वेळी मला फक्त यांचाच काय तो आश्रय घेता यायचा. हे माझं सांत्वन करायचे. हे मला नेहमी म्हणत– ' तुझ्या वाटचाला जे माझ्या आईचं सासूपण आलं ते आधीच्या स्वभावाच्या पाठबळावर. माझ्या मनात निर्माण झालेल्या कल्पनेच्या एकशतांश-देखील उतरलं नाही. आईचं तुझ्याशी कसं पटणार म्हणून माझ्या मनाला केवढा घोर लागून होता, पण तू नशीबवान आहेस. तू ह्या घरात आलीस ती आईसाठी यक्षिणीची कांडी घेऊनच आलीस. ती यक्षिणीची कांडी म्हणजे तुझा चांगुलपणा. आता त्याला तेवढी सोशिकपणाची जर लाव. माझ्या आईला स्वतःची आई समज. बस्स, एवढंच कर! '

यांचा प्रभाव–पगडा म्हणा की माहेरच्या आठवणींचा वारसा म्हणा, माझ्या धारणेत हळूहळू सासूबाई आईच्या जागी सामावत गेल्या. तसतशी त्यांच्या शब्दाची धग निवळत निवळत गेली. पूर्वी शब्द मनावर चरे काढीत जात. नंतर ते नुसते चाटून घरंगळू लागले–स्वतःची जाणीवसुद्धा न देता, तेलकट पृष्ठभागावरन पाणी ओघळतं ना, तसं!

माझ्या घरी मॅट्रिकपर्यंतचं माझं शिक्षण म्हणजेच केवढं मोठं वाटायचं सर्वांना. आई म्हणायची–चांगली खूप शिक ग, तर बाबा म्हणायचे जास्त शिकून लग्न होणार कसं? त्यांच्या धारणेत शिकणं म्हणजे लग्नाच्या बाजारातली पत कमी करणंच होतं. नसता उपद्व्याप होता. म्हणूनच तर त्यांनी दोन महिन्यांवर असलेल्या माझ्या मॅट्रिकच्या परीक्षेचादेखील विचार केला नाही व माझे हात पिवळे केले. मलाही मॅट्रिकची परीक्षा गेल्याचं तसं फारसं जाणवलं नव्हतं.

पण यांच्या सहवासानं एक भावना माझ्या मनात नेहमीकरता उजळून गेली. लग्नाआधी मला एवढी कुणकुण लागली होती की नवऱ्या मुलाची इच्छा उन्हा-ळ्यातच लग्न करायची होती, पण लग्न फेब्रुवारी महिन्यातच झालं होतं.

सासरी आल्यावर मला कळलं की यांची बी. ए. ची परीक्षा मार्चमध्ये होती. म्हणून त्यांचा फेब्रुवारीच्या तिथीला विरोध होता. फेब्रुवारीच्या एकवीस तारखेला लग्न होऊनसुद्धा तीस मार्चच्या बी. ए. च्या परीक्षेला हे बसले. चांगले दुसऱ्या

वर्गात पास झाले. त्या अल्लड पोरवयात यांचा जो ठसा माझ्या मनात उमटला नव्हता, तो नंतर वयपरत्वे व निसर्गपरत्वे मनात एका वेगळ्याच पार्श्वभूमीवर जागला.

आयुष्यात आपल्याला जे पाहिजे होतं ते—ज्याचीच आपली लायकी होती ते आपल्याला मिळालं ही भावना ज्या क्षणी मनात रुजली, तो क्षण—मरणाचा. प्रगती संपली. उमेद नष्ट झाली. जगण्याची जिद्द संपली. जीवनाला अर्थच राहिला नाही मग. सतत प्रयत्न. सतत वाटचाल. नजर पुढे किती चालायचं आहे ह्यानं वेधलेली. किती चालून आलो हे पाहण्यासाठी, मागं पाहण्यासारखा नादानपणा नाही.

ह्यांच्या जीवनात अशीच जिद्द होती. मॅट्रिक होऊन कारकुनी गळ्यात आली, पण म्हणून ते खचले नाहीत.

माझ्यात ह्यांनी ही भावना भिनविली. सप्लिमेंटरी परीक्षेला बसण्यासाठी प्रवृत्त केलं. अभ्यास करवून घेतला. सासूबाई-मामंजींच्या विरोधाशी स्वत: सामना दिला. पुरवणीपरीक्षेत राहिलेला इंग्रजी विषय मार्चच्या परीक्षेत काढायला लावला. सातवा महिना लागल्याचा नसता बाऊ मला—सासूबाईंना त्यांनी करू दिला नव्हता. इंटरदेखील झाले अन् बी. ए. सुद्धा. आईबाबांना कोण आनंद झाला—आपली मुलगी सासरी राहून बी. ए. सुद्धा झाली हे कळून. शाळेत नोकरी करण्यासाठी प्रोत्साहन दिलं. ' एस्. ए. एस्. झालो की मग मात्र तुला नोकरी करू देणार नाही. मग तू एम् ए. कर व नंतर घरी बबन्या—नमीचं बघ. ' सतत प्रयत्न, सतत घडपड. जीवनाचं पाणी सतत खळखळायला हवं. नाहीतर त्याचं डबकं होतं. मामंजींच्या जीवनासारखं.

मामंजींच्या तऱ्हेवाईक वागण्याचं ते असंच समर्थन करीत.

ह्यांचं म्हणणं खरंच होतं. घशात दुखू लागलं म्हणून मामंजींनी कॅन्सरचा बाऊ केला. डोक्यात राख घालून घेतली. सारं घर डोक्यावर घेतलं, पण घशात फोड

पोरवाल
नेत्रांजन काजळ टूथपावडर
पोरवाल आणि कं., टिळक रोड, पुणे २.

झाला होता. कॅन्सर नव्हता, पण त्या दिवसात मांडून त्यांनी पाच रुपये रोज घेतला. च्यवनप्राश–गुलकंद खाल्ला. तूप खाल्लं. बदामाचा साजूक शिरा खाल्ला. शेवटी अजीर्णानं पटकणी खाल्ली. अन्न तारी अन्न मारी, तशातली गत झाली. खाण्या-सारखं खाणं झालं, पण दुखणं पहिल्यासारखंच राहिलं. अन्नावरची वासना जशीच्या तशी होती. कितीही खाल्लं तरी ती तशीच जबडा फाडून दात विचकणार होती...

मामंजी मुद्दाम घालून-पाडून बोलत. असं काही बोललं म्हणजे आपल्या तोंडाचा खलबत्ता कुटणं बंद करण्यासाठी म्हणून तरी आम्ही लोक त्यांना पैसे देऊ ही त्यांची भावना होती. मला जाणवली ती ह्यांनी सांगितल्यावरच. खरंच, मामंजी तोंडाचा जणू दाणपट्टाच करत. मुद्दामच अन् खरोखरीच त्यांची ती अर्वाच्य सरबत्ती व कल्प-नेच्या भराऱ्या पाहून असंच वाटू लागायचं की हे घ्या पैसे, पण तेवढं तोंड आवरा; पण प्रत्येक वेळी त्यांना असं दबून जाणं परिस्थितीवशात केवळ अशक्य होतं. ह्यांच्या सहवासानं–तालमीनं–मलादेखील मामंजींच्या शब्दांतनं एरवी जाणवणारा विखार जाणवेनासा झाला होता. मामंजींचे शब्द शब्द म्हणूनच घ्यायचे असतात. त्यांच्यामागील भयंकर अर्थ आम्हालांच काय, पण स्वतः मामंजींनादेखील अभिप्रेत नव्हता–नसतो असेच एव्हाना मलाही वाटू लागले होते ह्यांच्याप्रमाणंच.

आज मामंजी कुठे असतील ? त्यांना भूक लागली असेल ? दिवसभर अन्नाचा कण त्यांच्या पोटात नाही ? कुठे असतील ते ? खरंच, रुपया दिला असता तर... त्यांच्या मनानं भलतासलता विपरीत विचार केला तर... नको ग आई अंबाबाई. त्यांना सुखरूप घरी येऊ दे. खणानारळानं ओटी भरीन तुझी. माते, माझी लाज राख......

मामंजी जिथं असतील तिथून त्यांना घरी परत येण्याची बुद्धी दे.

## मामंजी

काय सालं आपलं जिणं आहे ? जहर खायला पैसा नाही. या तलावात मोक्ष-मोक्ष करायचाच आज, म्हणून दुपारपासन येऊन काठावर बसलो आहे, पण वाटत होतं तेवढं सोपं नाही हे. या थंडगार हिरवट पाण्याच्या आठवणीसरशी अंग शहा-रून येतं. त्यात गटंगळायचं, एक ... दोन ... तीन ... तीनदा वर यायचं ... नंतर मग ...

एवढं आपल्याला जमणारं नाही. त्यापेक्षा जहर ... कुत्र्याच्या विषाची पुडी ... ढेकणाची पावडर ... पेढ्यात ... तशी घशाखाली येणार नाही ...

पेढे ... जिलबी ... बासुंदी ... दिलबहार ... रवडी ... डालमोट ...

सालं पुनः तेच ! विष खायचं तेही पेढ्यात. जीवनाला वैतागल्याचंच लक्षण ... अन्नावरची वासना मरत नाही ... मारता येत नाही ... मन काबूत



'सूनबाई नक्कीच जागी असेल.
शक्यतो अन्न झाकून ठेवलं असेल तिनं माझ्यासाठी......'

★

ठेवता येत नाही ... न् आपण मरायला निघालो ... स्वत:ला मरायला निघालो... गळा घोटायला ... गळफास ... बाहेर लोंबकळणारी जीभ ... उचकी ...नको बाप्पा. एवढे हाल स्वत:चे ... अन् स्वत:च करून घ्यायचे ? . . पण काहून ?

दुपारी कुणी पाहील न् पाण्याकडे पाहवत नव्हतं, म्हणून तसाच वेळ गेला. संध्याकाळ झाली. वर्दळ वाढली. मनातला विचार तसाच चुळबुळत राहिला. पारशी अग्यारीच्या घड्याळात नऊ वाजलेत. वर्दळ थंडावली. अंधार वाढला. पाण्यात दूरवर दिव्यांचं प्रतिबिंब तेवढं दिसत होतं. जवळचं पाणी दिसत नव्हतं डोळ्यांना, पण मनाला मात्र दिसू लागलं होतं. हिवरट झाक मारणारं ... शेवाळी रंगाचं ... थंडगार ... दहा वाजून गेलेत, पण मनाचा हिय्या होत नाही. जिभेचे चोचले चालू द्यायचे नाहीत, असं आपण मनाशी लाख ठरवतो, पण मन मारता येत नाही. भजी आठवली की जिलबी ... मग बासुंदी ... दही मलईचं ... दिल-बहार ... राजभोग ... रसमलाई ... ईडली ... लाडू डिंकाचा ... दोसा ... सांबर-वडा ... पुडाची वडी ... पलंगतोड ... आलुबोंडा ... पुन: सालं तेच !

तरी बरं, सालं अनेकदा ओकारी येईस्तो खाल्लं, पण वासना जात नाही, मरता मरत नाही. जिभेचे चोचले आवरावयाचा विचार मनात यायचीच देर की नुसत्या आठवणी जागतात खाण्याच्या पदार्थांच्या ... एका नावासरशी दुसरं नाव

...मग तिसरं ... चौथं... पाढे येत नाहीत, पण नावं येतच राहतात ... नाटकाचं वेड आलं गेलं, न्यूयॉर्क कॉटन नंबर विसरलो, पण खाणं तेवढं मागं ...

काय सालं कुत्र्याचं जिणं लाभलं आपल्याला. पोराला हिस्सा मागावा लागतो घरात. पोरगा काय कमी आहे. 'तुम्हीच गिऱ्हाईक पाहा. मी फक्त सही तेवढी करीन. मला हे घर नको आहे. तुमचा एक पैसा मला नको आहे. तुम्ही काय आजवर माझ्यासाठी कमी केलं ? घर विका. पैसा तुमच्याजवळच ठेवा. दुसऱ्या घरात राहू किरायाच्या. दोन वर्षांनी मी घर बांधणार आहे ...' काय कपाळ बोलणार ? पोराला हिस्सा मागून त्याला लाजवायचं म्हटलं तर पोरगा असा महावस्ताद. पठ्ठा शिकला. एम्. ए झाला. किरायातली एक कवडी मागितली नाही न् सूनबाई तशीच ...त्याच्याच तालमीतली ... मी एवढं नासकं-कुजकं, हलकट, घाणेरडं बोलतो म्हणून तरी पैसे यांनी द्यावेत म्हणून, पण काही नाही ... यांना त्याचं काहीच वाटत नाही.

लाखदा वाटतं काय साली आपली जिंदगानी आहे. लाखदा ठरवितो पोरासमोर–सूनबाईसमोर तोंड वेंगाडायचं नाही, पण नजर खवली होते.–स्वयंपाकघरात काही मिळतं का बकाणा मारायला याचा–अदमास घेते. फडताळ उघडं आहे का पाहतो. सूनबाईच्या कुडचांच्या वाटीत चिल्लर आहे की नाही ? ... कधी कधी बबन्याच्या कंपास पेटीत एखादा आणा असतो ...पण साली बोंब होते ... तो ठणाणा करतो ...

खरंच ही होती तोपर्यंत ठीक होतं. घरात लक्ष्मी होती. घरात आबादी-आबाद होती. बरकत होती. गाठीला पैसा होता, पण ही गेली ... स्वतःबरोबर घरातली लक्ष्मीच घेऊन गेली. वाडा गेला. किराया गेला ... अन् आपल्या नशिबी आलं ही दिवसांची शितं वचवचा चिवडणं ...

घरात पैशाचं दिसायचं नाव नाही ... दर्शन नाही ... कुठंच नाही ... साली कुलपं आलीत ... दूमदुमत्याला कुलूप ... मधल्या घरातल्या फडताळाला कुलूप ... पोराच्या, सूनबाईच्या पेट्याच विचारायला नको ... साल्या बबन्याच्या लोखंडी दप्तरालाही क्लिकचं कुलूप ... माझ्या घरात मलाच चोरी ...

पोरांचे मित्र... ओळखीचे–पाळखीचे... शेजारी... चहा... चहासाठी... आणा... पोराला कळलं की तो डाफरत होता...पण गपचूप बसत होता–' मग तू देत नाही तर उपाशी मरू का मी ! ' असं म्हटलं की...' काय केशवराव, चहा घेणार का ? ' पंजाबरावाच्या दुकानावरून मुद्दाम चक्कर मारली की कोणी तरी आवाज द्यायचाच...मग ' कसं काय ? ' म्हणत ते हळूहळू आपल्याला खुलवीत...चहासाठी थोडसं तसलं बोलावं लागलं तर काय झालं ? काही किस्से...बायकांचे...लोकांना तेच तर हवं होतं...पण पुढे असं झालं की नुसतं, ' काय केशवराव ! ' म्हणायचीच देर की सुरवातच तशी होऊ लागली...लोकांना पाहिजे तशी...बाहेरच्या बायकांच्या

ओघात सूनबाई यायला लागली...मग लोक ओढूनताणून आपल्या पोरावर घसरत होते... मी सुनेवर घसरावं म्हणून...तीन आण्यांची बर्फी...मिरचीचे भजे...आलूपोहा...समोसा...पेढे...चिवडा-शेव...ह्यानं डोकं फिरायचं. नुसत्या आठवणीनं मस्तक गरगरायचं...मग हॉटेलात सारे पदार्थ डोळ्यांसमोर असताना...त्यांचा वास येत असताना...मणमणणारं डोकं...लोकांना नेमकं काय पाहिजे हे कळलेलं...मग ऐकणारे पोरावर उतरत. मला सहानुभूती दाखव. रम भज्यांचा...आलूपोह्याचा वास...डोकं तसं तसं चालायचं...मग सुरू व्हायचं-५।रगा-सूनबाई एकाच खोलीत झोपतात...झोपतात म्हणजे...मग पोरं...काही आवाज...कसचे...

साली लानत आहे ह्या जिदगानीवर. तोंड आहे का पायखाना...स्वतःच्या पोराविषयी-सुनेविषयी खोटं...घाण; कल्पनेनं नाही नाही ते बोलायचं...एका सिंगल चहासाठी...एक आण्याच्या चिवड्यासाठी...टोळभैरवांची सुनेविषयीची कुजकट घाणेरडी बोलणी, हॅऽहॅऽऽ करून चिवड्याच्या फक्कीबरोबर गिळायची. त्यांच्या दयेची थुंकी झेलायची...जळो ती जीभ...नेहमीच ज़िभल्या चाटणारी. खायखाय...

खायखाय...भूक...दुपारपास्नं पोटात काहीच गेलं नाही...तलावात तेव्हाच जीव दिला असता, तर एकदाची खायखाय गेली असती...पण मरायची धमक नाही आपल्याला...

घरच्याशिवाय कुठं खायला मिळेल ? सूनबाईनं अन्न ठेवलं असेल, फोडणीचं वरण...भात...पोळ्या...सूनबाई तशी हरामजादी नाही...पण घरी जायचं ?

न जाऊन कसं चालेल ? जाणार कुठं ? जीव नकोसा होतो, तरी पण प्यारा असतो ना. अन्नावरची वासना मरता मरत नाही ना......


जीव देता येत नाही म्हणून जगावंच लागेल...बोलावणं येईपर्यंत जगायचं म्हणजे खावंच लागेल. जगण्यासाठी खायचं...खाण्यासाठी जगायचं...खाणं...खायखाय...खायखाय न् मसणात जाय...

सूनबाई नक्कीच जागी असेल, शिक्यात अन्न झाकून ठेवलं असेल माझ्यासाठी अन् तिच्यासाठीदेखील...फोडणीचं वरण...भात...पोळ्या...

पोळीवरोबर गूळआंबा मिळाला तर...करवंदाचा गूळआंबा...सूनबाईला करवंदाच्या गूळआंब्याचा एक चमचातरी मागितलाच पाहिजे...

गूळआंबा...करवंदाचा गूळआंबा...

● ● ●





# झडप घालणारा वाघ

# माओ त्से तुंग

# कुंडलीविचार

श्री. के. केळकर

मोठ्या पुरुषांच्या जन्मवेळा शोधून काढणे म्हणजे " नदीचे मूळ व ऋषींचे कूळ " शोधण्याइतकेच दुरापास्त व जिकिरीचे असते. त्यातल्या त्यात कम्युनिस्ट-प्रणीत राजवटीतील पोलादी पडद्यातून माहिती गोळा करण्याचे काम फारच कठीण ! लेनिन, स्टॅलिन व क्रुश्चेव्ह यांच्या जन्मवेळा व जन्मतारखा समजावून घेणे अनेक ज्योतिषी मित्रांना जमले नाही. सुदैवाने क्रुश्चेव्हचे उदारमतवादी धोरणामुळे जी काही माहिती उपलब्ध झाली, तीवरून त्यांची पत्रिका तयार करण्याचे कामात मला व्यक्तिश: तरी यश लाभले ही समाधानाची गोष्ट आहे.

आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांवरून माओचा जन्म २६ डिसेंबर, १८९३ रोजी शाओशान खेड्यात झाला हे विश्वासार्ह समजण्यास हरकत नाही. जन्मवेळ मात्र कोणती घ्यावी हा वादग्रस्त प्रश्न आहे. काही ज्योतिषांनी माओच्या अनुमानिक पत्रिका मांडल्या आहेत. परंतु तत्संबंधी माहिती कोठून मिळाली याचा तपशील अगर आधार दिलेला नाही. अस्ट्रालॉजिकल मॅगेझीनचे संपादक डॉ. बी. व्ही, रामन् यांनी Notable nativities या ग्रंथात निरयन मकर लग्नाची पत्रिका मांडली असून जन्मवेळ सकाळी ८ (स्थानिक वेळ) दिली आहे. दुसऱ्या एका ज्योतिर्विदाने सायन मकर २३ लग्न बिंदू दिला आहे. त्यात जन्मवेळेचा पत्ता नाही. आर्. सी. डेव्हिसन या आंग्ल ज्योतिर्विदाने डिसेंबर, १९६२ मध्ये माओच्या काही डायरेक्शनस् दिल्या आहेत. त्यावरून धनू (सायन) लग्न बिंदू घेतला असावा, असे दिसते. परंतु तसा खुलासा त्यांनी केलेला नाही.



समन्वय साधणे

अशा व्यक्तींना

जमत नाही.

माओच्या जीवनाचा विचार करता माझ्या मते माओचा लग्नबिंदू **सायन धनू** ११ व दशम बिंदू तूळ असावा. हा लग्नबिंदू येण्यास जन्मवेळ अदमासे पहाटे ५ ची असावी, असे अनुमान करणे भाग पडते. माओचा लग्नबिंदू धनू ११ कसा जमतो ते पाहा.

(१) लालचीन कम्युनिस्ट प्रजासत्ताकाची पत्रिका सायन कुंभ ११ व दशम धनू १ ची आहे. ही पत्रिका सर्व ज्योतिर्विदांनी मान्य केली आहे. ज्या राष्ट्र-पुरुषांनी नवचीनच्या निर्मितीसाठी आपला देह झिजविला व गेली १५-१६ वर्षे अनभिषिक्त राज्यसत्ता भोगली त्यांचा लग्नबिंदू (धनू ११) हा त्या देशाच्या पत्रिकेत दशमबिंदूवर असणे अत्यंत स्वाभाविक व सयुक्तिक वाटते.

(२) सेफारिअल या ज्योतिर्विदाने धनू ११ चे केलेले अंशवर्णन माओचे स्वभावास किती समर्पक जमते ते पाहा—

प्रतीक : **झडप घालण्याच्या तयारीत दबा धरून बसलेला वाघ.**

वरील प्रतीक चढाऊ व कृतघ्नवृत्ती दर्शविते. ध्येयपूर्ततेसाठी सतत धडपडणारा व त्या पूर्ततेसाठी जरूर पडल्यास जबरदस्तीचा (force) उपयोग करणारा. (या अंशात) मुत्सद्देगिरी व लढाऊ वृत्ती यांचा उत्तम मिलाफ झालेला दिसतो व त्यामुळेच खुनशी व निश्चयी स्वभाव यांचाही संयोग आहे. (तसेच) अनेक महत्त्वाकांक्षा फलद्रूप करून घेणारा (आणि हे करत असताना) अनेक शत्रू निर्माण करणारा असतो. योजना कार्यवाही करताना संकटात येतो. या अंशाचे थोडक्यात

वर्णन करावयाचे म्हणजे **हिकमती** असे करता येईल.

(३) कान्झिमिन्सकी या दुसऱ्या ज्योतिषाने याच अंशाचे दिलेले वर्णन पाहा.

हा अंश नेपच्यूनचे आधिपत्याखाली येतो. ज्याच्याकडे थवेच्या थवे येत आहेत, असा खांद्यावर जाळे टाकून भक्ष्याची वाट पाहात असलेला कोळी.


तो पुढे म्हणतो की या लग्नबिंदूवर जन्मलेल्या व्यक्तीची मानसिक घडण उच्च पातळीची असते. हा अंश प्रसिद्धिदर्शक आहे. या व्यक्तीस समाजात विशेष स्थान प्राप्त होईल अगर ही व्यक्ती काहीना काही कारणामुळे समाजापुढे येईल. स्वभावाने मात्र थोडासा वाकडा ('Jerky'), रागीट (Irritable) असे असूनही दृढ निश्चयी व नियंत्रणाची (controlling) उत्तम कला असते. यांचे अंगी (मनुष्य-बळ) संग्रह करण्याची खुबी असते. ज्ञानी असतो. उभारणी (Projection) हा याचा स्थायीभाव !

## माओचे पत्रिकेतील काही ग्रहयोग व त्यांचे विश्लेषण

**गुरू–मंगळ प्रतियोग :** गुरू हा मूलभूत थंड, सात्विक प्रवृत्तीचा, ध्येयवादी व महत्त्वाकांक्षी तर मंगळ लढाऊ, तापट, उग्र व तामसी आहे. माओच्या पत्रिकेत या दोन ग्रहांमधील प्रतियोग व्यय-षष्ठातून होत आहे. या योगामुळे राजकारणात जहालमतवादी, एकांडी व अतिमहत्त्वाकांक्षी भूमिकेकडे कल दिसतो. समन्वय साधणे अशा व्यक्तींना जमत नाही. तसेच महत्त्वाकांक्षापूर्ततेसाठी अवलंबिलेले मार्ग थोडेसे विचित्र स्वरूपाचे असतात. प्रतियोगामुळे मधूनमधून निराशा निर्माण होते. पराजय पत्करावा लागतो. माओच्या या एकांडी स्वभावामुळे अद्याप एकाच गोटातील चीन-रशियामधील फूट सांधली जात नसावी !

**शनी-शुक्र त्रिकोण :**–शनी हा संथ, कष्टाळू, थोडा दुःखी, निष्ठुर व कठोर सत्य दर्शविणारा ग्रह आहे. याउलट शुक्र हौशी, प्रेमळ, विलासी व कोमल भावना दर्शविणारा ग्रह आहे. शुक्रशनीच्या कोणत्याही ग्रहयोगात शुक्राचे गुणधर्म शनी मर्यादित व आकुंचित करतो व त्यास केवळ कर्तव्य करण्याच्या दृष्टिकोनातून वागावयास लावतो. माओच्या जीवनात प्रेम वगैरे गोष्टींना फारसे महत्त्व नव्हते, असे म्हणण्यापेक्षा ध्येयवादी वृत्तीमुळे या विषयात वेळ घालविण्यास त्याला वेळच नसावा. माओचे पहिले लग्न वयाचे चौदाव्या वर्षी एका वीस वर्षांच्या मुलीशी आई-वडिलांनी लावून दिले. परंतु या मुलीशी वैवाहिक असे जीवन त्यांनी कधीच कंठले नाही. दुसरे लग्न १९२० साली म्हणजे वयाचे २७ वे वर्षी यांग-काई–हुई हिच्याशी केले. ही बाई हुशार व माओच्या तत्त्वप्रणालीतील होती. आदर्श रोमान्स म्हणून या लग्नाची ख्याती होती, परंतु या लग्नाचा आनंद १० वर्षांचेवर माओला लाभला नाही.

**चंद्र-हर्शल केंद्र**–माओच्या पत्रिकेत हा केंद्रयोग भाग्य–लाभातून झाला आहे. हा एक महत्त्वाचा योग माओच्या जीवनात यश दर्शविणारा आहे. त्याच्या




**–माओची पत्रिका–**

स्वच्छंदी व व्यवहारी जीवनाला यशाची झालर दर्शविणारा हा योग असावा असे वाटते. आश्चर्यकारक, चमत्कृतिजन्य विचार दर्शविणारा हर्शल चंचल चंद्राच्या केंद्रात आहे. हा योग लेखक, कवी, साहित्यिक अगर कलावंत पत्रिकेत सापडतो. हा योग लाभ-भाग्यातून होत असल्यामुळे माओच्या विचित्र, लहरी व चमत्कृतिपूर्ण वागण्यात अन्तःस्फूर्तीचा (Intuition) भाग आढळतो. चमत्कारिक व बुद्धीला न पटणाऱ्या वागण्यातसुद्धा माओच्या आकांक्षा बऱ्याच दिवसांच्या लढ्यानंतर पूर्ण झाल्या. ११ वे स्थानातील हर्शलामुळे मित्रांकरवी अनपेक्षित मदत मिळाली व कामे फत्ते झाली. बुद्धीच्या (Reason) निकषावर माओच्या वागण्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केल्यास तो अनेकवेळा निष्फळ ठरतो तो याच योगामुळे. कवित्वाचा व लिखाणाचा भाग माओच्या जीवनात यामुळेच आलेला असावा.

**बुध-नेपच्यून प्रतियोग**–बुध हा ग्रह बौद्धिक जीवनाची आवड दर्शविणारा, लेखन, प्रसिद्धीकरण, भाषणप्रावीण्य यांचा द्योतक आहे. तर नेपच्यून हा कल्पनाशक्तीत गुंगविणारा, स्वप्नाळू अस्थिरता, दिरंगाई, गोंधळया व काळजी निर्माण करावयास लावणारा आहे. माओच्या पत्रिकेत हा अशुभ प्रतियोग लग्न सप्तमातून झाला आहे. माओच्या जीवनात कोणत्याही ग्रहातील प्रतियोगामुळे नैराश्य व विषाद निर्माण होतो किंवा प्रदीर्घ प्रयत्नानंतर यश दर्शविणारा हा योग आहे. काही वेळा स्वतःचा आत्मविश्वास ढळल्यामुळे अगर निराशेपोटी कमकुवतपणा निर्माण

झाल्यामुळे या योगामुळे मनुष्य क्लृप्त्या करणारा (Schemy) किंवा लबाडीच्या योजना करणारा (Cunning) होतो. माओच्या गनिमी युद्धाची बीजे या योगात बऱ्याच प्रमाणात आढळतात. असा योग रोमेलच्या पत्रिकेत होता. गनिमीकावा हा युद्धनीतीतील महत्त्वाचा योग समजला जातो. माओची चतुःसूत्री या दृष्टियोगातून पाहण्याजोगी आहे. (१) शत्रू पुढे सरसावला असेल तेव्हा आम्ही माघार घेतो. (२) शत्रू थांबून डेरेदाखल झाला की आम्ही त्याला सतावितो, (३) शत्रूने माघार घेतली की त्याचा पाठलाग करतो व (४) शत्रू लढाई हरला की हल्ला चढवितो.

सायन पत्रिकेतील लग्नबिंदूचे वर्णन व त्या पत्रिकेतील ग्रहयोगांचे परिणाम थोडक्यात दिले आहेत. ग्रहयोगाची चर्चा राशिगत न करता फक्त भागवत स्थिती विचारात घेऊन विचार केला आहे. उदा०—माओच्या व्यक्तिमत्त्वाच्या काही छटा दाखविण्यास यांचा उत्तम उपयोग होतो. विशेषतः माओचा गनिमीकावा (बुधनेपच्यून प्रतियोग)—अंतःप्रेरणेने व लहरीपणाने वागणे (चंद्र.—हर्शल केंद्र) व्यावहारिक जगाकडे कर्तव्य म्हणूनच पाहण्याची वृत्ती (शनी-शुक्र त्रिकोण), इ. विस्तारभयास्तव आणखी काही योगांची चर्चा करता आलेली नाही.

## निरयन वृश्चिक लग्न

थोडेसे आपण आता निरयन वृश्चिक लग्नाकडे वळू. वृश्चिक रास ही लढाऊ व स्वसंरक्षण करणारी आहे. थोडीशी गूढ असल्याने बराच काल दडपली गेली तर मात्र एकदम स्फोटासारखी उफाळून बाहेर येईल. क्रूर, खुनशी, संशयी, धूर्त, मत्सरी, आपमतलबी, ढोंगी व बेफिकीर असे या लग्नावर उदित असलेल्या व्यक्तीचे वर्णन करता येईल. लग्नबिंदूवर ज्येष्ठा हे बुधाचे नक्षत्र उदित असून बुध तेथेच आहे. जेष्ठा हे टीकात्मक, चिकित्सक व क्रूर नक्षत्र आहे. वृश्चिक राशीच्या खुनशी स्वभावाला या ज्येष्ठा नक्षत्राने पुष्टीच दिली आहे.


वृश्चिक लग्नाला राजयोग करणारे दोनच ग्रह म्हणजे रवी व चंद्र. भाग्येश चंद्र कर्केचा (आश्लेषा) भाग्यात व दशमेश रवी धनुराशीतील (मूळ) धनस्थानात आहे. याखालोखाल पंचमेश व धनेश गुरू वृषभेत (कृत्तिका) सप्तमात आहे. लग्नेश (व षष्ठेश) मंगळ अनुराधा या शनीच्या नक्षत्रात आहे. तृतीयेश व चतुर्थेश शनी मंगळाच्या चित्रा नक्षत्रात आहे (भावचलिताप्रमाणे लाभात येत आहे.) हे दोन्हीही ग्रह निष्फळ झाले आहेत. पंचमात राहू रेवती नक्षत्रात आहे. संततीचे दृष्टीने हा चांगला नाही. दुसऱ्या बायकोपासून माओला एकंदर पाच मुले सात वर्षांत झाली असल्याचे एका ग्रंथात नमूद केले आहे. त्यांतील तीन लाँगमार्चचे वेळी शेतकऱ्यांकडे सोडून देण्यात आली. उरलेल्या मुलांचा उल्लेख वरील ग्रंथात कोठेही आलेला नाही. अशातऱ्हेने प्रत्येक ग्रहांचा विचार वारकाईने करता येईल. परंतु वाचकांनी माओच्या जीवनाशी इतर ग्रह कसे निगडीत आहेत ते जरूर पाहावे.

## आगामी काल

आगामी कालाची चाहूल काय आहे हे सांगितल्याशिवाय वाचकांचे समाधान होणार नाही. राष्ट्रपुरुषांच्या पत्रिकेत त्यांच्या वैयक्तिक जीवनाला फारसे महत्त्व नसते. कारण राष्ट्राशी त्यांचे नशीब बांधलेले असते. किंबहुना राष्ट्राचे भाग्यात व्यक्तीला फारसे महत्त्व नसते आणि आहे असे मानल्यास दोघांची नशिबे परस्परावलंबी असतात, असे मानणे योग्य ठरेल.

नवचीनच्या पत्रिकेत लग्न कुंभ ११ व दशमबिंदू धनू १ आहे. या दशमबिंदूवर नोव्हेंबर २३ चे धनू १ अंशातील सूर्यग्रहण अंशात्मक होत आहे. मेदिनीय ज्योतिषात दशमावरील रविग्रहणास फार महत्त्व असते. कारण ते राजास, राजप्रमुखास किंवा राजकीय वर्तुळातील महत्त्वाच्या व्यक्तीस अत्यंत अशुभ असते. या शिवाय माओच्या पत्रिकेतील लग्न व सप्तमबिंदूनजीक मे ३० व जून १४ ची मिथुन-धनू राशीतील रवी-चंद्र-ग्रहणे होत आहेत. ती माओच्या प्रकृतिमानाचे दृष्टीने


# लोणच्याचा तयार मसाला



केर्‍या किंवा लिंबें यांच्या फोडी, मीठ व बेडेकर लोणच्याचा तयार मसाला एकत्र नीट कालवावा व बरणींत भरावा. नंतर तेलाची फोडणी थंड करून वर ओतावी म्हणजे आपणहि अप्रतिम 'बेडेकर' लोणचें बनवूं शकाल.

माहितीपत्रक मागा

**बेडेकर मसालेवाले**
मुगभाट मुंबई-४.

अशुभ आहेत. परंतु आतापर्यंतच्या अनुभवाने ग्रहणे ज्या बिंदूंवर झाली, त्या बिंदूंच्या केंद्र अगर प्रतियोगात रवीमंगळांसारखे ग्रह येतात. त्याचवेळी अशा अशुभ बिंदूंचे अशुभत्व प्रत्ययास येते. अशी परिस्थिती ऑक्टोबर, १९६५ चे दुसऱ्या आठवड्यापासून सुरवात होते. बुध हा वृश्चिक लग्नास अष्टमेश व लाभेश असल्यामुळे अत्यंत अशुभ ठरतो. त्यातून तो ज्येष्ठा या क्रूर नक्षत्रात आहे. तसेच वक्री शनी जून, जुलै १९६५ पासून लग्नबिंदूशी अशुभ योग करीत असून, सप्टेंबरचे सुमारास अंशात्मक अशुभ योग करील.

**या सर्व ग्रहस्थितीचा विचार करता ऑक्टोबर १९६५ पासून विशेषतः फेब्रुवारी १९६६ चे सुमारास मेंदूविकृतीने प्रकृती बिघडावी वा त्यांचे राजकीय जीवन संपुष्टात यावे, असे ज्योतिषशास्त्रदृष्टया अनुमान निघते.**

## चीनचा यूनो प्रवेश

यूनोच्या पत्रिकेत (मेष २०° लग्नबिंदू मकर ११° दशमबिंदू) चतुर्थात शनी-मंगळ अंशात्मक युती आहे. चीनच्या यूनो प्रवेशाचा विचार करण्याचे दृष्टीने ही युती फार महत्त्वाची आहे.

मागील वर्षी (१९६४) यूनोचे पत्रिकेवर ग्रह नक्षत्र फलादेश संशोधन मंडळातर्फे मी व्याख्यान दिले होते. जानेवारीतील (१९६४) दशमावरील झालेल्या ग्रहणा-मुळे व यू थांट (सेक्रेटरी जनरल) यांच्या जन्मतारखेचा विचार करून १९६४ साल यूनोला अत्यंत बिकट आहे व तीच परिस्थिती १९६५–६६ मध्ये तशीच पुढे चालू राहील, असे भाकीत केले होते. या विधानाची सत्यता वाचकांना पटली असेलच. कारण यूनोची अधिवेशने एक ना अनेक कारणांमुळे लांबणीवर टाकली जात आहेत. हे कशाचे द्योतक आहे ? काही ज्योतिर्विदांना यूनो संघटना नाहीशी होईल असे वाटते. मला व्यक्तिशः तसे वाटत नाही. आगामी एक दोन वर्षांत यूनोचे पुनरुज्जीवन होण्याची शक्यता आहे ! !

चीनची रास काही पंडितांना तूळ (निरयन) तर काहींना सायन कर्क वाटते. निरयन राशीचक्रातून नेपच्यून या मंदगती व गोंधळ्या ग्रहाचे भ्रमण चालू असताना मकरेतील शनीशी केंद्रयोग करण्यापूर्वीच भारतावर आक्रमण करण्याची चीनला दुर्बुद्धी झाला. नेपच्यून हा गोंधळ तसाच काळजी निर्माण करणारा ग्रह आहे. एवढयावरून चीनची सायन कर्क रास नाही, असे मानणे हेही चुकीचे ठरेल. कारण १९४५ मध्ये यूनो स्थापन झाल्यापासून, विशेषतः १९४९ पासून चीनला यूनोत घटक राष्ट्र म्हणून घ्यावे असे अनेकवेळा ठराव आले. परंतु ते फेटाळले गेले, पण एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, ज्या ज्या वेळी असे ठराव आले त्या त्या वेळी सायन गुरूचे मेष किंवा मकर राशीतून भ्रमण चालू होते. १९६६ नंतर गुरू सायन कर्केत जात असून, त्यावेळी तो यूनोच्या पत्रिकेतील शनी-मंगळ युतीवरून शुभ भ्रमण करील व त्यावेळी यूनोत चीनला स्वतंत्र राष्ट्र म्हणून सभासद करून घेण्याची शक्यता ज्योतिषशास्त्रदृष्टया वाटते. ● ●

# ाझी
# स्मासुराचा
# ादयास्त



ा. म. शास्त्री

ुत्तरार्ध

ेखांक तिसरा

[ नाताळ उजाडला. हिटलरने स्टॅलिनला नव्या वर्षाचे अभीष्टचिंतन पाठवले—

'तुम्हाला व्यक्तिशः आयुरारोग्य लाभो ही इच्छा...' स्टॅलिननेही उत्तर पाठवले—

'जर्मनी व रशिया यांची मैत्री आता रक्तानेच सांधली गेली असल्यामुळे ती चिरकाल टिकेल व स्थिर राहील यात शंका नाही...'

या दोन हुकूमशहांची मैत्री रक्तानेच सांधली गेली होती हे अक्षरशः खरे होते. फक्त रक्त कुणाचे, एवढाच प्रश्न दरवेळी नव्याने उपस्थित होत होता. गेल्या वेळी पोलंडचा घोट हिटलरने घेतला५ आता फिनलंडचा गळा आवळण्यासाठी स्टॅलिन पुढे सरसावला— ]

नोव्हेंबर १९३९ या महिन्यात फ्रान्सवरील हल्ल्याच्या दृष्टीने, जर्मन फौजा पोलंडमधून पश्चिमेकडे निघाल्या. हान्स फ्रॅंक व सेयस इन्कॉर्ट यांनी पोलंड मधील अधिकारसूत्रे हळूहळू हाती घेतली. पोलंडमध्ये पुनश्च उठाव होणार नाही, इतपत काळजी घेण्याकरता, थोडे जर्मन सैन्य मागे राहिले व बाकी सर्व तुकड्या उलट दिशेने पश्चिम आघाडीकडे दौडू लागल्या.

लाल हुकूमशहा स्टॅलिनला आपले नवीन आक्रमण करण्याकरता ही संधी मोठी सुयोग्य वाटली. सोविएट युनियनच्या उत्तरेकडचा फिनलंड हा छोटा देश कुणाच्या अध्यात ना मध्यात, एक दुबळे राष्ट्र ! या राष्ट्राचे स्वातंत्र्य हरण करण्याचे दुष्ट स्वप्न स्टॅलिनला पडत होतेच. ते प्रत्यक्ष उतरवण्याला हीच योग्य वेळ आहे, अशी त्याची खात्री झाली. जर्मन फौजा पोलंडमधून मागे फिरलेल्या. जर्मनी हा ब्रिटन-फ्रान्सचा युद्धमान शत्रू. तेव्हा इंग्लंडने फिनलंडच्या मदतीस जाण्याचे ठरवले तरी त्यांच्या सैन्याला मार्ग काढावा लागणार–नॉर्वे व स्वीडनमधून ! नॉर्वे व स्वीडनमध्ये इंग्लिश सैन्य येऊ देणे हिटलरला परवडणारे नाही. अशा स्थितीत या वेळी फिनलंडच्या मदतीला कुणी येण्याची सुतराम शक्यता नव्हती. असा सर्व विचार करून 'शूर लाल सैन्य' ३० नोव्हेंबर, १९३९ रोजी फिनलंडवर धावून गेले. स्टॅलिनचा अंदाज होता— जर्मनीने ज्या गतीने पोलंडचा घास घेतला त्याहून अधिक गतीने आपल्याला फिनलंड पदरात पाडता येईल. परंतु 'लाल ठगांचा' अंदाज साफ कोसळला. फिनलंडचा तीव्र प्रतिकार सुरू झाला.

## रशियाची कुरघोडी

फिनलंड त्वेषाने लढले तरी, लाल सैन्याच्या लोंढ्यापुढे फार टिकाव धरणार नाही व आज ना उद्या फिनलंडवर रशियाचा कबजा होणार, याबद्दल हिटलरला संशय नव्हता. फिनलंडवर आपण हल्ला करणार असल्याची कानगोष्टही रशियाने कधी केलेली नव्हती. हा हल्ला अचानक करण्यात आला होता. स्टॅलिनचा हा नवा उद्योग हिटलरला रुचणारा नव्हता. फिनलंडमध्ये अनेक जर्मन कुटुंबे होती. त्यांना फिनलंडमधून काढून घेण्याचा नवाच उद्योग हिटलरला आता करावा लागणार होता. फिनलंडचे जर्मनीशी पूर्वापार घनिष्ट संबंध होते. रशियाने फिनलंडवर केलेला हा आकस्मिक हल्ला, पर्यायाने जर्मनीलाच कमकुवत करण्यासाठी आहे, ही गोष्ट हिटलरच्या ध्यानात आली. वीस वर्षांच्या अनाक्रमणाच्या कराराच्या बदल्यात थेंबभर रक्त न सांडता रशियाने बाल्टिक भागातून जर्मनीला हुसकले होते व आता फिनलंडमधूनही जर्मन वर्चस्वाचे उच्चाटन हिटलरला उघड्या डोळ्यांनी पाहावे लागत होते. हा अपमान पचवणे–हसतमुखाने स्वीकारणे यावेळी त्याला भागच होते. कारण रशियाकडून नव्या व्यापारी संबंधानुसार, जर्मनीला गहू व तेल मिळणार होते. युक्रानियातील गहू आणि रुमानियामार्गे येणारे तेल आता रशियामार्गेच जर्मनीत पोचू लागले होते. या बदल्यात रशियाने जर्मनीकडे युद्धसाहित्याची मागणी केलेली होती. अन्नाचे साठे फार काळ जर्मनी ठेवू शकणार नाही, परंतु जर्मनीतून आयात केलेल्या शस्त्रसामुग्रीचे साठे उद्या जर्मनीविरुद्धही उपयोगी पडतील, असा धूर्त डाव रशिया खेळत होता. रणसाहित्याच्या बदल्यातच केवळ अन्नधान्य मिळेल, असा रशियाचा आग्रह होता. जर्मनीतील रणसाहित्याच्या उत्पादनावर रशियाच्या या मागणीचा हा ताण हळूहळू फारच वाढू लागला होता.

## रणसाहित्याचा महागडा सौदा

रणसाहित्याची नवी नवी मागणी पुढे मांडताना होणाऱ्या वाटाघाटीत प्रत्यक्ष स्टॅलिन जातीने भाग घेत असे व प्रत्येक वेळी तो हे बोलून दाखवीत असे, की जर्मनीबरोबर अनाक्रमणाचा करार करून रशियाने जर्मनीची मोठीच सेवा केली आहे. यामुळे रशियाने जगात नवे शत्रू मात्र निर्माण करून घेतले ! किमतीच्या बाबतीतही स्टॅलिन आपलेच घोडे पुढ दामटीत असे. रशिया म्हणेल त्या किंमतीत, रणसाहित्याचा हा सौदा हिटलरला पटवीत जाण्यावाचून आता गत्यंतर नव्हते. जर्मनीची अत्याधुनिक फायटर विमाने, डाइव्ह बॉम्बर्स, इंजिने, टर्बाइन्स, जनरेटर्स, डिझेल इंजिने, जहाजे, टँकस, स्फोटक दारूगोळा, रसायने यांची जर्मनीबाहेर चाललेली ही निर्यात उद्या आपल्याच अंगलट येण्याची शक्यता आहे, हे माहीत असल्यामुळे, हिटलरचे मत रशियाविरुद्ध जास्तीतजास्त कलुषित होऊ लागले होते. पण करणार काय ? रशियाकडून मिळणारे अन्नधान्य–गहू, तेल, कापूस या जीवनावश्यक गोष्टी जर्मनीत फक्त रशियामार्गेच येऊ शकत होत्या. इंग्लंडच्या आरमाराने केलेली नाकेबंदी अन्यथा सहन करणे जर्मनीला शक्य नव्हते.

फिनलंडमध्ये आणि बाल्टिक प्रदेशामध्ये रशिया विमानतळ बांधून जर्मनीचीच उद्या मोर्चेबंदी करू शकेल, हे हिटलरलाही कळंत होते. म्हणूनच हिटलर आता मुख्यत: पश्चिमेकडील युद्ध लवकरात लवकर संपविण्याच्या उद्योगाला लागला होता.

१७ ऑक्टोबरलाच, म्हणजे पोलंडचे युद्ध संपण्यापूर्वीच हिटलरने जनरल कायटेल्ला लिहिले होते– " The Polish territory is important to us from a military point of view, as an advance jumping of point. o so this end the railroads & communication channels are to be kept in order. "

[ पोलंडचा भूभाग हा आपल्याला लष्करीदृष्टया फार महत्त्वाचा आहे. कारण जेथून पुढची उडी मारता येईल, अशी ही मोक्याची जागा आहे. या दृष्टीने या प्रदेशातील रेल्वेमार्ग व वाहतुकीचे सर्व मार्ग हे उत्तम स्थितीत ठेवा. ]

## रूसो–जर्मन युद्ध ४० सालीच भडकले असते

हिटलरने आपल्या ' माईन काम्फ ' मधील लेखनाप्रमाणेच, पुढे एका प्रसंगी एक गोष्ट स्पष्ट केली होती, की जर्मनीला जी अधिक भूमी हवी आहे ती पूर्वेकडची ! जर इंग्लंड व फ्रान्स यांनी डॅन्झिग व कॉरिडॉरच्या प्रश्नावर युद्ध पेटवले नसते, तर जर्मनीने आपले पूर्वेकडील आक्रमणच प्रथम हाती घेतले असते, असे मानण्यास सबळ कारणे आहेत. परंतु पोलिश कॉरिडॉरच्याच प्रश्नावर जर्मनीशी युद्ध करावयाचे ठरवून इंग्लंडने रशियावर केवढे उपकार केले, याची कल्पना आता सहज करता येते. असे झाले असते तर कदाचित रूसो–जर्मन युद्धाचा भडका १९४० च्या सुमारास उडालाच असता व जी जर्मन सैन्यशक्ती फ्रान्सवर तुटून पडली, ती सर्व

पहिल्या उत्साहानिशी रशियावर तुटून पडली असती. हिटलर पुन:पुन्हा इंग्लंडला व फ्रान्सला असेच आडवळणाने सुचवत होता, की आमचे भांडण तुमच्याशी नाही. परंतु हिटलरी शक्तीला मोकाट सोडणे हे कालांतराने आपल्याच मृत्युघंटेला कारण ठरणार आहे. या विचाराने इंग्लंड व फ्रान्स यांनी जर्मनीविरुद्ध शस्त्र उपसले व रशियाने मात्र जर्मनीच्या ताटाशेजारी आपलेही पान मांडले !

इंग्लंड–फ्रान्सची परस्पर लांडगेतोड व्हावी व जर्मनीही या प्रयत्नात हतबल व्हावा या हिशोबाने स्टॅलिनने अनाक्रमणाचा करार करून टाकला व त्याचवेळी जर्मनीच्या सरहद्दीपाशी मोर्चेबंदी सुरू करून, जर्मन शस्त्रास्त्रांचा साठा लुबाडण्यास सुरवात केली. जगात पसरलेले सर्व लालभाई हे सर्व कौतुकाने पाहात–इंग्लंडच्या साम्राज्याला हादरे देण्याची हीच सुवर्णसंधी आहे, असा प्रचार त्या वेळी करीत होते. असा प्रचार देशभक्तीने प्रेरित होऊन चालवला आहे, असा आव त्यांनी आण-लेला होता. भोळेभाबडे फसले होते. मॉस्कोच्या दारात झुलणारी प्यादी, मॉस्कोच्या वळणाने लोकांना युद्ध समजावून सांगत होते. यावेळी याचा उल्लेख अशासाठी केला आहे, की पुढे रूसो–जर्मन संघर्ष सुरू होताच, या लालभाईंनी कशी कोलांटी मारली, याचा इतिहास संदर्भासहित पुढे समजावून घेता यावा.

१९३९ साल जसजसे संपत येऊ लागले, तसतसे हिटलरचे मन अस्वस्थ होऊ लागले. रशियाची मैत्री फक्त पश्चिमेकडील युद्ध संपेपर्यंतच गरज म्हणून टिकवा-वयाची, अशी त्याने मनाशी खूणगाठ बांधली. या लाल मैत्रीपायी आपण लढाया जिंकल्या, तरी अखेर कदाचित युद्ध गमावू, अशी भीती हिटलरला छळू लागली होती.

## ग्राफस्पीचा आत्मनाश

डिसेंबर १९३९ उजाडला. पोलंडमध्ये आता युद्ध नव्हते. फ्रेंच व जर्मन फौजा समोरासमोर तळ देऊन फक्त बसलेल्या होत्या. जर्मनीबरोबर युद्ध जणू सुरूच नव्हते ! १४ डिसेंबर १९३९ उजाडले आणि प्रथम बातमी आली की तीन ब्रिटिश लढाऊ जहाजांनी मॉंटेव्हिडोपासून चारशे मैलांच्या परिसरात ' ग्राफस्पी ' या जर्म-नीच्या ख्याती पावलेल्या लढाऊ जहाजाचा पाठलाग सुरू केला आहे. सतत सात दिवस " ग्राफस्पी " हुलकावण्या देत होती. परंतु अखेर बंदुका बंद पडल्या व मॉंटेव्हिडो बंदरात ही विनाशिका युराग्वे सरकारच्या आश्रयाला गेली. बंदरातून पुन: बाहेर पडून ब्रिटिश लढाऊ जहाजांशी टक्कर देणे शक्य नसल्याने बहात्तर तासांचा आश्रय संपताच, ' ग्राफस्पी ' चा कप्तान कॅप्टन लँग्सडॉर्फ याने ती स्वत:च बुडवली व स्वत:वर गोळ्या झाडून त्याने स्वत:चा शेवट करून घेतला.

नव्या वर्षाच्या आगमनापूर्वी जर्मन सरकारला बसलेला हा तडाखा फार मोठा होता. कारण जर्मनीजवळ ' ग्राफस्पी ' एवढ्या प्रचंड विनाशिका फारशा नव्हत्याच.

नाताळ उजाडला. हिटलरने स्टॅलिनला नव्या वर्षाचे अभीष्टचिंतन पाठवले–

" Best wishes for your personal well being as well as for the prosperous future of the peoples of the friendly Soviet Union."

[ तुम्हाला व्यक्तिशः आयुरारोग्य लाभो ही इच्छा. त्याचप्रमाणे आमचा मित्र असलेल्या सोविएट युनियनमधील जनतेला उज्ज्वल भविष्यकाल लाभो ही सदिच्छा. ]

स्टॅलिननेही उत्तर पाठवले–

" जर्मनी व रशिया यांची मैत्री आता रक्तानेंच सांधली गेली असल्यामुळे ती चिरकाल टिकेल व स्थिर राहील यात शंका नाही. "

रूसो–जर्मन मैत्री स्टॅलिनच्या म्हणण्याप्रमाणे रक्ताने कशी काय सांधली ? जर्मनीने पोलंडचा घोट घेतला व रशियाने फिनलंडचा गळा आवळला ! आणि हे दोघांच्या परस्परमैत्री कराराने शक्य झाले, अशी ही रक्ताची तथाकथित मैत्री ! !

## मुसोलिनीच्या शंकाकुशंका

रूसो–जर्मनांची ही रक्तलांछित मैत्री पाहून, एका व्यक्तीच्या मनात मात्र शंकाकुशंकांचे थैमान सुरू झाले. ही व्यक्ती म्हणजे बेनिटो मुसोलिनी ! फिनलंडवर हल्ला केल्यानंतर हिटलरने रशियाविरुद्ध चकार शब्द उच्चारला नाही, हे पाहून मुसोलिनी अत्यंत अस्वस्थ झाला. १९३९ साल मावळले. तोपर्यंत त्याची अस्वस्थता शिगेला पोचली होती. अखेर दि. ३–१–१९४० ला त्याने हिटलरला पत्र लिहिले व त्याने जोडलेल्या या नव्या मैत्रीविरुद्ध इशारा दिला––

" Without striking a blow, Russia has in Poland & the Baltic profited from this war. But I a born revolutionist tell you that you cannot permanently sacrifice the principles of your revolution to the tactical exigencies. It is my duty to add that one further step in your relations with Moscow would have catastrophic repercussions in Italy. "

[ या युद्धात एकही घाव न घालताच पोलंडमध्ये व बाल्टिक प्रदेशात रशियाने स्वतःचा फायदा करून घेतला आहे. मी जन्मजात क्रांतिकारी आहे. मी तुम्हाला सांगू इच्छितो, की तुमच्या क्रांतीच्या प्रेरक तत्त्वांचा, आवश्यक डावपेच म्हणून सतत बळी देणे शक्य होणार नाही. कर्तव्य म्हणून मला हे स्पष्ट सांगितले पाहिजे, की मॉस्कोच्या दिशेने तुम्ही मैत्रीखातर अधिक एकच पाऊल जरी टाकलेत, तर त्याचे इटालीत भयानक परिणाम झाल्यावाचून राहणार नाहीत. ]

मुसोलिनीने या पत्राने हिटलरच्या नेमक्या अवघड जागेवरच्या दुखण्यावरच बोट ठेवले होते. हिटलरने या पत्राला काय उत्तर दिले ते उपलब्ध नाही. कदाचित आपले सर्व पत्ते उघडे होऊ नयेत, म्हणून हिटलरने आपला पुढचा डाव मुसोलिनीला कळवलाही नसावा. जी गोष्ट मुसोलिनीने कळवली होती, ती सत्य होती. परंतु हिट-

त्याला इटालीत काय होईल याची काळजी नव्हती. मुसोलिनीचे पाणी त्याने जोखले होते ... व दोस्तांना पाणी पाजीपर्यंत रशियाला दुखवावयाचे नाही हा तर त्याचा ठाम लष्करी निर्णय होता !

नव्या वर्षाच्या हिटलरच्या सदिच्छा स्टॅलिनला पोचल्या, परंतु नवे वर्ष हे फिनलंड-मध्ये गेलेली अब्रू परत आणू शकेल काय, या विचारात लाल हुकूमशहा होता.

फिनलंडकडे रशियाच्या मागण्या अशा होत्या –

(१) लेनिनग्राड माऱ्याच्या टप्प्यात राहील, अशा ठिकाणी जी फिनलंडची लष्करी ठाणी होती ती मागे हटवण्यात यावी.

(२) आर्क्टिक सागरातील फिनलंडचे पेटसॅमो (Petsamo) हे बंदर रशियाला लांब मुदतीच्या कराराने मिळावे.

(३) फिनलंडच्या आखाताच्या तोंडावरचे हँगो (Hango) हे बंदर रशियाला नाविकतळ व विमानतळ म्हणून वापरता यावे.


यातील पहिल्या दोन मागण्या मान्य करण्यास फिनलंडची तयारी होती. कारण रशियावर हल्ला करण्याचा विचार त्याच्या मनात नव्हता व आर्कटिक सागरात फिनलंडचे बंदर रशियाने वापरले असते, ते केवळ व्यापारासाठीच अशी त्यांना खात्री होती. परंतु हँगो हे बंदर रशियाच्या स्वाधीन करणे म्हणजे इंग्लंडने जिब्राल्टरवरचा हक्क सोडण्याइतके ते आत्मघातक होते. फिनलंडने त्याला स्पष्ट नकार दिला व ३०–११–१९३९ ला फिनलंडच्या हजार मैलांच्या आघाडीवर आठ ठिकाणी रशियाने अकस्मात हल्ला चढवला !

## मोलोटोव्ह कॉक्टेल

फिनलंडची एकंदर सैन्यसंख्या होती केवळ २००,००० परंतु नव्या तऱ्हेचे हॅन्ड-ग्रेनेडस् त्यांच्यापाशी होते. रशियन रणगाडयांवर या हॅन्डग्रेनेडस्चा अचूक मारा सुरू झाला व रशियन सैन्य चिखलात रुतल्यागत सर्व आघाडयांवर रोखले गेले. या हॅन्डग्रेनेडस्ला फिनलंडचे सैनिक– 'Molotov coktail' असे गमतीने म्हणू लागले. इतका जोराचा प्रतिकार स्टॅलिनला अपेक्षित नव्हता.

फिनलंडमध्ये पाईन वृक्षांची अरण्ये अतिशय, त्यातच ढोपरभर बर्फ पडलेले, फिनिश सैनिकांचे पोषाख या बर्फमय प्रदेशाला सुयोग्य असे होते व मुलूख माहितीचा होता. याउलट रशियन सैनिक थंडीने काकडूनच मरू लागले. पुरेशी वस्त्रप्रावरणे नाहीत, लढाईचा अनुभव नाही, टँकस् रुतून बसलेल्या ! यामुळे सुरवातीला सुमारे २५-३० मैल आत घुसलेले रशियन सैन्य, सर्व हजार मैलांच्या आघाडीवर पराभूत होऊन मागे फिरू लागले. चर्चिल सांगतात त्याप्रमाणे रशियन सैन्याची ही जाहीर नाचक्कीच होती. ('It was a pretty bad advertisement for the Soviat army.')

सोविएट देश हा हिटलरचा मित्र असल्यामुळे, जो रशियाशी युद्ध करण्यास सिद्ध




आहे त्याला मदत केली पाहिजे; या सामान्य लोकांच्या (!) नियमानुसार इंग्लंड व फ्रान्समध्ये फिनलंडला मदत देण्याची भाषा जोर करू लागली.

फिनलंडच्या मदतीला फ्रेंच व ब्रिटिश फौजा निघाल्याच तर त्या फिनलंडमध्ये पोचणार कशा ?

हिवाळ्यामुळे फिनलंडच्या आखातातून बोटीने सैन्य पाठवणे शक्य नव्हते. राहता राहिला मार्ग एकच आणि तो म्हणजे नॉर्वे–स्वीडनमधून सैन्य पाठवणे ! ! नॉर्वे, स्वीडनमधून फ्रेंच व ब्रिटिश फौजा जर फिनलंडकडे निघाल्या तर नॉर्वे-स्वीडनचा त्या कबजा करणार नाहीत हे कसे शक्य होते ? जर्मन अॅडमिरल रीडर

हा १० ऑक्टोबर १९३९ पासून हिटलरला सांगत होता की–

'आपण नॉर्वेचा कबजा करू !'

परंतु नॉर्वेवर हल्ला करण्याची कल्पना हिटलरला पसंत पडत नव्हती. याला मुख्य कारण निराळे होते.

हिवाळा सुरू झाला होता. स्वीडनमधून येणाऱ्या कच्च्या खनिज लोखंडावर जर्मनीचे पोलाद कारखाने अवलंबून होते. वर्षाला अकरा दशलक्ष टन लोखंड हे केवळ स्वीडनमधून जर्मनीला मिळत असे. जर्मनीची सर्व गरज होती पंधरा दशलक्ष टनांची. यावरून स्वीडनच्या या लोखंडावर जर्मनी किती अवलंबून होता हे लक्षात येईल. उन्हाळ्यात बाल्टिक समुद्र मोकळा असे, तेव्हा समुद्रमार्गे नजीकच्या बंदरांतून येणारे हे सर्व लोखंड, हिवाळ्यात मात्र नार्विक बंदरातून निघून, नामसे ट्रॉन्ड्हीम, बॅर्गेन, स्टॅव्हेंजर या नॉर्वेच्या किनाऱ्या किनाऱ्याने डेन्मार्कमार्गे जर्मनीत येत असे. नॉर्वे हे तटस्थ राष्ट्र असल्यामुळे नार्विकमधून सुटलेली खनिज लोखंडाची जहाजे, नॉर्वेच्या समुद्रपट्टीतून निर्धोकपणे जर्मनीला पोचू शकत होती. ब्रिटनला नॉर्वेच्या समुद्रपट्टीत घुसून पाणसुरुंग पेरून वा विनाशिकांनी हल्ला करूनच, ही वाहतूक बंद करावी लागणार होती. इंग्लंड नॉर्वेचे तटस्थत्व जोपर्यंत धोक्यात आणण्याचा विचार करीत नाही, तोपर्यंत विशेष काही फायदा नसताना नॉर्वेवर हल्ला करून ब्रिटिशांना नॉर्वेच्या समुद्रपट्टीत कशाला बोलवा, असा हिटलरचा यथार्थ युक्तिवाद होता.

## 'सुरुंग पेरण्याची परवानगी द्या'...

परंतु राजकारणात घटनांचे कसे अनपेक्षित चौफेर परिणाम घडतात पाहा ! रशियाने फिनलंडवर हल्ला केला नसता तर फिनलंडच्या मदतीला जाण्यासाठी म्हणून फ्रेंच व ब्रिटिश फौजा कदाचित नॉर्वेत उतरतील, अशी परिस्थितीच निर्माण झाली नसती. पण स्टॅलिनने फिनलंडवर हल्ला करून हात दाखवून अवलक्षण केले व हिटलरने आतापर्यंत बाजूला सारलेली ॲडमिरल रीडरची–नॉर्वेची कबजा करण्याची सूचना विचारार्थ पुढे घेतली.

वस्तुतः नॉर्वेच्या समुद्रपट्टीत ब्रिटिश आरमाराने सुरुंग पेरल्याखेरीज जर्मनीची नाकेबंदी पुरी होत नाही; यासाठी सुरुंग पेरण्याची परवानगी द्या असा तगादा चेंबर्लेन यांच्यामार्गे ब्रिटिश नाविकदल प्रमुख विन्स्टन चर्चिल यांनी युद्धाची ठिणगी पडल्यापासून लावलेला होता. चेंबर्लेनसाहेब या गोष्टीला तयार नव्हते व चर्चिल यांचा नाइलाज झाला होता.

अशा पार्श्वभूमीवर, रशियन सैन्य फिनलंडमध्ये जसजसे गारद होऊ लागले, तसतशी नॉर्वेवर त्वरित कबजा करण्याची कल्पना, इंग्लंडमध्ये चर्चिल यांच्या मनात व जर्मनीत हिटलरच्या मनात एकदमच जोर करू लागली.

हिटलरच्या सुदैवाने व फिनलंडच्या दुर्दैवाने १–२–१९४० ला रशियाने फिनलंड-

वर प्रचंड तयारीनिशी पुनः निकराचे हल्ले सुरू केले व या हल्ल्यांपुढे फिनलंडची मॅनरहीम् तटबंदी कोसळून ८ मार्च १९४० ला फिनलंडचा नेता पॅसिकिवी (Passikivi) हा शरणागती पत्करून, मॉस्कोत तहाच्या याचनेसाठी दाखल झाला.

**दलाँदियाँ सरकार गडगडले**

फिनलंड शरण गेले याचा पहिला तडाखा फ्रान्सला बसला. फ्रान्समध्ये २१ मार्चला दलाँदियाँ यांचे सरकार गडगडले व रेना यांनी पंतप्रधानपद स्वीकारले. म्हणजे म्युनिच शरणागतीचा अर्धा भागीदार आता अधिकाराबाहेर फेकला गेला ! उरलेला अर्धा भागीदार चेंबर्लेन मात्र अद्याप अधिकारावर होता.

दलाँदियाँना रजा दिल्यानंतर, फ्रेंच मंत्रिगण सुप्रीम वॉर कौन्सिलच्या बैठकीसाठी २८ मार्चला लंडनला दाखल झाले. या बैठकीत विन्स्टन चर्चिल यांनी नॉर्वेच्या समुद्रपट्टीत सुरुंग पेरण्यास परवानगी द्या, असा पुनः जोराचा आग्रह धरला. ५ एप्रिलपासून नॉर्वेच्या समुद्रपट्टीत ब्रिटिश आरमाराने घुसावे व सुरुंग पेरावे, अशी मुभा प्रदीर्घ चर्चेनंतर चर्चिल यांना देण्यात आली. त्याचप्रमाणे असेही ठरविण्यात आले की जर जर्मनीने बेल्जमवर हल्ला केला तर दोस्तांनी तावडतोब बेल्जममध्ये घुसावे. बेल्जम मदतीची हाक देईल वा न देईल–फ्रान्समधील युद्धाचा संरक्षणात्मक भाग म्हणून, ही गोष्ट दोस्तांनी करावी. इतकेच नव्हेतर बेल्जमवर हल्ला न करता फक्त हॉलंडवरच जर्मन सैन्ये आली, तरीदेखील त्यांचा मुकाबला करण्यासाठी दोस्तांनी बेल्जममधून धुसावे.

परंतु धोरण म्हणून सर्वांत महत्त्वाचा निर्णय घेतला तो म्हणजे–

" During the present war, they would neither negotiate nor conclude an armistic or treaty of peace except by mutual agreement. "

[ चालू युद्धात दोस्त राष्ट्रांपैकी कुणीही स्वतंत्ररीत्या जर्मनीशी शस्त्रसंधी वा शांततेचा तह करणार नाही. जे काही करावयाचे ते परस्पर अनुमतीनेच होईल. ]

या कराराला पुढे फ्रान्स कोसळताच फार महत्त्व प्राप्त झाले.

सुप्रीम वॉर कौन्सिलच्या निर्णयानुसार चर्चिल यांनी ५ ते ८ एप्रिलच्या दरम्यान, ब्रिटिश आरमाराने काय करावे याचे हुकूम सोडले. नॉर्वेच्या समुद्रपट्टीत सुरुंग पेरताना जर्मनीने अडथळा आणला, तर ब्रिटिश व फ्रेंच सैन्याच्या तुकड्या तावडतोब नार्विक बंदराकडे रवाना कराव्या व बंदर ताब्यात घेऊन स्वीडनच्या सरहद्दीवर पहारा बसवावा. त्याचप्रमाणे स्टॅव्हेंजर, बर्गेन व ट्रॉन्ड्हीम या बंदरांकडेही दोस्त सैन्ये धाडावी.

५ ते ८ एप्रिलच्या दरम्यान दोस्तांनी काय करावे, याचे हुकूम लंडनला आरमारी खात्याकडून रवाना होत असताना, तिकडे ३ एप्रिलला पहाटे २ वाजता तीन जर्मन जहाजे रणसाहित्यानिशी नार्विक बंदराच्या दिशेने सुटलेलीदेखील होती !

जर्मनीचे सर्वांत बलाढ्य टँकर जहाज ६ एप्रिलला मुरमान्स्क या रशियन बंदरांत तेलपाणी उरकून, पाठोपाठ नार्विकच्या दिशने पाणी कापू लागले होते.

## बस चुकली पण कोणाची !

यापूर्वी लंडनमध्ये वार्ता येऊन थडकतच होत्या; की जर्मनीने उत्तरेकडच्या बंदरात बरीच लष्करी जमवाजमव केली असून, हे सर्व सैन्य नॉर्वे, डेन्मार्कचा कबजा करणार आहे. किंबहुना या बातम्यांमुळेच अखेर चर्चिल यांना नॉर्वेच्या समुद्रपट्टीत शिरण्याची परवानगी मोठ्या मिनतवारीने मिळाली होती. अर्थात नेहमीप्रमाणे यावेळीही उशीर झालेला होता व सुसज्ज जर्मन तुकड्या ५ एप्रिल-लाच नॉर्वेच्या किनाऱ्यांनी दाखल झालेल्या होत्या.

चेंबर्लेन साहेबांना मात्र आपल्या स्वप्नसमाधीचा भंग अपेक्षित नव्हता. ५ एप्रिललाच लंडनमध्ये एका भाषणात चेंबर्लेन यांनी सांगितले–

" By failing to attack in the West, when the British & French were unprepared – Hitler had missed the Bus. "

[ पश्चिम सरहद्दीवर ब्रिटिश व फ्रेंच तयारीत नसताना–हिटलरने हल्ला चढवला नाही व आता त्याची ' बस ' चुकलेली आहे. ] ज्याच्या गलथान नेतृत्वाने इंग्लंडची बस चुकली, त्याने हिटलरची बस चुकली हो चुकली, म्हणून शंखनाद करावा ही गोष्ट किती भयानक होती, याची त्यावेळी कुणाला कल्पना आली नाही. ' बस चुकणे ' हा शब्दप्रयोग चेंबर्लेन यांनी प्रथम केला व आजपर्यंत चेंबर्लेनच्या बाबती-तच तो उपहासाने पुनःपुन्हा वापरला जातो. नॉर्वे-डेन्मार्कमध्येही ब्रिटिशांची जी ससेहोलपट झाली, ती सांगण्यापूर्वी म्हणजे २ एप्रिल १९४० ला हिटलरने नॉर्वे-वरील हल्ल्याची नांदी करीपर्यंत जर्मनीत काय घडत होते त्याची चाहूल घेतली पाहिजे.

## नॉर्वेचा देशद्रोही नेता ... क्विसलींग

तत्पूर्वी दोन व्यक्तींची ओळख करून घेतली पाहिजे. यांतील एक म्हणजे ज्याचे नाव नंतर इतिहासात देशद्रोहाशी कायमचे निगडीत झाले, तो नॉर्वेचा देशद्रोही नेता क्विसलींग (Quisling)

एका शेतकरी कुटुंबात क्विसलींग १८८७ साली जन्माला आला. नॉर्वेच्या मिलि-टरी अॅकेडमीत तो वर्गात पहिला येऊन पदवीधर झाला व ताबडतोब ऐन विशीत त्याची नेमणूक पेट्रोग्राड येथे नॉर्वेचा लष्करी दूत म्हणून करण्यात आली. बोल्शे-व्हिक रशियन सरकारशी इंग्लंडचे जेव्हा फाटले, तेव्हा इंग्लंडचे रशियातील हित-संबंध पाहण्याची कामगिरी क्विसलींग याने चोखपणे केली व याबद्दल ब्रिटिश सरकारने त्याला C. B. E. हा मानाचा किताब बहाल केला. पेट्रोग्राड येथे नोक-रीवर असताना –रशियातील कम्युनिस्टांच्या विजयाचा त्याच्यावर इतका परिणाम झाला, की नॉर्वेत परतल्यावर त्याने ऑस्लो येथील मजदूर संघटनेत प्रवेश मागि-

तला. परंतु मजूर संघटनेला त्याचा विश्वास वाटेना. त्यामुळे त्याला पक्षात दाखल करण्यात आले नाही. मुखभंग झालेला क्विसलींग, परिणामी कम्युनिझमविरोधी बनत गेला. १९३१ मध्ये तो नॉर्वेचा संरक्षणमंत्री झाला. १९३३ पर्यंत त्याने हे पद सांभाळले. सरकारातून बाहेर पडून १९३३ च्या मे महिन्यात "नॅशनल युनियन" नावाचा आपला पक्ष त्याने स्थापन केला. नॅशनल युनियनची सर्वच्या सर्व कार्यपद्धती ही नाझी संघटनेवर बेतलेली होती. अर्थात नॉर्वेजियन्स हे लोकशाहीवेडे असल्यामुळे क्विसलींगचा पक्ष क्षयीच राहिला. नॅशनल युनियनच्या तिकिटावर क्विसलींगला नॉर्वेच्या लोकसभेमध्ये निवडून येणेही शक्य झाले नाही.

लोकशाहीमार्गाने नॅशनल युनियनला नॉर्वेत फारसे काही भवितव्यच नाही, ही गोष्ट क्विसलींगच्या लक्षात येताच, त्याने तो नाद सोडला व हिटलरी पद्धतीने नॉर्वेवर कबजा कसा करता येईल या विचाराकडे तो वळला.

क्विसलींगने नाझी चळवळीचा प्रेरक तत्त्वज्ञानी अल्फ्रेड रोझेनबर्ग याच्याशी संधान बांधले. नाझी पक्षातील व्यवस्थेत परराष्ट्रीय धोरणाबाबतची जबाबदारी यावेळी रोझेनबर्गकडे होती. रोझेनबर्गचे एक स्वप्न होते की एक महान नॉर्डिक साम्राज्य निर्माण होईल व या साम्राज्यात ज्यू आदि कमअस्सल रक्ताची माणसे औषधालाही असणार नाहीत. क्विसलींग हा या साम्राज्यनिर्मितीत खात्रीने उपयोगी पडणार, या अंदाजाने १९३३ सालापासून रोझेन्बर्ग याने क्विसलींग याचेशी संबंध टिकवून धरले होते.

क्विसलींगने रोझेनबर्गमार्फत अ‍ॅडमिरल रीडर यांच्यापर्यंत जर्मनीने नॉर्वेचा कबजा करावा ही आपली सूचना पोचवलेली होती. ऑक्टोबर १९३९ मध्ये रीडरने ही कल्पना उचलून धरली, परंतु हिटलरने तटस्थ नॉर्वेच आपल्या अधिक उपयोगी आहे, असा शेरा मारून सूचना फेटाळून लावली होती. मात्र फिनलंडवर रशियाने हल्ला करताच ऑस्लो येथील जर्मन वकिलातीकडून फिनलंडच्या मदतीसाठी इंग्लंड नॉर्वेत सैन्य उतरवण्याचा विचार करीत आहे, अशा बातम्या रीडरकडे येऊ लागल्या.

डिसेंबर महिन्यात अशारीतीने हिटलरच्या मनात नॉर्वेचा विचार येऊ लागलेला असतानाच, क्विसलींग हा जातीने बर्लिनमध्ये दाखल झाला. यावेळेपर्यंत क्विसलींगची अ‍ॅडमिरल रीडर किंवा अ‍ॅडॉल्फ हिटलर यांच्याशी प्रत्यक्ष अशी भेट झालेली नव्हती.

क्विसलींगने येताना बरोबर काही महत्त्वाची पत्रे आणली होती. या पत्रांवरून काही लष्करी अधिकारी हे नॉर्वेचे सरकार उलथवण्यासाठी क्विसलींगने फितविलेले होते, ही गोष्ट स्पष्ट होत होती. नार्विक बंदराचा प्रमुख अधिकारी कर्नल सुंडलो (Sundlo) याने आपल्या पत्रात नॉर्वेचे मुख्य प्रधान हे 'विनडोक' आहेत (Block head) असे म्हणून इतर मंत्रिगणही शंख आहेत, असा निर्वाळा दिला होता.

क्विसलींगने जर्मनीने नॉर्वे कसा व्यापावा याचा आराखडाच रोझेनबर्गपुढे ठेवला. यानुसार क्विसलींगच्या नॅशनल युनियनचे स्वयंसेवक जर्मनीत प्रशिक्षण घेऊन, नंतर नॉर्वेत जाऊन मोक्याच्या जागा कबजात घेण्याच्या तयारीत राहणार होते. जर्मन सैन्य घेऊन येणारी जहाजे, नॉर्वेच्या बंदरात कुठलाही प्रतिकार न होता शिरू शकतील, अशी सर्व कामगिरी क्विसलींग आपल्या हस्तकांकरवी करणार होता.

जर जर्मन सैन्य नॉर्वेत उतरण्यात यशस्वी झाले, तर नॉर्वेचा राजा प्रतिकाराच्या भानगडीत पडणार नाही, असा क्विसलींगने निर्वाळा दिला. रोझेनबर्गमार्फत ११ डिसेंबर, १९३९ ला अॅडमिरल रीडरशी क्विसलींगची पहिली भेट झाली व लगेच १४ डिसेंबरला क्विसलींग हिटलरला भेटला असावा. (हिटलरशी झालेल्या भेटीची नोंद कागदपत्रांत आढळत नाही. ही भेट गुप्तरीतीनें झाली असावी.)

नाझीअनुकूल वातावरण नॉर्वेत निर्माण करण्यासाठी २००,००० सोन्याचे मार्कस् एवढा पैसा जर्मनीने त्याच्या हवाली केला व पुढे प्रतिमासी १०,००० पौंड मिळतील, असे आश्वासन घेऊन क्विसलींग नॉर्वेला परतला.

## 'अल्टमार्क'ला जलसमाधी

याच सुमाराम 'ग्राफस्पी' ने आत्मघात केला होता व या विनाशिकेला रसद पुरवणारी छोटी जर्मन बोट 'अल्टमार्क' (Altmark) ही ब्रिटिशांची कोंडी फोडून निसटली होती. या बोटीवर ३०० ब्रिटिश युद्धकैदी होते, अशी बातमी चर्चिल यांना कळलेली होती. 'अल्टमार्क' ही बोट नॉवेच्या समुद्रपट्टीतून निर्धोकपणे जर्मनीकडे जात असताना चर्चिल यांनी, या बोटीवर नॉर्वेच्या समुद्रपट्टीत घुसून ब्रिटिश आरमाराने हल्ला चढवावा असा हुकूम आरमाराला दिला. 'कोझॅक' या ब्रिटिश विनाशिकेचा कॅप्टन फिलीप व्हिअन् याने १६–१७ फेब्रुवारीला रात्री ही कामगिरी उरकली व २९९ ब्रिटिश युद्धकैद्यांना मुक्त करून त्याने 'अल्टमार्क' बोटीला नॉर्वेच्या समुद्रपट्टीत जलसमाधी दिली. नॉर्वेने ब्रिटिश सरकारच्या आंतरराष्ट्रीय नियमभंगाबद्दल तीव्र निषेध केला. या निषेधाला ब्रिटिशांनी उत्तर दिले की—'अल्टमार्क' बोटीवर ब्रिटिश युद्धकैदी असताना, या बोटीला नॉर्वेच्या समुद्रपट्टीतून तुम्ही जाऊ दिले त्याचे काय ?'

या घटनेवरून हिटलरच्या एक गोष्ट ध्यानात आली, की जरा दांडगाई करून उद्या ब्रिटिश आरमाराने नॉर्वेचा पाणीकिनारा व्यापला, तर स्वीडनचे खनिज लोखंड जर्मनीत पोचायचे कसे ? हिटलरने ताबडतोब नॉर्वे व डेन्मार्कचा कबजा करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्याचा हुकूम सोडला व याकरता फक्त दहा दिवसांचा अवधि देऊन १ मार्च १९४० ला हिटलरने नॉर्वे व डेन्मार्कवर स्वारी करण्याचे गुप्त हुकूम सोडले. निश्चित तारीख नंतर जाहीर होणार होती. जर्मन फौजा बाल्टिक बंदरात जमा होऊ लागल्या.

७ मार्च, १९४० ला जनरल आयर्नसाइड या ब्रिटिशांच्या चीफ ऑफ् जनरल

स्टाफने, फिनलंडचे सेनापती मार्शल मॅनर्‌हीम यांना संदेश पाठवला, की तुमच्या मदतीसाठी ५७,००० दोस्त फौज ताबडतोब येईल. आम्ही नॉर्वे व स्वीडनकडे सैन्य त्यांच्या देशातून जाऊ देण्यासाठी परवानगी मागत आहोत. परंतु २ मार्चलाच नॉर्वे व स्वीडन यांनी दोस्तांची ही मागणी फेटाळली असल्याची खात्रीलायक बातमी मार्शल मॅनरहीम यांना मिळालेली असल्यामुळे, दोस्तांच्या या नव्या आश्वासनाकडे पाठ फिरवून मार्शल मॅनरहीम याने ८ मार्च १९४० फिनलंड सरकारला शस्त्र-संधीसाठी रशियाला विनंती करण्याचा सल्ला दिला. ९ मार्चला फिनलंडचे शिष्ट-मंडळ शस्त्रसंधी मागण्याकरता शरणागती पत्करून मॉस्कोत दाखलही झाले.

आधी सांगितल्याप्रमाणे फिनलंडचा पराभव होताच फ्रेंच मंत्रिमंडळ गडगडले व रेनॉ हे नवे फ्रेंच पंतप्रधान सुप्रीम वॉर कौन्सिलच्या बैठकीसाठी लंडनमध्ये २८ मार्चला दाखल झाले. याच बैठकीत ५ ते ८ एप्रिलच्या दरम्यान नॉर्वेच्या समुद्र-पट्टीत ब्रिटिश आरमाराने सुरुंग पेरावे, हा निर्णय चर्चिल यांना मिळाला. हे काम ५ एप्रिल १९४० ला सुरू व्हावयाचे होते.

## चर्चिल यांचा डाव उधळला

हिटलरने चर्चिलचा डाव उधळून लावला ! ! २ एप्रिललाच गोअरिंग व रीडर यांच्याशी विचारविनिमय करून ९ एप्रिल, १९३९ ला पहाटे ५–२० ला नॉर्वे व डेन्मार्ककडून तासाभराची संधी देणारे अंतिमोत्तर मागून, दोन्ही देशांत जर्मन सैन्य उतरवावे, असा निर्णय हिटलरने घेतला. स्वारीचा प्रत्यक्ष दिवस ९ एप्रिल ठरला असला, तरी जर्मन सैन्य नेणारी जहाजे नॉर्वेच्या बंदराजवळ पोचण्यासाठी ही सर्व जहाजे—निरनिराळया बंदरांचे उद्दिष्ट ठेवून ३ एप्रिलला पहाटेच बाल्टिक समुद्रा-तून निघून नॉर्वेच्या समुद्रपट्टीजवळून उत्तरेकडे सरकत होती. १ मार्च ते २ एप्रिल पर्यंत, या स्वारीसाठी लागणारे आवश्यक ते सैन्य व रणसाहित्य बाल्टिक बंदरात जमा झालेले होतेच. कारण नॉर्वे व डेन्मार्क कबजात घेण्याचा निर्णय १ मार्चचाच होता……प्रत्यक्ष ९ एप्रिल ही तारीख फक्त हिटलरने २ एप्रिलला ठरवली होती.

नॉर्वेकडे निघालेल्या जर्मन बोटींना आरमारी दलाने गुप्त सूचना दिल्या होत्या त्या अशा—

'सर्व जर्मन बोटींचे बाह्यदर्शन हे ब्रिटिश बोटी वाटाव्या, असे असावे. सर्व बिनतारी संदेश हे इंग्रजी भाषेतून देण्यात यावे. जर वाटेत कुणी संदेश देऊन चौकशी केली तर ठरवलेलेच प्रत्युत्तर द्यावे—

'बंदराकडे जात आहोत. काळजीचे कारण नाही.' प्रत्येक जर्मन आरमारी बोटीला ब्रिटिश आरमारी बोटींची नावे मुकर करण्यात आली होती.

| जर्मन नाव | | ब्रिटिश नाव |
|---|---|---|
| Koeln | — | M. M. S. Kairo |
| Koenigslerg | — | M. M. S. Calcutta वगैरे. |

जर वाटेत ब्रिटिश नौकांनी गोळीबार सुरू केला तर संदेश द्या–' गोळीबार थांबवा. ब्रिटिश जहाज मित्र आहोत ......"

जर्मन सैन्य नेणाऱ्या या जर्मन बोटींवर मध्येच निशाणे फडकत होती; ती युनियन जॅकस् !

ब्रिटिश आरमाराचा ' कात्रज ' करून नार्वेकडे निघालेली जर्मन सैन्याची जहाजे नॉर्वेच्या बंदराजवळ निरनिराळ्या ठिकाणी ८ एप्रिललाच जाऊन पोचली होती.

९ एप्रिलला पहाटे ४–२० वाजता कोपनहेगन ( डेन्मार्कची राजधानी ) व ऑस्लो ( नॉर्वेची राजधानी ) येथील जर्मन वकिलांनी डेन्मार्क सरकारला व नॉर्वेजियन सरकारला पुढील प्रस्ताव विचारार्थ दिला. विचार फक्त प्रतिकार करावयाचा की करावयाचा नाही, एवढ्यापुरताच जर्मनीला अभिप्रेत होता. या प्रस्तावात रिबेन्ट्रापने सांगितले होते—

" डेन्मार्क व नॉर्वेमध्ये जर्मन फौजा उतरत आहेत, त्या तुमच्या देशाचा कबजा ब्रिटिश-फ्रेंचांनी करू नये म्हणून. आम्ही तुमच्या भूमीचा उपयोग इंग्लंडवरील हल्ल्याचे तळ म्हणून करणार नाही. आमची म्हणूनच अशी अपेक्षा आहे की जर्मन सैन्याला तुम्ही विरोध करणार नाही ! जर प्रतिकार झालाच तर तो अर्थात आम्ही मोडून काढू व उगाच रक्तपात मात्र होईल. "

**' डेन्मार्क ' ची शरणागती**

या धमकीचा परिणाम डेन्मार्कवर लगेच झाला. सकाळी ८–३४ ला कोपनहेगनहून जर्मन वकिलाची रिबेन्ट्रापला तार आली—

" Danes have accepted all our demands registering a protest. "

[ डेन्सनी आपल्या सर्व मागण्या निषेध नोंदवून स्वीकारल्या आहेत. ]

ऑस्लो येथील जर्मन वकिलातीला मात्र नॉर्वेजियन सरकारने स्पष्टपणे पहाटे ५–५२ ला कळवले—

" आम्ही स्वतःहून शरण जाणार नाही. प्रतिकाराची सुरवातही झालेली आहे—"

रिबेन्ट्रॉपला हे उत्तर कळताच तो संतापला. रिबेन्ट्रॉपची प्रतिक्रिया कळण्याची वाट न पाहताच नॉर्वेचे राजेसाहेब सातवे हकोन, सरकारचे सर्व मंत्री व राजघराण्यातील माणसे यांनी ऑस्लो सोडले व उत्तरेकडील जंगलाच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरूही झाली.

डेन्मार्कची शरणागती म्हणजे निव्वळ खेळच होता. डेन्मार्क जिंकण्यासाठी नेमलेला जर्मन जनरल हिमर् (Himer) हा ७ एप्रिललाच साध्या वेषात कोपनहेगन येथे गाडीने आलेला होता ! जर्मन सैन्य घेऊन यणारे जहाज ९ एप्रिलला सकाळी बंदरात लागण्यापूर्वी, त्याच्या स्वागतासाठी तो आधीच डेन्मार्कच्या राजधानीत आलेला होता. परंतु प्रतिकार करावयाचा नाही, असा निर्णय डेन्मार्कने

घेतल्यावर मग काय ? राजवाड्यात डेन्मार्कच्या लष्करी प्रमुख जनरल प्रियॉर (Pryor) हा राजे दहावे ख्रिश्चियन यांना आग्रह करीत होता की त्यांनी देश सोडावा व सैन्य जर्मनीचा प्रतिकार करील ! तितक्यात काही जर्मन विमाने कोपनहेगनवर घिरट्या घालू लागली. राजा म्हणाला–" प्रतिकार नको. निषेध फक्त नोंदवा."

## तेथे लव्हाळे वाचती

वेळ पहाटेची. जर्मनीला प्रतिकार करावयाचा नाही हे लोकांना कसे समजणार ? रेडिओ–केन्द्र तर सुरू व्हावयाला अजून अवकाश होता, परंतु जनरल हिमर्‌ने बरोबर ट्रॉन्समीटर आणलेला होता. या ट्रॉसमीटरवरून लोकांना त्याने संदेश दिला–

" आम्ही आलो आहोत. तुमच्या सरकारने आमच्या मागण्या मान्य केलेल्या आहेत."

दुपारी २ वाजता जनरल हिमरने राजवाड्यात जाऊन राजेसाहेबांची भेट घेतली. हिमरने सर्व आश्वासने दिली. (१) राजेसाहेबांना आपले संरक्षक बाळगता येतील. (२) सरकार, पार्लमेंट व कोर्ट यांच्या कामात जर्मन ढवळाढवळ करणार नाही. इतकेच नव्हे तर (३) डेन्मार्कमधील सात हजार ' ज्यू 'ना आम्ही त्रास देणार नाही.

जनरल हिमरच्या या चांगुलपणाने, डेन्मार्कचे राजेसाहेब दहावे ख्रिश्चियन हे तर भारावून गेले. डेन्स हे सुखासमाधानात राहणारे राष्ट्र. त्यांना संघर्ष कसा तो नको असे. त्यांच्या देशाचा विचार करता त्यांनी जे केले ते फारसे चुकले असे म्हणता येत नाही. सर्व महायुद्धाच्या काळात, जर्मनांचा पराभव दिसू लागेपर्यंत डेन्मार्कने जर्मनीला कसलाच त्रास दिला नाही. महापुरे झाडे गेली तेथे अशी लव्हाळी नांदली !

## नॉर्वे प्रतिकाराला सज्ज

नॉर्वे हा देश चार शतके डेन्मार्कचाच भाग होता. त्यानंतर शतकभर तो स्वीडनचा भाग होता. १९०५ साली नॉर्वे हा संपूर्णतया स्वीडनपासून फुटून स्वतंत्र झाला. नॉर्वे वेगळा होताच. त्यांनी स्वतःचा निराळा राजा असावा, असे ठरविले व स्वीडनचे राजे दहावे ख्रिश्चियन यांचेच धाकटे बंधू यांना नॉर्वेने आपला राजा म्हणून निवडले. सातवे हकोन म्हणून त्यांना राज्याभिषेक झाला. लोकांनी निवडलेला हा नॉर्वेचा राजा वडील भावापेक्षा निराळ्या वृत्तीचा ठरला. डेन्मार्कच्या राजेसाहेबांनी-आपल्या वडील बंधूंनी ९–४–१९४० सकाळीच शरणागती दिली ही गोष्ट हकोन यांना कळलेली होती. जर्मनीने तर नॉर्वे सरकारला हेच सांगितले की–" डेन्मार्कच्या राजेसाहेबांप्रमाणे तुमच्या राजांना करायला सांगा व नॉर्वे लढवू नका. कशाला उगाच नॉर्वेजियन्सच्या कत्तली घडवता ? क्विसलिंगचे सरकार आम्ही स्थापन करीत आहो, त्याला हकोन यांनी मान्यता द्यावी व ऑस्लो येथे सुखाने राहावे."

नॉर्वेमधील जर्मन प्रतिनिधी डॉ. ब्राऊर (Brauer) यांनी हकोन यांची गाठ घेऊन जेव्हा ९ एप्रिलला सकाळी वरील उपदेश केला, तेव्हा हकोन यांनी त्याला सांगितले–

"मी जर्मनांच्या मागण्या मान्य करू शकत नाही. पस्तीस वर्षांपूर्वी मी नॉर्वेचे राजपद घेतल्यापासून जसा वागलो, तसाच या वेळी वागेन. नॉर्वेजियन सरकारवर मी दडपण आणू इच्छित नाही. क्विसलींग याला पंतप्रधान नेमण्याची तर भाषाच नको, कारण त्या माणसावर नॉर्वेतील जनतेचा विश्वास नाही, ही गोष्ट मला ठाऊक आहे––"

"जर माझ्या सरकारने प्राप्त परिस्थितीत शरणागती द्यावयाचे ठरवलेच, तर मी राजत्याग करीन ! हाच एक मार्ग मला पत्करावा लागेल..."

राजे हकोन यांची ही भेट ऑस्लोपासून दूरवर एडिसव्होल्ड् येथे झाली. कारण ऑस्लोवर जर्मनांनी कबजा करण्यापूर्वीच राजे हकोन तेथून निसटले होते. जर्मन प्रतिनिधीला राजे हकोन यांनी दिलेले उत्तर सरकारीरीत्या प्रसृत होताच, नॉर्वेजियन जनतेत राजेसाहेबांबद्दल कमालीचा आदर तत्क्षणी निर्माण झाला व नॉर्वे शरण जाणार नाही, या नॉर्वे सरकारच्या निर्णयाचे सर्व जनतेने स्वागतच केले. नॉर्वेची लढाई अटळ ठरली व सुरूही झाली.

नको होते तेच नेमके रिबेन्ट्रॉपच्या नशिबी आले. ११ एप्रिलच्या सुमारास ब्राऊट याने पुन: राजेसाहेबांची भेट मागितली, परंतु राजे हकोन यांनी निरोप दिला– "काय बोलायचं ते आमचे पराष्ट्रमंत्री आहेत–त्यांच्यापाशी बोला !"

[अपूर्ण]

# पालखी :
## माणूस आणि देव यांच्यातला प्रवास

दि. बा. मोकाशी यांची 'पालखी' ही एका परिभ्रमणाची कथा आहे. एक संवेदनाशील लेखक पालखीबरोबर पंढरपूरकडे प्रवास करतो. हा जसा एका भाविकाचा प्रवास नाही तसाच तो नास्तिक मनोवृत्तीतूनही उद्भवलेला नाही. वरवर पाहिले तर असे दिसते की कोणा एका कचेरीतील आकडेवारीसाठी मोकाशींनी ही पायपीट तर केली नसावी ? दुसरे काही त्याहूनही वरवर पाहणारे असाही तर्क काढतील की काही तरी नवीन टूम साहित्याच्या क्षेत्रात काढून मोकाशींनी आपले सरकारी पारितोषिक पक्के केले ! अर्थात आता त्यांना हे पारितोषिक मिळाले असल्यामुळे, या हेत्वारोपामध्ये थोडासा सत्याभास निर्माण झालेला आहे, हे नाकबूल करता येणार नाही. अर्थात सरकारी पारितोषिक ही गोष्ट आता लेखकांच्या आणि वाचकांच्याही इतक्या परिचयाची झालेली आहे की त्यामुळे फारसे काही बिघडत नाही.

पालखीबरोबर केलेल्या या पंढरीवारीत मोकाशी यांनी कलावंत म्हणूनही आपल्या प्रवासाचा फार मोठा पल्ला गाठलेला आहे. त्यांच्या अनुभूतीचे विश्व येथे विस्तारलेले दिसते. एवढेच नव्हे तर त्याबरोबरच कलाविश्वाचीही त्यांनी उत्तम जाणीव येथे बाळगलेली दिसून येते. मागे १९५७ साली मोकाशी यांच्याशी मराठीतील लेखनप्रवृत्तीविषयी सहज बोलताना मी त्यांना म्हणालो होतो की 'लेखकाच्या अनुभूतीचे विश्व विस्तारण्यासाठी त्याने प्रवास केला पाहिजे. निरनिराळी स्थळे, तिथली माणसे, निसर्ग आणि त्या सर्वांचा तेथील जीवनावर होणारा परिणाम, तसेच निरनिराळ्या प्रकारच्या जीवनामधून फुलणारी कलाविश्वे यांची लेखकाने फार आत्मीयतेने आणि सहानुभूतीने ओळख करून घेतली पाहिजे.'

त्यावर त्यांनी माझ्याशी मतभेद प्रकट करीत म्हटले होते की 'प्रवास केल्याने लेखकाचा विकास होतो, हे मत मला मान्य नाही...'

आज मात्र असे दिसते की मोकाशी यांनी पेरूगेट आणि नातूबाग या दोन ठिकाणांतील दैनंदिन प्रवास सोडून पुणे ते पंढरपूरचा प्रवास केला आणि या प्रवासात त्यांना शेकडो माणसांचे निरनिराळे नमुने अनुभवायला मिळाले. निसर्गातील निरनिराळ्या छटा त्यांच्या ओळखीच्या झाल्या. इतकेच नव्हे तर एक कलावंत म्हणून त्या छटातील सौंदर्याचे ते दर्शन घेऊ शकले आणि त्याचे दर्शन घडवूहि

शकले ! तसेच मनुष्यस्वभावाचे निरनिराळे नमुने त्यांना इतक्या जवळून पाहायला मिळाले आणि त्यांच्याशी बोलताना त्या त्या माणसाच्या जीवनाचा सारीपाटच मोकाशींच्या समोर उभा राहिला. कोणतं प्यादं कुठं बसलेलं आहे, कोणत्या घरावर कोणाची दृष्टी आहे. उंटाची, हत्तीची, घोड्याची आणि राजा-वजिरांची. साऱ्यांच्या चाली मोकाशींना या पदयात्रेत हेरता आलेल्या आहेत.

या पालखीबरोबर पंढरीचा प्रवास करताना लांबच लांब पसरलेल्या सडकेकडे, पाण्याचे फुत्कार सोडीत धावणाऱ्या गढूळ ओढ्याकडे, एका टेकडीवरच्या छोट्या देवळाच्या आडोशाला पाऊस चुकवीत बसलेल्या वारकरी म्हाताऱ्याकडे, पालखीची पर्वणी साधून चोरी करणाऱ्या मुरट्यांकडे, भाविक लोकांच्या व्यवहारी (इतकेच नव्हे तर अतिव्यवहारी) मनाकडे, घरचा, मुलाचा आणि सुनेचा जाच चुकविण्यासाठी पंढरीची वारी करणाऱ्या प्राण्यांकडे जसे मोकाशींनी त्रयस्थ, तटस्थ आणि तरीही विशाल सहानुभूतीने (!) पाहिले आहे; तसेच स्वतःकडेदेखील तशाच दृष्टीने पाहण्याचे त्यांनी धाडस केलेले आहे. इतरांचे जीवनानुभव तपाशीत जाणाऱ्या या वारकऱ्याने स्वतःच्याही अनुभवांची तितक्याच कठोरपणे तपासणी केलेली त्यांच्या पालखीत दिसते.


चालता चालता एका ठिकाणी मोकाशी सांगतात, '...दुपारचे बारा वाजून गेले आहेत. पोट ओरडू लागलं आहे. पावलं आपोआप मुक्कामाकडे वळत आहेत. वाटेत मी एक हाफ्‌पॅन्ट घतली ती दुकानातच घालून बाहेर आलो आहे. शाळेच्या दिवसानंतर प्रथमच लांडी विजार घातली. उघड्या पोटऱ्या व गुडघे ! त्यांना वारा लागून कससंच होत आहे. मी वारंवार त्यांच्याकडे पाहतो आहे पण ते माझे वाटतच नाहीत. किती बेडौल ! किती पिळपिळीत ! माझ्यातला 'हीरो' त्यांनी काढून टाकला आहे. छे ! छे ! आपण नियमित व्यायाम घ्यायला हवा होता ! शरीर प्रमाणशीर ठेवायला हवं होतं. इतक्या वर्षांनंतर शरीराबद्दल विचार यावे याची गमत नि संकोचही वाटत आहे."

मोकाशींची ही अनुभवमालिका वाचीत असता पंढरपूर येते. ती विठ्ठलाची नगरी आणि समस्त वारकरी संप्रदाय यांचा संगम होतो, पण...पण मोकाशींना हे मीलन 'मीलन' वाटत नाही. वारकरी रस्त्यावरून चालत नाहीत, तर रस्तेच चालत आहेत असा भास त्यांना होतो आणि पुढे ते म्हणतात, "मला कुठे जायचं आहे माहीत आहे. मला विठ्ठलाकडे जायचं नाही तर पंढरपुरातील त्यांच्या सासुरवाडीस जायचं आहे !"

येथे मोकाशींचा प्रवास संपतो. रात्री एकला ते सासूरवाडीचा दरवाजा ठोठावतात.

पालखीवाचन संपल्यावर मोकाशींनी उभा केलेला प्रश्न 'देव आणि माणूस यांच्या सीमारेषा कुठे मिळतात का ?' याचा विचार मन आपलेही करू लागते !

**पालखी :– दि. वा. मोकाशी, मौज प्रकाशन, मुंबई, किंमत पाच रुपये.**



# महाकवी कालिदास

## बेत चांगला ! मीठ कमी पडले ! !

जयराम शिलेदार आणि लीला गांधी

'मराठी रंगभूमी ' ने सादर केलेल्या ' महाकवी कालिदास ' या नव्या नाटकाचा प्रयोग पाहून फारसे काही वाटलेच नाही. अलीकडील प्रत्येक नव्या नाटकाप्रमाणे हेही नाटक लेखनदृष्टचा कमकुवत ठरले आहे. निर्मात्यांनी नाटकासाठी भरपूर पैसा खर्च केला आहे, हे अगदी स्पष्ट दिसत होते पण त्याचे चीज झाले नाही हेच खरे ! अर्थात नाटक पाहून त्यातील लेखनदोष जाणवून मन नाराज बनले असले, तरी लेखक नवा आहे, अननुभवी आहे हे लक्षात येताच ही नाराजी थोडी कमीही होते. या नाटकाचे लेखक ' कमलकान्त ' हे नवीन आहेत, हे नाटक पाहून सहज लक्षात येते. अशावेळी मग लेखकाने चांगल्या गोष्टी काय साधल्या आहेत, याचाच विचार करावासा वाटू लागतो.

### कालिदासपरिचय

या दृष्टीने पाहता पहिल्याप्रथम लेखकाचे कौतुक करावेसे वाटते, ते त्याने या दुर्लक्षित झालेल्या विषयाला हात घातला म्हणूनच ! कालिदासासारखा नाटककार, कवीच्या जीवनवृत्तांताविषयी नक्की माहिती नाही. फार काय, आज त्याच्या नावाने म्हणून जे वाङ्मय ओळखले जाते, ते खरोखर त्याचेच आहे किंवा काय, याविषयी विद्वानांत वाद आहेत. त्याचे पूर्वचरित, त्याचा मृत्यू याविषयी मतभेद आहेत. असे असूनही लेखकाने त्याचे जीवन नाट्यबद्ध करण्याची जिद्द बाळगली. लेखकाने हा प्रयत्न केल्याने मराठी प्रेक्षकांना ' कालिदास चरित ' तरी विशिष्ट स्वरूपात माहीत होऊ शकेल.

लेखकाचे दुसऱ्याही एका गोष्टीत कौतुक करावेसे वाटते आणि ते म्हणजे कालिदासासंबंधीच्या दंतकथा आणि उपलब्ध त्रुटित माहिती यांमधून त्याने नाटकाचे सर्वसाधारण कथानक मोठ्या कौशल्याने रचले आहे. कथानकाचा मूळचा गाभा त्याने फारच व्यवस्थितपणे मांडला आहे. फक्त त्यामध्ये नेटक्या, चुरचुरीत संवा-

दाची भर घालण्यात तो कमी पडला आहे. कालिदाससंबंधी अगदी थोडकी माहिती असून तीन अंकांत त्यांनी ती व्यवस्थित कथासूत्रात मांडली आहे हीच गोष्ट फार महत्त्वाची आहे. कौतुक करण्याजोगी आहे.

कालिदास म्हणजे पूर्वाश्रमीचा दासवर नावाचा एक गुराखी असतो. रानात गुरे चारण्यापलीकडे त्याला काहीही कळत नसते. फार काय तो मतिमंद असतो. एक दिवस त्याचा सुमनावती नावाच्या अतिशय विद्वान राजकन्येशी तिच्या मंत्र्यांच्या कपटकारस्थानामुळे विवाह होतो. आपला पती मूढ आहे, हे सुमनावतीला कळून येताच ती त्याची निर्भत्सना करून त्याला हाकलून देते. पत्नीकडून झालेल्या अपमानामुळे दु:खी झालेला दासवर कालीमातेच्या मंदिरात जातो आणि देवीची करुणा भाकतो. देवी प्रसन्न होते आणि त्याला "तू अत्यंत बुद्धिमान कवी होशील", असा वर देते. दासवराचा पुनर्जन्म होतो. तोच हा महाकवी कालिदास !

सुमनावतीने पतीला हाकलून दिल्यानंतर तिला पश्चात्ताप होतो. निरनिराळ्या ग्रंथांचे वाचन करीत ती व्रतस्थ जीवन जगू लागते. याचवेळी तिचा कालिदासाच्या वाङमयाशी परिचय होतो. ती त्याच्या वाङमयावर लुब्ध होते आणि कालिदासाची भेट घेण्याचा प्रयत्न करते. तिची भेट होतेही आणि तिला तेव्हाच लक्षात येते की आपला पती दासवर म्हणजेच कविश्रेष्ठ कालिदास ! यामुळे ती त्याच्याजवळ हक्काच्या पत्नीप्रेमाची याचना करते, पण कालिदास तिला आपली माता मानतो, कारण तिच्याच निर्भत्सनेमुळे त्याला मार्ग सापडलेला असतो. कालीमातेची कृपा झालेली असते. सुमनावतीला ही गोष्ट अपमानकारक वाटते. ती त्याला उलट शाप देते की एका स्त्रीच्याच हातून तुला मृत्यू येईल. खरोखरच पुढे कालिदास सिंहल द्वीपात गेल्यावर एका नर्तिकेकडूनच त्याचा खून होतो. असा हा कथाभाग नाटकात गोवला आहे.

**भव्य नेपथ्य**

खुसखुशीत संवादाच्या अभावी नाटक एकदम मंद झाले आहे. कथानकाची व्यवस्थित तऱ्हेने पकड बसत नाही. नाट्य भरपूर असूनही ते प्रेक्षकांपर्यंत पोहचत नाही. मात्र तिसरा अंक उत्तम वाटतो आणि त्याचे कारण त्यातील काहीशी भडक आणि खटकेबाज संवादरचना !

असे हे काहीसे कमकुवत नाटक 'मराठी रंगभूमी' ने सादर करताना भव्य सेटिंग्ज उभारून थोडे सुसह्य करण्याचा प्रयत्न केला आहे; पण हा हेतू फारच कमी प्रमाणात साधला आहे. कलाकारही नाटक प्रभावी करण्यास उपयोगी ठरत नाहीत. जयमाला शिलेदार यांचे राजकन्या सुमनावतीचे काम चांगले झाले आहे. त्यांची एक दोन पदे बरी आहेत. जयराम शिलेदार कालिदासाच्या कामात अधिक प्रौढ वाटले. त्यांची गाणी उठावदार झाली नाहीत. रा. वि. राणे यांचे सुमनावतीच्या

[पान ७६ पहा]



# भूत बंगला

## मुमताज फिल्मचे 'न भूतो' चित्र

एक बंगला असतो. तसे दोन बंगले असतात. एकात भुते नसतात म्हणून असे सांगितले. त्यात दोन खून होतात. ज्या एकाचा खून होतो; त्याची मुलगी परदेशातून शिक्षण घेऊन घरी परत येते. तिला सारखे फोन येऊ लागतात, "तू लवकरच मारली जाणार आहेस!" ठीक आहे. सस्पेन्स निर्माण झाला. हिचकॉकच्या तोंडात मारील, असा सस्पेन्स निर्माण झाला. आता पुढे काही व्हायला पाहिजे की नको? खून केला कुणी? त्या बंगल्यात भुते नाचतात ती कुणाची? फोन कोण करते? पण घोटाळा असा झाला—

महमूदने ही चित्रपटकथा लिहायला सुरवात केली. राहूल देव बर्मन हे संगीत तयार करू लागले, हसरत जयपुरी गाणी पाडू लागले. सध्या 'ट्विस्ट्'चे संगीत व नृत्य सिनेशौकिनांत लोकप्रिय आहे. मग गाणे तयार झाले—"आवो ट्विस्ट् करे" बर्मन यांनी म्युझिक दिले. जो तो आपापल्या खात्यात 'टिवस्ट्' करू लागला. महमूदने चित्रपटकथेचा पण सारखा पिळा (ट्विस्ट्) सुरू केला. ट्विस्ट् करे ट्विस्ट् करे करता करता तीन तास पुरतील एवढे कथेला पिळे देऊन झाले. मुमताज फिल्मचा दिग्दर्शकही महमूदच्! पुरेसे पिळे मारल्यावर त्याने ठरवले, 'पिक्चर तयार झाले.' कथेत भरलेले ट्विस्ट उलगडायला नंतर वेळच झाला नाही.

मग इतर युक्त्या केल्या. सस्पेन्स राहिला तसाच लोंबकळत. चित्रपटातले पोलीस इन्स्पेक्टर ठेवले बोंवलत. 'आवो ट्विस्ट् करे' या गाण्यावरच चित्रपट चालला पाहिजे असे ठरले. म्हणजे गाणे सारखे वाजले पाहिजे, म्हणजे 'बिनाकात'त लागले पाहिजे. म्हणजे त्या सिलोन रेडिओच्या अमीन सयानीलाच द्या छोटीशी भूमिका! अमीनसाहेब खूष. 'बिनाका'त ट्विस्ट वाजता वाजता चित्रपटगृहांपुढे लोकांचा ट्विस्ट् लागला. काही चित्रपट–टीकाकारांनी सांगून टाकले, "भूत बंगला म्हणजे बॉक्स ऑफिस हिट!"

आम्हीही फसलो. चित्रपट पाहिला. 'न्यूजरील' चांगली निघाली नशीव.

आतापर्यंत हिंदी चित्रपटांतून मारामारी तरी मारामारीसारखी दाखवत असत. या भूतबंगल्यात रस्त्यावर भीक मागणाऱ्या आंधळ्याला काही मवाली त्रास देतात, म्हणून महमूदचा 'यूथ क्लब' त्यांच्याशी मारामारी करतो. म्हणजे महमूद एक गाणे म्हणतो आणि त्याच्या संगीतात रंगलेले त्याचे माकड छाप चेहऱ्याचे समाज कार्यकर्ते त्या मवाल्यांच्या पाठीवर झेपा घेतात!! ही मारामारी जर पुरुषार्थी मानली, तर "आवो ट्विस्ट् करे" हे सध्याच्या आणीबाणीच्या परिस्थितीतील सर्वांत उत्कृष्ट रणगीत म्हणायला हरकत नाही.

आता हा यूथ क्लब म्हणजे कसा असतो, ते सांगतो. सर्व पाश्चात्त्य प्रसिद्ध नटां-प्रमाणे (यूल ब्रायनर) डोकी तासलेले दहा-बारा टगे म्हणजे यूथ क्लब. ते गोरे आणि हे काळे. त्यांचे डोके आतून तरी चांगले असते आणि यांचे डोके म्हणजे मानेवरचा भाग म्हणून डोके, एवढाच काय तो फरक.

आणखी यात आहे काय? महमूद बिकिनी घातलेल्या स्त्री-वेषात करमणूक करतो. तनुजा व तिच्या मैत्रिणी बऱ्यापैकी कामे करतात. पाकिस्तानी गोंडाटोपी हलवीत महमूद छोट्या मुलांच्या घोळक्यात एक स्फूर्ती गीत म्हणतो. अर्थ-उठा, सज्ज व्हा, भारताचे सुपुत्र वगैरे वगैरे! म्हणजे गावातल्या टग्यांनी "आवो ट्विस्ट् करे" म्हणून धिंगाणा घालायचा आणि छोट्या माँटेसरी मुलांनी उठा-जागे व्हा वगैरे वगैरे.

अशा या भयानक करमणुकीपासून सरकार आम्हाला वाचवू शकत नाही काय? बाकी एका अर्थाने "आवो ट्विस्ट् करे!" हे आपल्या आजच्या राजकीय नेतृत्वाचे खरेखुरे चित्रच आहे!

कंजार कोट येथे ट्विस्ट्! काश्मिरात ट्विस्ट्! चिनी भाईंशी ट्विस्ट्, सगळ्या आघाड्यांवर एकच सूर—"**आवो ट्विस्ट करे! आऽऽवो ट्विस्ट करे!**"

---

**[ महाकवी कालिदास : पृष्ठ ७४ वरून ]**

पित्याचे काम भिकार झाले असले तरी तिसऱ्या अंकातील श्रीमंत कवी मेघनाथचे काम मात्र सुंदर झाले. तिसरा अंक स्मरणीय ठरण्यात त्यांचा वाटा मोठा आहे. गोविंद कुलकर्णी यांचे कुमारदासाचे काम ठीक होते. नाटकातील नाव घेण्याजोग्या दोनच भूमिका. एक म्हणजे लीला गांधी यांची नर्तिका कदंबिनीची भूमिका आणि दमयंती कुमठेकर यांची मधुकारिका दासीची भूमिका! दोनही भूमिका चांगल्या होतात. लीला गांधी केवळ उत्तम नर्तिकाच नाहीत तर अभिनयकुशलही आहेत हे प्रकर्षाने जाणवले. नाटकातील त्यांचे नृत्य तर बहारदार आहे. कुमठेकर यांनीही आपली छोटीशीच भूमिका लक्षात राहावी अशीच केली.

नाटकातील राजा बढे यांची पदे आणि त्याला छोटा गंधर्व यांनी दिलेले संगीत उत्तम आहे. पण जयमाला शिलेदार यांच्या पदाचे वेळी गाण्यातील शब्द कळत नसल्याने त्याचा योग्य तो परिणाम होत नाही. ●

प्रवासी बन्धूंनों ...
आपलें सहकार्य
गाडींत लागणारी
आग
टाळूं शकेल.




निर्देशित
आगप्रतिबन्धक नियमांचें
पालन करा.


पेटती सिगरेट फेकण्यापूर्वी विझवा किंवा राखदाणीचा (ॲश् ट्रे) उपयोग करा.



डब्यांत स्टोव्ह पेटवूं नका.



आपल्या सामानांत ज्वालाग्राही पदार्थ नेऊं नका.




प्रवासांतील सुरक्षिततेच्या हेतूने मध्य रेल्वे द्वारा प्रकाशित

# भिंतीच्या तुंबड्या

## • माणसाचा विचार ओळखणारे यंत्र ?

अगदी वत्तिशी वठावी तशी लेखणी वठली बघा ! पंधरा दिवसांपूर्वी अशी कल्पना सुचली होती की परराष्ट्रीय धोरण आणि कॉम्प्यूटर यंत्र यांची सांगड घालून द्यावी. नेमका हाच प्रयोग जपान करू पाहत आहे, असे परवा वर्तमान पत्रात वाचले. लाल चीनचे कोडे न सुटल्याने जपानच्या परराष्ट्र-मंत्रालयाने चीन-विषयक काही गहन प्रश्न कॉम्प्यूटरला विचारले आहेत अन् मंत्रालयाला असा भरवसा वाटतो, की हा प्रयोग सफल झाला तर चिनी कारस्थानांची माहिती हा कॉम्प्यूटर जपानी सरकारला सहा सहा महिने आधी देऊ शकेल. म्हणजे आता माणसाच्या मनातले विचार ओळखणारे यंत्र बाजारात आले म्हणायचे ! पण याच्या उलट चीनने आपली कारस्थाने करण्यासाठी एखादा कॉम्प्यूटरच बसवला तर ? पाताळयंत्री चिनी कॉम्प्यूटरने आपल्या मनात काय काळेबेरे आहे याचा जपानी कॉम्प्यूटरला थांगपत्ताच लागू दिला नाही तर ? अन् मुख्य म्हणजे टोपी फिरविणाऱ्या राजकारणी माणसाप्रमाणे कॉम्प्यूटरनेही आपले विचार एकदम बद-लले तर ?

फ्रॉइडने माणसाचे मनोविश्लेषण केले आणि माणसांना पडणाऱ्या स्वप्नांचा अर्थ लावला, पण आता यंत्रांना पडणारी स्वप्ने ओळखणारा सवाई-फ्रॉइड हवा. लोकशाही देशांतल्या कॉम्प्यूटर–जनतेला खूप ठेवण्यासाठी व मंत्रा-मंत्रांतली विषमता नष्ट करण्यासाठी प्रत्येक कॉम्प्यूटर-नागरिकाला नीट चरितार्थ चालण्याइतके इंधन, वंगण वगैरे मिळते की नाही याकडे सरकारला लक्ष पुरवावे लागेल. उलट साम्य-वादी देशातल्या प्रत्येक कॉम्प्यूटर–कामगाराला मार्क्स ते माओची विचारप्रणाली शिकण्यासाठीं बौद्धिक वर्गांना जावे लागेल. न जाणो, एखाद्या कॉम्प्यूटरला छुपे मध्यमवर्गीय विचार मनात बाळगल्याबद्दल ' जाहीर आत्मनिंदा ' करून पाप-क्षालनही करावे लागेल.

## • बाणभट्टाचा सूक्ष्मावतार

परवा ' माणूस मध्ये वाचले की २८ पानांची एक कादंबरी लिहिली गेली आहे. जमानेकी हवा ! बऱ्याच दिवसांपूर्वी लघुकथेची लघुतमकथा झाली. काही दिवसां-

पूर्वी नाटकाचे नेटक झाले, तेव्हा आता कादंबरीचा हा सूक्ष्मावतार कालानुरूपच म्हणायचा. बाणभट्टाच्या कादंबरीत तीन जन्मांची कथा आहे; पण हल्लीच्या माणसांना एक जन्मच नीट जगता येत नाही, त्याला बिचारा नव-कादंबरीकार काय करणार ? टॉलस्टॉय, जेम्स जॉइस, नबॉकॉव्ह वगैरे मंडळींनी सहासहाशे पानांच्या कादंबऱ्या लिहिल्या, पण " श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः " शिवाय व्यर्थ वाचाळता नाहीतरी वाईटच. माणसाजवळ सांगण्यासारखे काही असते तेव्हाच तो ते जरा विस्ताराने सांगतो. अर्थात् हे ओघानेच आले की सात शब्दांची प्रकरणे असलेल्या या २८ पानी कादंबरीत सांगण्यासारखे खूपच असणार. वाचकाला ते नाहीच समजले तर पाठांतराची सोय आहे.

शिवाय हे विज्ञानाचे युग अन् आधुनिक विज्ञानाचे मुख्य सूत्र म्हणजे सूक्ष्मीकरण ( ' मिनिएकरायझेशन ' ) टिकलीएवढा ट्रँझिस्टर अन् दाण्याएवढा कॅमेरा हा आजचा खाक्या. अशा दिवसांत वाचायला सुरवात करायच्या आधीच संपू शकणारी सूक्ष्म कादंबरीच योग्य आहे, इष्ट आहे अन् उचितही आहे. कसे ?

## ● अनार्य मदिरामंडळ

दिल्लीच्या सरकारी अशोक हॉटेलात थोड्या दिवसांपूर्वी घडलेली गोष्ट. एका परदेशी पाहुण्याने आपल्यासाठी व आपल्या भारतीय मित्रासाठी पेग मागवले. वेटर जरा घोटाळला व एतद्देशीयाला विचारता झाला, " साहेब, आपण हिंदी का ? " गोऱ्या साहेबाने म्हटले, " दिसत नाही तो हिंदी आहे ते ? " वेटर म्हणाला, "मग त्यांना दारू मिळणार नाही. हिंदी गिऱ्हाइकांना दारू द्यायची नाही, असे येथे बंधन आहे. " आजूबाजूला पीत बसलेल्या बऱ्याच हिंदी साहेबांकडे बोट दाखवून गोरा म्हणाला, " मग हे कसे पितात ? " तोंडावरची माशी उडू न देता वेटरने उत्तर दिले, " त्यांनी सांगितलंय् आम्ही हिंदी नाही ? " एकदम मूहतोड जबाब, ब्रह्मानंदी टाळी लागल्यावर देश, राष्ट्र असली क्षुल्लक बंधने मागे पडली नाही तरच नवल. प्रश्न एवढाच की ही टाळी लागण्यासाठी अवघी नवटाक झोकलेली पुरते ? काळ बदलला हेच खरे. अनेक प्याल्यांचा दर्दी असलेला तळीराम आर्य मदिरामंडळाचा एकनिष्ठ सभासद, पण आता एकाच प्याल्यासाठी देशाकडे पाठ फिरवावी लागते. शिवरामपंत परांजपे सांगून गेले, " देश नाही तर प्रियाही नाही. " पण आता वृत्तीचे अँग्लो, पण जन्माचे इंडियन म्हणतात, " दारू नाही तर देशही नाही. "

—सुधाकर राजे

[ पान ५ वरून : दिल्ली दरबार ]

विचार सुरू होईल. थोडक्यात काय तर एवढे सर्व घडेपर्यंत १९६७ साल उजाडले तर कोणी विशेष आश्चर्य मानू नये, अशीच बहुधा सरकारतर्फे विनंती करण्यात येईल.) लोकसभेत ही प्रश्नोत्तरे चालू असताना तडफदार व तल्लख खासदार श्री. नाथ पै यांना राहवले नाही. त्यांनी श्री. छागलांना विचारले की पुणे विश्वविद्यालयात हा विषय (मिलिटरी सायन्स) शिकविण्याची सोय पूर्वीच झालेली आहे. तेव्हा या विषयाचे महत्त्व व राष्ट्रीय संरक्षणाचा प्रश्न म्हणून यावर तातडीने विचार करून; युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशनचा अपेक्षित अहवाल येईपर्यंत न थांबता; सरकार पुणे विश्वविद्यालयाला या विषयासाठी विशेष सहाय्य करील का ? या प्रश्नाचे उत्तर देताना श्री. छागला म्हणाले की जर एखाद्या विश्वविद्यालयात हा विषय शिकविला जात असेल तर त्या विश्वविद्यालयाला आवश्यक ती सर्व मदत दिली जावी, असे मी युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशनला अवश्य सुचवीन. (याचा अर्थ केंद्रीय शिक्षणखात्याला आजपर्यंत पुणे विश्वविद्यालयात हा विषय शिकविला जातो की नाही, हे ज्ञात नव्हते; असा केला तर ते चुकीचे ठरेल का ? याला जबाबदार कोण ?)

## □ जादु–इ नगरी : 'ऑइल इंजिन'चे 'इंजिन ऑईल'!

संरक्षणमंत्रालयात तरी भ्रष्टाचाराला किंचितही स्थान नसावे, असे म्हणून अन्य स्थळीच्या भ्रष्टाचाराचे समर्थन करण्यात येत असते. कारण काय तर संरक्षण विभागाचा संबंध सेनेच्या सुरक्षित जीवनाशी व त्यांच्या कार्यक्षमतेशी असतो. हे जरी खरे असले तरी संरक्षणमंत्रालयात कार्य करणारेही " सामान्य " असेच अन्य नागरिकांसारखे आहेत...आदि युक्तिवाद राजधानीत काही कारणपरत्वे मला ऐकावयास मिळून मनस्वी खेद वाटला ! ' सामान्य ' म्हणून गणली जाणारी ही माणसे भ्रष्टाचार करताना मात्र ' असामान्य ' बुद्धी व कौशल्य वापरतात हे पाहून मी चाट झालो. ' ऑईल इंजिन ' म्हणून काही इंजिनांचा साठा एका स्थळी संरक्षण विभागातर्फे मोठ्या प्रमाणावर करणे चालू होते. मला मिळालेल्या विश्वसनीय माहितीच्या आधारे वाचकांना मी असे कळवू शकत आहे की मोठ्या शिताफीने तो संपूर्ण व प्रचंड साठा " इंजिन ऑईल " या वस्तूचा दाखविण्यात येऊन सर्व इंजिने भूमिगत (गडप) झाली ! आणि त्यांच्या जागी ' ऑईल 'चे डबे आले ! कदाचित ते डबेही रिकामे डबेच असण्याचा संभव. ही सुरम्य कथा वाटली तरी दुःखद सत्यकथा आहे. ही परिस्थिती पूर्णतया बदलल्याविना सीमा संरक्षणाची संपूर्ण सफलता पदरी कशी पडणार, असा प्रश्न अनेक प्रसंगी दिल्ली दरबारात अगदी सहजगत्या, न कळत, निर्माण होत असेल वा होईल तर कितीतरी गोष्टी सावल्या जातील.

**दरबारी**

| | |
|---|---|
| लालमहाल | प्रतापगड |
| पन्हाळगड | राजगड |
| पुरंदर | आग्रा |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन |
| रा ज हं स | प्र का श न, पु णे. |

MANOOS (Fortnightly) : 1 May 1965 : 25 Paise : Regd NO. B 9304


प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

# स्वस्तिक

# चप्पल्स



Parkerson/srp/13

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर